04-08-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 12:00

08-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ KGS/ ST/ 12:00

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

मंत्रिमंडळाच्या निर्णयाशी व शासन निर्णयाशी विसंगत माहिती आंदोलनकर्त्या संघटनेला कळविणे

(१) * २६०२ प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २३ जुलै, २००९ च्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या आश्वासित प्रगती योजनेसह (CAS) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करणारा निर्णय घेतला व त्याप्रमाणे दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, असे असताना सचिवांनी मात्र महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास २४ जुलै, २००९ रोजी पत्र लिहून "राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे," असे कळविले हे खरे आहे काय,

(२) "राज्यशासकीय कर्मचारी व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सध्या लागू असलेले अनुषंगिक लाभ यापैकी जे लाभदायक असेल ते सुरु ठेवण्याचा " निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला असतांना व तशी १२ ऑगस्ट, २००९ च्या शासनिर्णयामध्ये तरतुद असतांना, दिनांक ३१ जुलै, २००९ रोजी उच्च व तंत्र शिक्षण सचिवांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना एक पत्र पाठवून "आनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे" असे कळविले हे खरे आहे काय,

(३) निरनिराळ्या ८ मुद्यांच्या बाबतीत प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाशी व निर्गमित झालेल्या १२ ऑगस्ट, २००९ च्या शासननिर्णयाशी विसंगत जाहिराती वृत्तपत्रात दिल्या व अशी विसंगत माहिती आंदोलनकर्त्या संघटनेला पत्राने कळविली, असे प्रतिपादन करुन पुराव्यादाखल निरनिराळी २० सहपत्रे सोबत जोडून चौकशीची मागणी करणारे एक निवेदन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री, मा.उच्च शिक्षण मंत्री व मुख्यसचिव यांना दिनांक २५ जानेवारी, २०१० रोजी किंवा त्यासुमारास सादर केलेले आहे हे ही खरे आहे काय,

(४) खरे असल्यास याबाबत करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले,

(५) चौकशी झालेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.राजेश टोपे : (१) व (२) राज्यातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करण्याच्या प्रस्तावात मंत्रिमंडळाने दिनांक २३ जुलै,२००९ रोजी मान्यता दिली. मंत्रिमंडळाच्या सदर बैठकीचे कार्यवृत्त विभागास दि.१० ऑगस्ट,२००९ रोजी प्राप्त झाले व त्या नुसार विभागाने दि. १२ ऑगस्ट, २००९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

शिक्षकांच्या संप मिटविण्यासाठी ज्या ज्या वेळी संघटने सोबत बैठका झाल्या त्या त्या वेळी सहाव्या वेतन आयोगाबदलची माहिती लेखी स्वरुपात देण्यासाठी संघटनेने तगादा लावला व लेखी पत्राची वारंवार मागणी केली. सदर दि.२३ जुलै, २००९ व दि. ३१ जुलै, २००९ ची दोन्ही पत्रे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संघटनेच्या मागणीवरुन मंत्रिमंडळाचे कार्यवृत्त प्राप्त होण्यापूर्वीच दिलेली आहेत. त्यामुळे या पत्रातील मजकूर मंत्रिमंडळातील तसेच शासन निर्णयातील मजकूराशी तंतोतंत जुळणारा असू

ता.प्र.क्र.२६०२....

शकत नाही. उक्त दोन्ही पत्रातील कोणताही मजकूर हा संदिग्धता निर्माण करणारा किंवा चूकीची माहिती देणारा नव्हता.

(३),(४) व (५) दि.२५ जानेवारी, २०१० चे निवेदन प्राप्त झाले आहे. शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतरही त्यांनी संप सुरुच ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन शिक्षकांनी संप मागे घ्यावा म्हणून जनजागृती करण्याच्या उद्देशाने शासना मार्फत दि. १४ ते २७ ऑगस्ट,२००९ या कालावधीत वर्तमान पत्रातून जाहिराती देण्यात आलेल्या आहेत.शिक्षकांसाठी सहाव्या वेतन आयोग लागू करण्याच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णय एकूण ४२ पृष्ठांचा असून सदर शासन निर्णय इंटनरनेटद्वारे सर्वत्र उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील सर्व बाबी जाहिरातीमध्ये समाविष्ट करणे शक्य नव्हते. त्यामुळे जाहिरातीमध्ये शासन निर्णयातील ठळक बाबींचा समावेश करण्यात आला होता. दि.१२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय व संपाच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कोणतीही विसंगती आढळून आलेला नाही.

दि.२२ डिसेंबर, २००९ रोजी विधानपरिषदेत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेली आश्वासने व दि. २५ जानेवारी, २०१० च्या निवेदनाच्या अनुषंगाने विभागाकडून खुलासा प्राप्त झाला असून, त्यामध्ये विभागाची कोणतीही चूक नसल्याचे दिसून आले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ता.प्र.क्र.२६०२.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. माझी या संदर्भात आपल्याला विनंती आहे की, या प्रश्नाबाबत आपल्या दालनात स्वतंत्र बैठक घेण्यात यावी. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना या प्रश्नासंदर्भात चर्चा करावयाची असेल त्यांनाही बैठकीला बोलावण्याची संधी दिली तर योग्य होईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अत्यंत दुर्दैवी अशा प्रकारची घटना आहे. निरनिराळ्या सातही मुद्यांबाबत सचिवांनी अत्यंत उध्दटपणाने सभागृहातील आश्वासने पायाखाली तुडविली आहेत. अत्यंत चुकीचे अशी पत्रे दिली आहेत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे सहावा वेतन अयोग लागु करावा असा निर्णय झाला मात्र सचिवांनी पत्र लिहून कळविले की, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग द्यायचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या २५ जानेवारी २०१० च्या ` निवेदनासोबत दोन्हीबाबतचा फरक संघटनाने दाखवून दिलेला आहे. मंत्रीमहोदयांच्या माहितीसाठी सहपत्र सोबत जोडले आहे. सर्व ग्रेड पे वेगवेगळे आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांचे ग्रेड पे आहेत ते वेगळे असून महाविद्यालयीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२६०२.... प्रा.बी.टी.देशमुख....

शिक्षकांना ॲकॅडमिक ग्रेड पे आहेत. साऱ्या ठिकाणचे ग्रेड पे वेगवेगळे आहेत. यामध्ये चूक केलेली आहे. जे ७-८ मुद्दे आहेत त्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी उहापोह केलेला आहे. माझे म्हणणे असे आहे की, या प्रत्येक मुद्यांबाबत कागदपत्र तुमच्यासमोर आहेत. तुम्हाला नोटीस दिली आहे, सारी सहपत्र सोबत जोडली आहेत. त्या प्रत्येक मुद्याबाबत सचिवांनी चूक केलेली आहे. सभागृहाच्या प्रती, मंत्रिमंडळाप्रती उध्दटपणाचे वर्तन केलेले आहे. मंत्रीमहोदय त्या संघटनशी दिवसभर चर्चा करीत होते. मंत्रालयात असणारे सचिव त्या चर्चेला हजर रहावयास तयार नव्हते. मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली.

नंतर बी.१....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ..... ता. प्र. क्र. 2602.....

आपण देखील त्या बैठकीला वेळेवर हजर होता, माननीय राज्यमंत्री वेळेवर हजर होते, इतर सर्व सचिव हजर होते पण उध्दट सचिव मात्र त्या बैठकीला 20 मिनिटे उशिरा आले. माझी अशी विनंती आहे की, आपल्या दालनात बैठक बोलावून या प्रश्नाची तड लावण्यास माझी काहीच हरकत नाही. कारण प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत येथे उपप्रश्न निर्माण होतील. संघटनेने माननीय मंत्री महोदयांकडे यासंबंधी आवश्यक ती सारी कागदपत्रे सहपत्रे म्हणून दिलेली आहेत. अशा परिस्थितीत या प्रश्नावर सभागृहातच चर्चा केली तर सभागृहाचा भरपूर वेळ जाईल. म्हणून दोन्ही बाजूच्या सदस्यांना आपल्या दालनात बोलावून या प्रश्नाबाबत चर्चा करुन यातून मार्ग काढावा व तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. एस.क्यू. जमा : महोदय, यामध्ये नॉन टिचींगची पदे कव्हर होतात काय ?

श्री. राजेश टोपे : समकक्ष ही पदे नॉन टिचींग स्वरुपाची नसतात तर ही पदे फक्त शिक्षकीय पदेच आहेत. माझी विनंती अशी आहे की, हा प्रश्न राखून ठेवण्याऐवजी आपल्या दालनात बैठक घेऊन तो सोडवू.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, सभागृहाच्या प्रती, माननीय मंत्री महोदय तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या प्रती उध्दटपणाची वागणूक ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. कारण सचिवांचे अशा प्रकारचे उध्दट वागणे खपवून घेता कामा नये. अत्यंत लज्जास्पद वर्तन सचिवांनी केलेले आहे. संघटनेच्या निवेदनासोबत तत्संबंधीची सहपत्रे-7 जोडलेली आहेत. त्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेण्या आणि यु.जी.सी. ने लागू केलेल्या वेतनश्रेण्या दिलेल्या आहेत. यु.जी.सी. मध्ये ग्रेड पे हा प्रकार नसून ॲकेडमिक ग्रेड पे दिलेला आहे तो सर्व ठिकाणी वेगळा आहे. तरी देखील सचिवांनी उध्दटपणाने लिहून दिलेले आहे की, "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे". असे असताना प्रत्येक मुद्याच्या बाबतीत सभागृहात चुकीची उत्तरे येऊ नयेत त्यामुळे सभागृहाचा पुन्हा बराच वेळ जाण्याचा संभव आहे. म्हणून आपण दोन्ही बाजूच्या सदस्यांना दालनात बोलावून या प्रश्नावर चर्चा करावी व सर्वंकष असा तोडगा काढावा मात्र तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2602.....

श्री. राजेश टोपे : महोदय, हा प्रश्न सभागृहात चर्चेसाठी घेण्यास माझी हरकत नाही. प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा असतो हे मान्य आहे परंतु त्यामुळे कन्फ्युजन होऊ शकते. म्हणून आपल्या दालनात आपल्यासमवेत चर्चा करुन हा प्रश्न सोडविणे शक्य आहे. म्हणून मी अशी विनंती करीन की प्रश्न राखून ठेवण्याऐवजी तो चर्चा करुनही सोडविता येईल. आमचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे. वास्तविक सहाव्या वेतन आयोगाचा लाभ देण्याचा संपूर्ण विषय शासनाने संपविलेला आहे. फक्त समकाळातील पत्र आणि त्या काळातील जाहिरात यासंदर्भात जी चर्चा आहे ती प्रदीर्घ आहे म्हणून आपण यासंबंधीची बैठक बोलावून यातून मार्ग निघू शकतो.

प्रा.बी.टी. देशमुख : मंत्री महोदय, नेट-सेट च्या परीक्षेबाबत आपण त्या संघटनेला लिहून देत होता. आपण त्याबाबत अनेक लेखी आश्वासने दिलीत, बाहेर दिलीत, सभागृहात दिलीत त्याप्रमाणे आपण वागलात. आपण स्वत: विद्यापीठ अनुदान आयोगात जाऊन एक्झम्शनबाबत विनंती केली आणि त्याप्रमाणे आता मार्च-एप्रिल मध्ये शेकडो शिक्षकांना एक्झमशन्स मिळालीत. नेट-सेट बाबत ताबडतोब एक्झम्शन द्यावे, असे आपण युजीसीला सांगत होता. त्यासंदर्भात सर्वांच्या समोर मंत्री महोदयांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला फोन सुध्दा केले. त्याप्रमाणे तीन विद्यापीठातील एक्झम्शन त्यावेळीच आले. अशा प्रकारे एका मागे एक मंत्री महोदयांनी सकारात्मक आश्वासने दिलीत. मात्र त्याच्या विरोधात सचिवांनी 24 ऑगस्ट, 2009 रोजी खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात जाऊन उलट पत्र दिले, हे योग्य नाही. ते पत्र निवेदनासोबत जोडले आहे. म्हणून माझे म्हणणे आहे की, एक एका मुद्याच्या बाबतीत आपण ऐकले तर शरमेने मान खाली जाण्यासारखी ही परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नव्हे

प्रा.बी.टी.देशमुख....

आपण जरुर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनातील बैठकीसाठी बोलवावे व त्या बैठकीत आमचे म्हणणे ऐकून घ्यावे व तो पर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी आपल्याला विनंती आहे. नाही तर चुकीच्या उत्तरामुळे आम्हाला प्रत्येक मुद्यांवर प्रश्न विचारावे लागतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी जी बाब निदर्शनास आणलेली आहे ती फार गंभीर आहे. मंत्रिमंडळाने याबाबतीत निर्णय घेतलेला नसतांना सुध्दा त्याबाबत पत्र दिलेले आहे त्यामुळे सरकारचा, सदनाचा आणि सदस्यांचा अवमान झालेला आहे. अधिकारी एवढे मुजोर झालेले आहेत की, मी एवढे करुन सुध्दा तुम्ही माझे काहीच करु शकत नाही अशी जी भावना अधिका-यांची झालेली आहे ती बरोबर नाही. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात काहीही हरकत नाही. हा प्रश्न राखून ठेवला म्हणजे खात्याचा अवमान झाला असे काही नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक घ्यावी व तोपर्यंत हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी कोणताही अविश्वास व्यक्त केलेला नव्हता परंतु आता माननीय मंत्रीमहोदयांचे वर्तन हे अधिका-यांना सांभाळण्याचे दिसत आहे. सभागृह सर्वोच्च असल्यामुळे या सभागृहात या प्रश्नाची तड लागणे अधिक महत्वाचे आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांना सभागृहाची भिती का वाटते हे समजत नाही. केवळ अधिका-यांना संरक्षण देण्यासाठी आपण ही बैठक माननीय सभापती महोदयांच्या दालनात घ्यावी असे म्हणत आहात ते योग्य नाही. दालनात अनेक बैठका होत असतात परंतु सर्वच प्रश्नांची दालनात तड लागते असे काही नाही. त्यामुळे या प्रश्नाची तड या सर्वोच्च सभागृहातच लागली पाहिजे व तोपर्यंत हा प्रश्न आपण राखून ठेवावा. तसेच कोणत्याही परिस्थितीत अधिका-यांना संरक्षण मिळता कामा नये. माननीय मंत्रीमहोदयांना सभागृहापासून कोणत्याही प्रकारे पळ काढता येणार नाही एवढे या निमित्ताने मी सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2602.....

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी जी भावना व्यक्त केली त्या भावनेचा विचार करुन सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सुध्दा याच अनुषंगाने विंनंती केलेली आहे. दोघांच्या विचारामध्ये फक्त एकच फरक आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांचे मत असे आहे की, पीठासीन अधिका-यांच्या दालनात यासंदर्भात बैठक घेऊन त्या ठिकाणी सखोल चर्चा व्हावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख तसेच सन्माननीय सभागृहाची भावना अशी दिसते की, अशी चर्चा दालनात जरुर करु या परंतु तोपर्यंत हा प्रश्न अनिर्णित ठेवण्यात यावा. त्यामुळे हा प्रश्न मी राखून ठेवत आहे. माझ्या दालनात या प्रश्नाबाबत जरुर चर्चा केली जाईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील जलसाठा कमी झाल्यामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई

(२) * ४०५२ श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्रीमती मधु जैन, श्री.सुभाष चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४२८ ला दिनांक ८ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील जलसाठा कमी झाल्यामुळे माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत जिल्हानिहाय पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत, व त्यानुसार पाणीटंचाईवर मात करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे,श्री. लक्ष्मण ढोबळे यांच्या करिता : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय,

(३) राज्यात काही जिल्ह्यात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे भूजल पातळीत घट झाल्याने काही गावात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात पाणी टंचाई भासलेल्या गावे/वाडयांमध्ये टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित नवीन विंधण विहिरी वशिष दुरुस्ती करणे, नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पूरक नळ योजना, विहीरी अधिग्रहीत करणे, विहीरी खोल करणे, गाळ काढणे, टँकर/ बैलगाडीने पाणी पुरवठा करणे, बुडक्या घेणे इ, उपाययोजना आवश्यकतेनुसार घेण्यात आल्या/येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा प्रश्नाकडे मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. पाणी टंचाईला आपण तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना करीत असतो. त्यामुळे प्रश्न कायमस्वरुपी न सुटता तो तसाच राहतो. दरवर्षी पाणीटंचाईची समस्या असते आणि त्यावर दरवर्षी शासन उपाययोजना करीत असते. तात्पुरती मलमपट्टी करुन हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. पाणी टंचाईसाठी कायम स्वरुपी ठोस उपाययोजना शासन काय करणार आहे काय ? पाण्याची गळती कमी व्हावी तसेच पाण्याच्या संवर्धनासाठी शासन कोणते पाऊल उचलणार आहे ? जे छापील उत्तर आहे ते उत्तर वाचले तर आपल्याला असे दिसून येईल की, शासनाने पाणी पुरवठयाच्या बाबतीत उपाय योजना केली आहे परंतु पाण्याची गळती कमी करण्यासाठी व पाण्याच्या संवर्धनासाठी शासनाने कोणतीही पाऊले उचलली नाहीत. त्यामुळे यांसदर्भातील माहिती कृपया माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :४०५२.....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, पाण्याच्या टंचाईबाबत शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो बरोबर आहे. पाण्याच्या टंचाईच्यावेळी शासनाकडून ज्या उपाययोजना आखल्या जातात त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असतात. एक गोष्ट मी आपणासा सांगू इच्छितो की, पाण्यासाठी आपण शेवटी निसर्गावरच अवलंबून आहे. आपल्या राज्यामध्ये जवळपास ८५ टक्के पाणी पुरवठा हा विहीर किंवा बोअरवेलमधून होत असतो व १५ टक्के पाणी पुरवठा हा धरणाच्या पाण्यातून होत असतो.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4052...

श्री.रणजित कांबळे...

शेवटी कोणताही पाण्याचा स्त्रोत हा पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतो. मागील दोन-तीन वर्षापासून पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये एक विधेयक इंट्रोडयूस करण्यात आले असून ते या अधिवेशनामध्ये चर्चेसाठी मांडण्यात येईल. जोपर्यंत बोअरमधून होत असलेला पाण्याचा उपसा आपण थांबविणार नाही, पिण्यासाठी, सिंचनासाठी किंवा औद्योगिक वापरासाठी होत असलेल्या अतिरिक्त पाण्याच्या वापरावर आपण काही प्रमाणात बंधन आणणार नाही तोपर्यंत जमिनीतील पाण्याची पातळी वर आणू शकणार नाही. आणि म्हणून या विधेयकाच्या माध्यमातून आपण 60 फूटाच्या आतमध्ये सिंचन किंवा औद्योगिक वापरासाठी बोअर करण्यावर बंधन आणणार आहोत. त्याचबरोबर जलसिंचनाची कामे, स्त्रोत बळकटीकरणाची कामे मोठया प्रमाणात करणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपण ही दोन्ही कामे एकाच वेळी करणार नाही तोपर्यंत पाण्याची पातळी वर येणार नाही. दुर्दैवाने महाराष्ट्राची 82 टक्के जमीन ही बेसॉल्ट रॉकची आहे. त्यामधून पाण्याचे पाझर करण्याचे प्रमाण 4 टक्के आहे. आणि म्हणून त्यासाठी जलसंधारणाची कामे करणे आवश्यक आहे, पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे हे विधेयक सभागृहापुढे आल्यानंतर पाणी टंचाई असलेल्या क्षेत्रामध्ये जलसंधारणाची कामे करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे काही ठिकाणी 100 फूट तर काही ठिकाणी 700 ते 800 फूटापर्यंत बोअर करण्यात आले आहेत. त्यांच्यावर सुध्दा बंधन आणून आपण जमिनीतील पाण्याची पातळी वर आणणार आहोत.

श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. विशेषत: टंचाईग्रस्त तालुक्यामध्ये, दुष्काळी तालुक्याच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. सोलापूर शहरामध्ये दूषित पाणीपुरवठा झाल्यामुळे व कॉलऱ्यामुळे काही लोकांचा मृत्यू झाला आहे. त्याठिकाणी पदाधिकारी व शासकीय अधिकारी हे स्वागत समारंभ स्वीकारण्यामध्ये मश्गुल आहेत. आज या कारणासाठी सोलापूर शहर बंद ठेवण्यात आले आहे. अशा परिस्थितीत हे शासन काय करणार आहे? तेथील शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द आपण काय कारवाई केली आहे? तसेच, शुध्द पाणी देण्यासंदर्भात शासनाने कोणते नियोजन केले आहे? सोलापूर हा दुष्काळी तालुका असून त्याठिकाणी पाऊस नाही, पाण्याचा सोर्स नाही. अशावेळी विंधन विहिरीसारखे तात्पुरते उपाय केले जातात. त्याऐवजी कायम स्वरुपी उपाय योजना करण्यासाठी आपण लक्ष घालणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

ता.प्र.क्र. 4052..

श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील...

आपण चुकीच्या पध्दतीने पाणी पुरवठा योजना केल्या आहेत त्यांची आकडेवारी आणि बंद पडलेल्या पाणी पुरवठयाच्या योजनांची आकडेवारी सादर करणार काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला असला तरी मी याबाबत थोडक्यात माहिती सादर करतो. सभापती महोदय, पाण्याच्या टंचाईमुळे व पाईप फुटल्यामुळे काही ठिकाणी लिकेज झाले होते, ज्या भागामध्ये लिकेज झाले होते त्याठिकाणी मोठया प्रमाणात पाणी दूषित झाले. हे दूषित पाणी प्यायल्यामुळे काही लोकांचा मृत्यू झाला. या प्रकरणामध्ये महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे जबाबदारी सोपवून त्यांना यामध्ये लक्ष घालण्यास सांगितले आहे. त्या योजनेच्या दुरुस्तीच्या कामासाठी मंत्रिमंडळाने निधी देऊन ते काम तात्काळ दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणामध्ये दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. अशाप्रकारे ही योजना एकदा दुरुस्त झाल्यानंतर निश्चितपणे सोलापूरला शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याचा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. पुढील दोन महिने महाराष्ट्रामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होणार आहे. आपण लेखी उत्तरामध्ये निरनिराळया योजनांचा उल्लेख केला आहे. माझा प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्हयामध्ये प्रत्यक्ष चालू असलेल्या योजना किती आहेत, त्यापैकी किती योजना बंद आहेत आणि किती योजनांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे? अनेक वर्षापासून योजना चालू रहातात, परंतु त्या पूर्ण होत नाहीत. त्या पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे कालबध्द कार्यक्रम नाही. योजना पूर्ण न झाल्यामुळे तेथील लोकांना त्याचा फायदा मिळत नाही. मध्यंतरी मंत्रिमंडळाने एक समिती नेमली होती. त्या समितीमार्फत प्रत्यक्ष पहाणी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. आपण या नळ पाणीपुरवठा योजना करता...

(अपूर्ण--- यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4052.....

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, योजना करण्यात येतात परंतु त्या कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने सरकारची ठोस कालबध्द, या पाणी पुरवठा योजना इतक्या कालावधीमध्ये पूर्ण झाल्या पाहिजे अशा प्रकारची एक योजना असली पाहिजे. अशा प्रकारची शासनासमोर काही योजना आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय,अनेक योजना प्रगतीपथावर आहेत. किंवा काही योजना पूर्ण झालल्या आहेत परंतु काही ना काही किरकोळ कारणास्तव त्या बंद पडलेल्या आहेत. सभापती महोदय, दोन-तीन कारणामुळे या योजना बंद असतात. सर्वात महत्वाचे कारण असे की, एमएसईबीचे बिल देत नाहीत म्हणून अनेक योजना बंद आहेत. त्याशिवाय त्या योजनांमध्ये काही टेक्निकल त्रुटी राहू शकतात त्यामुळे देखील काही योजना बंद आहेत. त्यामुळे या पुढच्या दोन वर्षासाठी राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये एक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. ज्या योजनांचे 70 ते 80 टक्क्यापर्यंत काम झालेले आहे किंवा काम पूर्ण झालेले आहे पण काही टेक्निकल कारणामुळे त्या योजना बंद आहेत अशा योजनाची दुरुस्ती या योजनेमध्ये प्रस्तावित केलेली आहे. अशा प्रकारे दोन वर्षाचा 24 हजार पाणी पुरवठा योजना आराखडा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तयार केलेला आहे. हा दोन वर्षाचा आराखडा आहे. 24 हजार पाणी पुरवठा योजनांचा पहिला टप्पा घेण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे निश्चितपणे 24 हजार पाणी
पुरवठा योजना पूर्ण करण्यात येतील.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये गाळ काढण्याला विशेष प्राधान्य दिलेले आहे. गाळ काढण्याचा प्रश्न आपल्याला फार भेडसावत आहे तेव्हा शासन यामध्ये किती याशस्वी झालेले आहे? भूगर्भामध्ये पाणी जिरविण्यासाठी काही विशेष कार्यक्रम आखले आहेत काय? पाणी साठवण्याच्या काही योजना केलेल्या आहेत काय?

श्री. रणजित कांबळे: सभापती महोदय, विहिरीतील गाळ काढण्याबाबतचा प्रस्ताव अनेक ग्रामपंचायतीने शासनाला दिलेला आहे. यामध्ये दोन भाग असतात. एक म्हणजे विहीर खोल करावयाची असते आणि दुसरे असे की, अनेक वर्षापासून त्या विहिरीमध्ये जो गाळ जमा झालेला असतो त्यामुळे पाण्याचे प्रमाण कमी झालेले असते. त्यामुळे गाळ काढणे अत्यंत आवश्यक असते. यासाठी शासन स्वत: ग्रामपंचायतीला पैसे देते. जेवढया ग्रामपंचायतीला पैसे दिलेले आहेत त्या ग्रामपंचायतीतील विहिरीतील गाळ काढण्याचे काम त्याच वर्षी झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4052...

श्री. रणजित कांबळे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी भूगर्भात पाणी साठविण्याच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. ज्या ज्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत सक्षम करण्यासाठी किंवा बळकट करण्यासाठी एक शिवकालीन योजना आहे. यानंतर ज्या नवीन योजना घेण्यात येतील किंवा स्त्रोत घेण्यात येतील त्यामध्ये त्या योजनांच्या बळकटीकरणाचे काम बंधनकारक करण्यात येणार आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून किंवा रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून तळयातील गाळ काढण्याचे काम करण्यात येते. सभापती महोदय, भूजल पातळी वाढवावयाची असेल तर तळयातील पाणीसाठा वाढवावा लागणार आहे आणि तळयातील पाणीसाठा वाढवावयाचा असेल, त्यातील गाळ काढावयाचा असेल तर त्याची पध्दत सोपी असली पाहिजे. गाळ काढण्याची पध्दती सोपी करण्यात येणार आहे काय? म्हणजे लोकांना माती घेऊन जायला आनंद वाटेल आणि त्या कामाचे पेमेंट मिळणेही सोपे होईल असे काही करता येईल काय?दुसरा प्रश्न असा की, पाणी साठविण्यासाठी बोअर घेण्यात येणार आहेत त्या बोअरवर बंदी आणण्यात येणार असेल तर ते नवीन भ्रष्टाचाराचे कुरण तयार होणार नाही काय?

श्री. रणजित काबळे : सन्माननीय सदस्यांनी तळयामधील गाळ काढण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. विहिरींमध्ये गाळ साचल्यानंतर किंवा त्यांच्या खोलीकरणाचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर पाण्याच्या टंचाईच्या दिवसांमध्ये, जेव्हा पाण्याची पातळी एकदम खोल जाते तेव्हाच हे काम करावे लागते. त्यामुळे या पाणी टंचाईच्यावेळी जेव्हा पाण्याची पातळी फार कमी असते तेव्हा गाळ काढण्यासाठी शासन त्या ग्रामपंचायतीला पैसे देते आणि अशी अपेक्षा असते की, त्या विहिरींचे खोलीकरणाचे आणि गाळ काढण्याचे काम त्याचवेळी केले जाईल. सभापती महोदय बोअरवर बंधन घालण्यात आले तर त्याच्यामध्ये भ्रष्टाचार होईल असा सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारलेला आहे. यापुढे महाराष्ट्र राज्यातील रिघस्ची नोंदणी शासनस्तरावर राहणार आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

ता.प्र.क्र. 4052.... श्री. रणजित कांबळे...

पुढे 60 मीटरच्या आत आपण बोअर करु शकणार नाही. जो एरिया क्रिटीकल म्हणून घोषित झाला असेल त्या ठिकाणी आपण ते करु शकत नाही. त्याच्या व्यतिरिक्त ज्या ठिकाणी प्रत्यक्षात बोअर खोल असेल त्या ठिकाणचे पाणी शेतीसाठी किंवा औद्योगिक वापरासाठी वापरावयाचे असेल तर त्यावर कर लावणार. क्रिटीकल झोनमध्ये 60 मीटरपेक्षा जास्त बोअर घेतली तर त्याच्यावर दंड आणि सजा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, टंचाईची जिल्हानिहाय पाहणी केव्हा सुरु करण्यात आली आणि ती केव्हा पूर्ण झाली. जिल्हानिहाय पाहणीत राज्यात एकूण किती गावे आणि वाड्यांमध्ये टंचाई आहे ? माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, काही ठिकाणी स्त्रोत नाही म्हणून नळ पाणीपुरवठा योजना बंद आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी जुलै महिन्यापर्यंत पाऊस पडला नाही तरी पाण्याचा सोर्स चालू असतो परंतु त्या ठिकाणची नळ पाणीपुरवठा योजना एका वर्षामध्ये पूर्ण होऊ सुध्दा अजून योजना चालू झालेली नाही पण त्या योजनेवर दुरुस्तीचा खर्च करण्यात आलेला आहे. त्याबाबतीत शासन कारवाई करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याबाबत मी आधी उत्तर देतो. मी असे कधीही म्हटलेले नाही की स्त्रोत सुकल्यामुळे योजना बंद असतात. योजना बंद असण्यामध्ये ते एक कारण असू शकते. तसेच एमएसईबीचे बिल भरले नाही म्हणून तसेच काही तांत्रिक त्रुटी असतील अशी कारणे योजना बंद असण्यामागे असतात. त्यामध्ये काही तांत्रिक त्रुटी असतील तर आता जो कार्यक्रम घेत आहोत त्यामध्ये त्रुटी दुरुस्त करुन दोन वर्षात अशा योजना निश्चितपणे दुरुस्त करु. सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, 18166 गावे आणि 9399 वाड्यांमध्ये 38,305 वेगवेगळ्या योजना प्रस्तावित केलेल्या आहेत. परंतु हा बृहतआराखडा आहे. गरजेनुसार ज्या ज्या ठिकाणी मागणी केलेली आहे त्या ठिकाणी आम्ही ते पूर्ण करणार आहोत. त्यामध्ये वाढ झाली तर वाढवून सुध्दा देणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4052....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 18 हजार गावांमध्ये अशा प्रकारची पाणी टंचाई आहे आणि या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हानिहाय पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात पाणी टंचाई भासलेल्या गावे/वाड्यांमध्ये टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित नवीन विंधन विहीर घेणे, विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे, नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पूरक नळ योजना अशा प्रकारचा बृहत आराखडा तयार केला आहे. या महाराष्ट्रामध्ये ज्या 18 हजार गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शासनाने टंचाईग्रस्तांसाठी किती निधी प्रस्तावित केलेला आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा जो आराखडा तयार करतो तो आपण तीन टप्प्यांमध्ये तयार करतो. त्यामध्ये ऑक्टोबर ते डिसेंबरपर्यंत, जानेवारी ते मार्चपर्यंत आणि मार्चअखेर ते 15 जून पर्यंत असे तीन टप्पे असतात. या कालावधीमध्ये महाराष्ट्रामध्ये टंचाई असणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी जूनमध्ये टंचाई निर्माण होऊ शकते, काही गावांमध्ये मार्चमध्ये टंचाई निर्माण होऊ शकते तर काही गावांमध्ये जानेवारी महिन्यामध्ये टंचाई निर्माण होऊ शकते. त्यासाठी आपण आराखडा तयार करतो आणि गरजेप्रमाणे तीन महिन्याच्या कालावधीत टंचाई भासू नये म्हणून जी उपाययोजना करावयाची आहे ती अगोदर करतो. त्यासाठी किती निधी दिला असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. आपण आतापर्यंत जवळपास 176 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये ग्रामीण भागासाठी 167.10 कोटी रुपये आणि शहरी भागासाठी 9.74 कोटी रुपये वितरित केलेले आहेत. जसजशी मागणी असते त्याप्रमाणावर आपण निधी देतो. मी स्पष्ट करु इच्छितो की,

यानंतर श्री. अजित शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4052....

श्री.रणजित कांबळे.....

या संदर्भात शहरी विभागातून मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव येत असतात. मंत्रालयस्तरावर विशेष समिती आहे त्या समितीकडे हे प्रस्ताव डायरेक्ट जातात. आपणास माहीत आहे की, नगरपालिकांमध्ये पाईप लाईन्सच्या संदर्भात वेगळी स्कीम आहे. मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, जी स्कीम प्रस्तावित केलेली आहे त्यासाठी 176 कोटी रुपये वितरित केलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण पैसे वितरित केले ही चांगली गोष्ट आहे. परंतु पुढील दोन-तीन महिन्यांमध्ये पाणी टंचाई निर्माण होणार आहे त्यासाठी किती रकमेची तरतूद केलेली आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाने 210 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्यापैकी 176 कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यवसाय तंत्र व उच्च तंत्र शिक्षण या शाळांमधील पूर्णवेळ अतांत्रिक शिक्षकांची वेतनश्रेणी कमी केल्याबाबत

* 3539 **श्री.कपिल पाटील, श्री.जयंत प्र.पाटील, श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) द्विपदवीधर आणि बी.एड् असलेल्या उच्चशिक्षित पूर्णवेळ अतांत्रिक शिक्षकांना हकीम समितींच्या शिफारशींमुळे पदावनत व्हावे लागून त्यांची वेतनश्रेणी पदविकाधारक तंत्र निदेशकांपेक्षा कमी झाली आहे याबद्दल असंतोष व्यक्त करणारे निवेदन शिक्षक भारती आणि संबंधित संघटनांनी राज्यशासनाकडे दिले आहे हे खरे आहे काय ?

(2) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

श्री.राजेश टोपे : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल आपण सभागृहात समज दिली होती. आताच याठिकाणी प्रा.बी.टी.देशमुख यांनी अधिकाऱ्यांच्या उद्दामपणाबद्दल सांगितले. मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे "नाही" आणि "प्रश्न उद्भवत नाही" अशी दिलेली आहेत. मी नागपूरच्या अधिवेशनात नियम 93 अन्वये हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी निवेदनात त्रुटी राहिल्याचे मान्य करण्यात आले होते. आता त्रुटी राहिलेली नाही असे सांगितलेले आहे. या संदर्भात शिक्षकांनी वारंवार निवेदने दिल्यानंतर मंत्रालयातील कार्यासन अधिकारी श्रीमती शुभा पत्की यांनी शिक्षकांना सांगितले की," आपणास नोकरीवर ठेवले आहे हे उपकार समजा, आपली फाईल हलली नसती" ग्रेड-पे मुळे या शिक्षकांचे जवळपास 1300 रुपयांचे नुकसान होत आहे. बायफोकलमधील फक्त 32 शिक्षकांचा प्रश्न असून त्यासाठी 16 लाख रुपयांची तरतूद करण्यासंबंधीचा हा विषय आहे. हे द्विपदवीधर शिक्षक असून त्यांना आय.टी.आय.मधील डिप्लोमा होल्डरपेक्षा कमी पगार आहे. पाचव्या वेतनात चूक झाली होती परंतु ती चूक नंतर दुरुस्त करण्यात आली होती. त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी जो शेरा दिलेला आहे तो मी वाचून दाखवितो, " .... समज दिली की, माहिती वेळेवर न येण्याची जबाबदारी निश्चित करावी आणि दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी." आता सहाव्या वेतन आयोगामध्ये सुध्दा तीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3539....

श्री.कपिल पाटील..

चूक केलेली आहे. या संदर्भात डिसेंबर महिन्यात बैठक झाली. तसेच ऑगस्ट महिन्यामध्ये मी आपणास भेटलो होतो. गेल्या महिन्यात माननीय वित्त मंत्र्यांकडे बैठक झाली. याठिकाणी सभागृहाची दिशाभूल करण्यात येत आहे. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे मंत्रिमहोदय अडचणीत येतात. अधिकारी एक-दोन वाक्यात उत्तरे देतात आणि सभागृहाला कचऱ्यासारखे फेकून देतात याचा आपण विचार करणार आहात की नाही हा माझा आक्षेप आहे. तेव्हा माननीय मंत्रिमहोदय श्रीमती पत्की आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहेत ? तसेच 32 शिक्षकांना वेतनश्रेणी नाकारलेली आहे ती पूर्वीलक्षी प्रभावाने देण्याबाबत ताबडतोब आदेश काढणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की, शिक्षकांच्या संघटनांनी निवेदन दिले आहे काय याचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांकडून जी चूक झालेली आहे त्यामुळे शिक्षकांना फरकाची रक्कम देणे क्रमप्राप्त आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागामध्ये बायफोकलचा विषय आहे. या विषयामध्ये अतांत्रिक विषयाच्या संदर्भात जे काही पूर्ण वेळ शिक्षक नेमले जातात त्यास अधिव्याख्याता म्हटले जाते. मी या संदर्भात 2-3 गोष्टी सांगू इच्छितो की ज्यामध्ये आम्ही दुरुस्ती करणार आहोत. अधिव्याख्यात्यास शालेय शिक्षकांप्रमाणे पूर्णवेळ शिक्षक म्हणून समजण्यात येईल. शालेय शिक्षण विभागाप्रमाणे जे काही अर्हताधारक अधिव्याख्याता असतील त्यांना शालेय विभागाप्रमाणे समकक्ष वेतनश्रेणी देण्यात येईल. वरिष्ठ आणि निवडश्रेणी सुध्दा देण्यात येईल. तसेच त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने फरक देण्यात येईल. सहाव्या वेतन आयोगामध्ये त्यांच्या ग्रेड पे मध्ये फरक झालेला आहे त्यामध्ये सुध्दा सुधारणा करण्यात येईल. कोणीही जाणीवपूर्वक चुका करीत नाही, नजर चुकीने चुका होतात. तरी सुध्दा ही चूक ताबडतोबीने दुरुस्त होणे आवश्यक आहे. त्यासाठी वर्ष-दोन वर्षाचा कालावधी लागू नये. तेव्हा ज्या अधिकाऱ्याकडून ही चूक झालेली आहे त्याबाबत चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यास समज देण्यात येईल...

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3539....

डॉ.वसंतराव पवार : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण खात्यातील हकीम समितीच्या शिफारशींबद्दल सभागृहात चर्चा सुरु आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्रामध्ये जवळजवळ 240 आयटीआय विना अनुदानित तत्वावर सुरु आहेत. विना अनुदानित तत्वावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव शासनासमोर आहे काय ? या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी त्याबाबत आश्वासन दिलेले आहे. त्या प्रस्तावाला मंत्री महोदय मंजुरी देणार आहेत काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.वसंतराव पवार यांनी संबंधित संघटनेची माझ्याकडे एक बैठक घेऊन त्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. यासंदर्भात अनुकूल निर्णय घेऊन हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे. त्यावर अद्याप प्रक्रिया सुरु आहे. त्या प्रस्तावाबाबत वित्त विभागाकडून अभिप्राय अपेक्षित आहे. वित्त विभागाकडून अभिप्राय आल्यानंतर मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय घ्यावा लागेल. यासंबंधी वित्त विभागाकडून जो अभिप्राय येईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

बनावट कीटकनाशकांमुळे पिकांचे ११०० कोटी रुपयांचे झालेले नुकसान

(४) * २८५३ श्री.दिवाकर रावते, श्री.गोपीकिसन बाजोरिया, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.भगवान साळुंखे , श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बनावट किटकनाशके तयार करुन ती शेतकऱ्यांना कमी किमतींना विकण्याच्या काही बोगस कंपन्यांच्या गैरप्रकारांमुळे जवळजवळ ११०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे मे. ॲगोकेमिकल्स पोलिसी ग्रुप या कंपनीने निदर्शनास आणले हे खरे आहे काय,

(२) या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित कंपन्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) हे खरे नाही. परंतु याबाबतची बातमी वृत्तपत्रामध्ये छापून आली आहे.

(२) वृत्तपत्रामध्ये छापून आलेली बातमी वास्तुस्थितीशी विपर्यस्त असल्याचे आढळून आले आहे.

(३) ॲग्रो केमिकल्स पॉलिसी ग्रुपने याबाबत चुकीची बातमी छापून आल्याचे मान्य केले असून याबाबतचा खुलासाही या संस्थेमार्फत वृत्तपत्रामधून प्रसिध्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 1100 कोटीं रुपयांच्या कीटकनाशकासंबंधीची तक्रार कंपनीने मागे का घेतली ते समजून घ्यावे. राज्यातील शेतक-यांसाठी हरियाणा, आंध्र प्रदेश आणि पंजाब या राज्यांमधून किती किंमतीची कीटकनाशके येतात ? माझ्या माहितीप्रमाणे 300 कोटींची येतात. त्यापैकी 120 कोटींची मराठवाडयात, 80 कोटींची विदर्भात वापरली जातात. त्यापैकी दरवर्षी 70 ते 80 टक्के कीटकनाशके बोगस असतात अशी तक्रार असते. या तिन्ही राज्यांमधून कोणकोणती कीटकनाशके येतात ? आजपर्यंत कीटकनाशकांच्या चाचणीमध्ये किती कीटकनाशकांमध्ये दोष आढळला आहे व त्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये जवळपास 410 कोटींची कीटकनाशकांची विक्री केली जाते. या कीटकनाशकांच्या कंपन्यांची अ,ब,क व ड अशी वर्गवारी केलेली आहे. राज्यामध्ये आंध्र प्रदेश व इतर राज्यांमधून कीटकनाशके येतात. यामध्ये साधारणपणे 200 कीटकनाशक उत्पादकांचे प्रतिनिधीत्व करणा-या संघटनेमार्फत तपासणी होते. 250 ते 300 कंपन्या महाराष्ट्रामध्ये कीटकनाशकांचा पुरवठा करतात.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.2853.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पंजाब, हरियाणा आणि आंध्र प्रदेश या राज्यामधून किती कीटकनाशके राज्यामध्ये येतात, त्यापैकी किती कीटकनाशकांची तपासणी झाली, त्यापैकी किती कीटकनाशके बनावट निघाली आहेत आणि त्यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री.गुलाबराव देवकर : बाहेरील राज्यातील 1000 कंपन्यांची सरकारकडे माहिती आहे. परंतु हरियाणा वगैरे राज्याबाबतची माहिती सांगता येणार नाही.

श्री.दिवाकर रावते : नांदेड जिल्हयात आंध्र प्रदेश राज्यातून कीटकनाशके येतात.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : सन्माननीय सदस्यांनी किती कंपन्यावर कारवाई केलेली आहे असे विचारलेले आहे. आपल्याकडे जवळपास 948 निरीक्षक आहेत. वर्षाला जवळपास 4500 औषधांचे नमुने तपासले जातात. तपासलेल्या नमुन्यांची माहिती देखील सन्माननीय सदस्यांना पाहिजे असल्यास मी देऊ शकतो. 2010मध्ये 4163 नमुने तपासले त्यापेक्षी 208 नमुने अप्रमाणित निघाले. अप्रमाणित नमुने निघण्याची टक्केवारी 5 टक्के आहे. तपासणीसाठी कंपन्यांचे अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी केलेली आहे. त्याद्वारे कोणती औषधे किती प्रमाणात अप्रमाणित आहेत हे प्रमाणित केले जाते. 4163 नमुने तपासले. त्यापैकी 5 टक्के नमुने अप्रमाणित आढळले आहेत.

श्री. दिवाकर रावते : आपण येथे शासकीय माहिती दिली. पुढच्या वेळी मी रेकॉर्ड घेऊन सभागृहामध्ये उपस्थित राहीन. पण हा पुढचा भाग झाला. सभापती महोदय, मी आपणास मनापासून धन्यवाद देतो, त्यावेळी आपण चर्चेला खूप प्रतिसाद दिला. ज्या कंपन्याचे औषधांचे नमुने बनावट आढळून येतात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी तीन-तीन वर्षाचा कालावधी लागतो आणि तेवढया काळात कंपनीचे अस्तित्वच राहात नाही. महाराष्ट्र राज्याच्या प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर अप्रमाणित निघालेले नमुने दिल्लीला जाऊन तपासून घेण्यात येतात. दिल्लीतील अप्रमाणित नमुने महाराष्ट्रामध्ये तपासण्यासाठी पाठविले जातात. म्हणजे दुसरीकडील प्रमाणपत्र स्वीकारले जाते. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. म्हणून शेतक-यांना बनावट किटकनाशके पुरविणा-या अशा किती कंपन्यावर आजपर्यन्त कारवाई झालेली आहे ? किती कंपन्यांना काळया यादीत टाकलेले आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : अशा कंपन्यांवर योग्य प्रकारे कारवाई केलेली आहे. किटकनाशके कायद्यांतर्गत अशा कंपन्यावर कारवाई केली जाते. कंपन्यावर कोर्ट केसेस दाखल केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील फरिदाबाद येथील प्रयोगशाळेत किटकनाशके तपासण्यासाठी पाठविली जातात.

सभापती : जेव्हा एखादी कंपनी बोगस किटकनाशके शेतक-यांना पुरविते त्यावेळी त्या कंपनीवर किटकनाशके कायद्यांतर्गत कारवाई करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची कारवाई एखाद्या कंपनीवर केलेली आहे काय आणि असल्यास त्या कंपनीचे नाव काय आहे, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : मागील 5 वर्षात गुन्हे दाखल केलेले आहेत. दोन पोलीस केसेस दाखल केलेल्या आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : हा प्रश्न मागील पाच वर्षापासून सभागृहामध्ये सातत्याने विचारला गेला आहे. हे खरे आहे की, 200 पेक्षा जास्त कंपन्या किटकनाशकांची विक्री करतात. काही कंपन्यांच्या किटकनाशकांची तपासणी होते तर काहींची होत नाही. अशी चूक होऊ नये म्हणून तपासणी कोणत्या पध्दतीने करावी यासाठी वर्गवारी निश्चित केलेली आहे. सभागृहातील चर्चेनंतर मिटींग घेऊन तशा प्रकारची वर्गवारी केलेली आहे. नवीन कंपन्या आपल्याकडे येत असताना त्यांच्या औषधांच्या नमुन्यांची तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये अप्रमाणित नमुने कमी प्रमाणात आढळतात. त्यामुळे जास्त नमुने, 10 टक्के नमुने, घेण्याच्या सूचना कृषी विभागाच्या निरीक्षकांना देण्यात आलेल्या आहेत. विशिष्ट कंपन्याचे नमुने तपासले जाऊ नयेत किंवा काही कंपन्यांचेच नमुने तपासले जावेत असे होऊ नये म्हणून वर्गवारी केलेली आहे. ज्या रेप्युटेड, मल्टीनॅशनल कंपन्या आहेत त्यांचे देखील नमुने तपासलेले आहेत. अ,ब,क,ड अशी वर्गवारी करुन प्रत्येक कंपनीचे नमुने घेतले जातील याची काळजी घेतलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकंदरीत 2007 मध्ये 3822 नमुने घेण्यात आले त्यामध्ये 2 टक्के नमुने अप्रमाणित आढळले. ज्यावेळी नमुन्यांच्या पध्दतीमध्ये बदल केला त्याचा परिणाम असा दिसून आला की....(अडथळा)...काय बदल केले हे समजावून सांगणे आवश्यक आहे. पूर्वी 2 टक्के नमुने अप्रमाणित आढळून येत होते. आता बदल केल्यामुळे या सर्व कंपन्या या पध्दतीच्या अंतर्गत यायला सुरुवात झाली. यावर्षी जे नमुने 4263 नमुने तपासले त्यामध्ये 5 टक्के अप्रमाणित नमुने आढळून आले. पूर्वी 3871 नमुन्यांमध्ये 2 टक्के अप्रमाणित नमुने आढळून येत होते. आता सगळ्या कंपन्या या पध्दतीच्या अंतर्गत आल्याचा परिणाम अधिक दिसून आला. जो बदल केला त्याचा परिणाम यामध्ये दिसून येत आहे. "ड" वर्गातील विक्रीचा शेअर 4 टक्के आहे. कारवाई अधिक कडक पध्दतीने केली जात असून कोर्ट केसेस 4298 दाखल केल्या आहेत. मागील दोन वर्षामध्ये काही पोलीस केसेस दाखल करण्याचा निर्णय घेतला. जे परवानगी नसताना विक्री करीत होते, बनावट औषधे, खोटी लेबल्स लावली जात होती अशा लोकांविरुध्द 15 पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. पेस्टिसाईड बनविणाऱ्या ज्या कंपन्या आहेत, उत्पादक कंपन्या आहेत अशा 4 कंपन्यांचे लायसन्स निलंबित केले आहे. इतकेच नव्हे तर कमी गुणवत्तेची किटकनाशके दिली अशा कंपन्यांना लायसन्स द्यायचे नाही असा निर्णय घेतल्यामुळे 71 कंपन्यांना लायसन्स देणे थांबविले आहे ही वस्तुस्थिती आहे. अत्यंत कठोर पध्दतीने आपण पुढे जात आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघापासून विचारतो आहे, या सदनामध्ये दहा वेळा प्रश्न विचारला आहे. लायसन्स देणे बंद केल्यानंतर नवीन नावाने कंपन्या पुढे येत आहेत. बोगस फवारणी औषधांची शेतकऱ्यांना विक्री करीत आहेत. बॉर्डरवरचे शेतकरी हैराण झाले आहेत. एकाही कंपनीला शिक्षा झालेली नाही. शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांच्या औषधांची विक्री केली जाते. एकाही कंपनीच्या प्रतिनिधींना तुरुंगात जावे लागलेले नाही. शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबद्दल कारवाई केल्याने तुरुंगवास घडला असे एक तरी उदाहरण आहे का?

श्री.बाळासाहेब थोरात : 15 केसेसमध्ये संपूर्णपणे पोलीस कारवाई झाली आहे.

सभापती : मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2853.....

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, चुकीचे उत्तर दिलेले आहे. आपण मला प्रश्न विचारण्याची संधी देणार होतात. मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. फॅक्टरीवर अधिकाऱ्यांनी छापे मारले आहेत.....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, कारवाई केली नाही. वास्तविक अधिकाऱ्यांनी छापे मारले आहेत. माझ्याकडे कागदपत्रे उपलब्ध आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांना कृषिमंत्र्यांनी आपल्या दालनात बोलवावे. सन्माननीय सदस्य जे काही सांगत आहेत त्याची गांभीर्याने मंत्रीमहोदयांनी दखल घ्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतरांच्या आकृतीबंधाबाबतचा प्रस्ताव

(५) * ३४०६ श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ८७ला दिनांक १५ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर केव्हा सादर करण्यात आला आहे,

(२) उच्चस्तरीय समितीने या प्रस्तावाबाबात कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती फौजिया खान, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) विभागाने दि. २०/६/२००९ रोजी प्रस्ताव समितीपुढे सादर करणेसाठी वित्त विभागास सादर केला आहे.

(२) समितीच्या समोर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतिबंधाविषयी सातत्याने या सभागृहात प्रश्न उपस्थित होत आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी सुध्दा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध नोव्हेंबर, 2005 च्या शासन निर्णयाऐवजी किमान माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे तातडीने लागू करावा असे शिक्षण विभागाला निर्देश दिले होते. 24 डिसेंबर, 2009 रोजी या सभागृहात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले होते की, आम्ही तातडीने माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे आकृतिबंध लागू करीत आहोत.

(नंतर के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ..... ता. प्र. क्र. 3406.....

15 डिसेंबरला हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर गेला असे उत्तर दिले होते. माझा या निमित्ताने असा प्रश्न आहे की, हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर प्रत्यक्षात केव्हा सादर करण्यात आला. या ठिकाणी दिलेल्या उत्तरात मात्र "प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला असून तो प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर प्रलंबित आहे" असे दिले आहे. वित्त विभागाकडून सदर प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर केव्हा गेला ? तसेच त्यासंबंधीचा निर्णय किती दिवसात होणार आहे ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, हा प्रस्ताव 9 जुलै, 2009 रोजी उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात आला. त्यानुसार दि. 29 डिसेंबर, 2009 रोजी उच्चस्तरीय समितीची बैठक सुध्दा आयोजित करण्यात आली होती परंतु त्या दिवशी विभागाचे सचिव दौऱ्यावर असल्याने बैठकीसाठी उपस्थित राहू शकले नाही. त्यांच्या अनुपस्थितीत उच्चस्तरीय समितीची बैठक घेणे योग्य नव्हते म्हणून हे प्रकरण सध्या उच्चस्तरीय समितीसमोर प्रलंबित आहे.

श्री. वसंतराव खोटरे : महोदय, बऱ्याच दिवसांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. दि. 8.8.2007 रोजी श्री. जयसिंग शेखावत, अध्यक्ष शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना यांची माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली होती. त्या बैठकीत पहिल्यांदा एसएससी कोड लागू करण्याबाबतचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानंतर दि. 19.3.2000 रोजी सभागृहात हा प्रश्न चर्चेला आला असता तेव्हा देखील स्पष्ट आदेश दिले होते तसेच एक महिन्याच्या आत यासंबंधीचा निर्णय घेऊ म्हणून आश्वासनही दिले होते. अद्यापही यासंबंधीचा निर्णय घेतलेला नाही. आता मात्र उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय घेऊन तो लागू करण्यात येणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, सन 2005 च्या जी.आर. नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. आणि यातून एखादा कर्मचारी सरप्लस होत असला तरी त्याला नोकरीतून काढू नये असेही आदेश देण्यात आले आहेत.

डॉ. वसंत पवार : महोदय, माध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तरांची संपूर्ण राज्यात जवळपास 14 हजार पदे रिक्त आहेत. सेवानिवृत्ती अथवा अन्य कारणांमुळे या जागा रिक्त झालेल्या आहेत. आकृतिबंधाला शासनाची परवानगी मिळत नाही अशी सन्माननीय सदस्यांची तक्रार आहे. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार..... ता. प्र. क्र. 3406.....

अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, यामध्ये अनुकंपाखालील सर्व सेवकांना नव्याने नोकरी देण्याची परवानगी शासन देणार काय ? तसेच या सर्व 14 हजार रिक्त जागांमध्ये रोष्टरप्रमाणे ज्या जागा रिझर्वेशनमध्ये येतात, त्या जागा भरण्याची परवानगी निदान शासन देणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या दोन्ही बाबी तपासून पाहण्यात येतील.....अडथळा.....आजही 25/11 च्या आकृतिबंधानुसार पदे भरता येतात.

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी "तपासून पाहू" असे जे उत्तर दिले ते .....

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागतात)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळेस बोलण्यासाठी उभे राहिले तर माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित असलेले उत्तर कदाचित आपणास मिळणार नाही. म्हणून प्रथम त्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. तसेच प्रत्येक वेळेस आपण अशा प्रकारे बोलण्यासाठी उठत राहिला तर एका एका प्रश्नाला 10-10 लोक प्रश्न विचारण्यासाठी उभे राहतील.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :3406.....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांकडून चुकीचे उत्तर रेकॉर्डवर येऊ नये यासाठी मी विचार मांडतो आहे. आरक्षित जागा हया घटनेनुसार भराव्याच लागतात त्यामुळे हा तपासण्याचा मुद्दा होऊ शकत नाही. त्यामुळे ज्या मंजूर पदावरील आरक्षित जागा आहेत त्या जागा भरण्याच्या संदर्भात तुम्ही त्वरीत आदेश दिले पाहिजेत. तशा प्रकारचे आदेश दिले नाही तर तो सुध्दा कायद्याने गुन्हा होऊ शकतो. त्यामुळे मंत्रीमहोदयांकडून चूक घडू नये म्हणून माननीय मंत्रीमहोदय, रोस्टरप्रमाणे ज्या जागा रिक्त आहेत त्या जागा आजच्या आज भरतील काय एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, आजही 25.11 चा जो जी.आर. आहे तो आजही लागू आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी एसएससीकोडचा आकृतीबंध मान्य केला आहे असे या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. एसएससी कोड प्रस्तावित असून तो उच्चस्तरीय समितीपुढे आहे. या उच्चस्तरीय समितीचा निर्णय अपेक्षित आहे. ज्या जागा रिक्त होतात त्या जागा आपण 25.11 नुसार आजही भरु शकतो. ज्या जागा आपण नियमाने भरु शकतो त्यामध्ये कोणतीच अडचण येणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय जे काही उत्तर देत आहेत ते अत्यंत चुकीचे आहे. डॉ. देवीसिंग शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन मंडळाची माननीय मुख्यमंत्र्यांशी बैठक झाली होती. दि.19.4.2008 रोजी सभागृहामध्ये शासनातर्फे असे सांगण्यात आले की, "माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या झालेल्या बैठकीत असा निर्णय दिला की, एसएससी कोड प्रमाणेच हा आकृतीबंध ठेवावा व त्याप्रमाणे विभागाला सूचना देण्यात आलेल्या आहेत." माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत काय झाले हे सांगितल्यानंतर शासनातर्फे असे सांगण्यात आले आहे की, "महिन्याभरात हा सारा गोंधळ दूर होऊन एसएससी कोड प्रमाणे आकृतीबंध आपण लागू करु.". त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय उच्च स्तरीय समितीचे कौतुक सांगतात ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. सभापती महोदय, मला आपण सांगा की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :3406.....

प्रा.बी.टी.देशमुख...

माननीय मंत्रीमहोदय उच्च स्तरीय समितीचे कौतुक सांगू शकतात का ? त्यामुळे माझा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे कारवाई का झाली नाही ? ज्यांनी कार्यवाही केली नाही त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ? माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे 10 दिवसात शासन निर्णय निर्गमित करेल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, आकृतीबंधामध्ये वेळोवेळी अनेक निर्णय झालेले आहेत. 25.11 च्या निर्णयानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात जी बैठक झाली होती त्यामध्ये माननीय शेखावत यांच्या अध्यक्षतेखालील समिती भेटल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले की, आम्ही एसएससी कोड प्रमाणे आकृतीबंध करण्याच्या दृष्टीने कारवाई करु. एसएससी कोड प्रमाणे प्रस्ताव विभागाला तयार करावयाचा असतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती :सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपले उत्तर सुरु ठेवावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी तशा प्रकारची सूचना दिल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रासाठीचा प्रस्ताव तयार करावा लागत असतो.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3406....

श्री. बाळासाहेब थोरात...

त्या प्रत्येक शाळेचा विचार करावा लागतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठकीमध्ये जरी सांगितले असले तरी याबाबतीत प्रोसिजर फॉलो केले पाहिजे.

(गोंधळ)

प्रा. बी. टी. देशमुख : तुम्ही एक महिन्यात करतो असे सांगितले होते. आता तुम्हाला किती दिवस लागणार आहेत?

(गोंधळ)

सभापती : प्रश्नोत्तरांचा तास संपला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी निषेध करुन सभात्याग करीत आहे.

(माननीय सदस्य सभात्याग करतात.)

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्याकरिता अनुमती द्यावी ही विनंती.

सभापती : मी आपल्याला नंतर परवानगी देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ SBT/ MMP/

पृ.शी. :
मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "उल्हासनगर शहरातील शासकीय जमिनीवर हजारो अनधिकृत बांधकामे करुन अतिक्रमण केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री भगवानराव साळुंखे, रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "सन 2009-10 या वर्षापासून 11 वी च्या प्रवेशासाठी सुरु केलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी आकारलेल्या शुल्कापैकी 1 कोटीपेक्षा जास्त रक्कम शासनाने संबंधित शाळांना दिली नसल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "साखर धंद्यात ऊस तोडणी वाहतूक करणाऱ्या सुमारे 8 लाख कामगारांना कामाची शाश्वती मिळणे, त्यांच्या नोकरीविषयक शर्तीचे नियमन होणे, वृध्दापकाळाची तरतूद होणे, तसेच साखर कारखान्यांना गरजेनुसार कामगारांचा पुरवठा होणे इत्यादी सुविधा नसल्याने ऊस तोड कामगारांमध्ये संतापाचे व भितीचे वातावरण पसरणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "वैद्यकीय महाविद्यालयातील 7 टक्के पदे रिक्त असतानाही आरोग्य विभागाने जिल्हा शल्य चिकित्सक व इतर अधिकाऱ्यांची पदे कायमस्वरुपी ग्रामीण भागात वर्ग करुन त्यांना शहरी भागात काम करण्याची संधी नाकारल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती देत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे कावेसर (किंगकॉंग नगर) येथील सर्वे नं. 139 व पातलीपाडा या सरकारी जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकाम दूर करण्यासाठी तहसीलदाराने नोटिस बजावल्याबाबत" या विषयावर नियम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "दी बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई या संस्थेच्या दोडामार्ग तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागात असलेल्या विविध शाळांची तपासणी करुन त्याबाबत मुख्याध्यापक व शिक्षकांचे पगार रोखून त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल केल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.
तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 70 टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असताही शेतीसंबंधी बऱ्याच ज्वलंत प्रश्नांची अर्थसंकल्पात दखल घेतली जात नसल्याने शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प असावा अशी होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. व्ही. यू.डायगव्हाणे, जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "विदर्भातील वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या 6 आत्महत्त्याग्रस्त जिल्हयातील इयत्ता 1 ली ते ते 12 वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके किरकोळ खर्च व संपूर्ण परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय होऊनही त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर,माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "शासनाने गोंड, राजगोंड या समाजास अनुसूचित जमातीमध्ये स्वतंत्ररित्या समाविष्ट केले नसतांनाही काही लोकांनी गोंड व राजगोंड म्हणून जातीचे प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ SBT/ MMP/

सभापती...

त्यानंतर,माननीय सदस्य सर्वश्री. किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "कणकवली तालुक्यातील ओरसगाव येथील सर्वश्री तळेकर व प्रभू यांच्या जमिनीवर वनसंज्ञा अशी नोंद झाली असताही या जागेवर उपविभागीय अधिकारी कणकवली यांनी बिनशेती परवाना दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी माझ्या दालनातच अनुमती नाकारली आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल नियम 93 अन्वये सूचना दिली होती ती घेण्यात आली नाही. आजही दिली होती ती देखील घेण्यात आलेली नाही.

सभापती : आपण आपले टिपण द्यावे मी बघतो....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल नियम 93 अन्वये सूचना दिली होती ती घेण्यात आली नाही. तसेच आजही मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. ती देखील घेण्यात आलेली नाही. कशासाठी या सूचना रोखल्या जात आहेत?

सभापती : मी याबाबतीत बघतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे असे कसे चालले आहे?

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते, ज्या ज्यावेळी आपणा कडून नियम 93 अन्वये सूचना देण्यात येतात त्या त्यावेळी त्यातील महत्वाच्या सूचना मी घेता

`. एखादी सूचना राहिली असेल तर आपण निदर्शनास आणून दिल्यानंतर ती जरुर घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ऑफिसमध्ये काय चालले आहे? काही सन्माननीय सदस्यांच्या तीन-तीन सूचना स्वीकारल्या जातात आमची एकही सूचना स्वीकारली जात नाही. कालही तसेच झाले आजही तसेच झाले.

सभापती :सन्माननीय विरोधी पक्ष नेते, दररोज नियम 93 अन्वये ज्या सूचना येतात त्यामध्ये आपल्या किमान एक,दोन,तीन सूचना असतात.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आमच्या सूचना घेतल्या जात नाहीत. कालही त्या घेतल्या नाहीत. आपले म्हणणे असेल तर यानंतर मी नियम 93 अन्वयेच्या सूचना देणार नाही.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आपण जरुर आपल्या नियम 93 अन्वयेच्या सूचना द्याव्यात त्या सूचनांचा विचार करण्यात येईल्.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ ग्रामपंचायतीत झालेला अपहार.

मु. शी. :सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ ग्रामपंचायतीत झालेला अपहार याबाबत श्री. परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ ग्रामपंचायतीत झालेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये पूर्णपणे चुकीचे उत्तर दिलेले आहे. कुडाळ ग्रामपंचायतीची पहाणी करायला गेलो असताना हिंदू कॉलनीमध्ये जी भिंत बांधली होती ती भिंत नसल्याचे निष्पन्न झाले. भिंत नसताना तेथील उप अभियंत्यांनी व्हॅल्यूएशन करुन, मुल्यांकन करुन त्याचे बिल पास केलेले आहे त्यासंदर्भात चौकशी करणार काय? साकेडी ग्रामपंचायतीमध्ये विहीर खोदली गेली आणि तिच्या बांधकामाचे बिल काढले गेले हे बी.डी.ओ.च्या निदर्शनास आलेले आहे.एवढा पैशाचा अपहार होऊन देखील यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, यामध्ये साडे चार लाख रुपयाचा अपहार झालेला आहे. तेव्हा संबंधित ग्रामपंचायतीवर कोणती कारवाई करण्यात येईल? याची माहिती देण्यात यावी.

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी ज्या कामाचा उल्लेख केलेला आहे तो अकराव्या वित्त आयोगाच्या कामाच्या संदर्भातील आहे. यामध्ये जवळपास 18 कामे होती. ती सगळी कामे झालेली आहेत. प्रश्न असा आहे की, त्यापैकी काही कामाच्या बाबतीत व्हॅल्यूएशन मध्ये फरक पडलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करुन त्यांच्याकडून त्या पैशाची वसुली करण्यात येणार आहे.

सन्माननीय सदस्यांनी विहिरीच्या संदर्भात याठिक्राणी प्रश्न उपस्थित केला. हे खरे आहे की, सन्माननीय सदस्यांची याबाबतीत तक्रार होती. त्याठिकाणी बीडीओ गेले होते तेव्हा तिकडे एम.बी. बुक व इतर माहिती असायला पाहिजे होती ती उपलब्ध नव्हती. उप अभयंत्यांनी या कामाचे व्हॅल्यूएशन केल्यानंतर असे निदर्शनास आले की, दोन लाख रुपयाचे काम झालेले आहे आणि साडेचार लाख रुपयाचे पेमेंट झालेले आहे. एम.बी. बुक व इतर माहिती टेक्निकल सर्व्हिस प्रोव्हाईडरकडे होती. एक्सेस पेमेंट दिले गेले पण सन्माननीय सदस्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने एका महिन्याच्या आत पुन्हा एक्झिक्युटिव्ह इंजिनियरला पाठवून त्या कामाचे व्हॅल्यूएशन केलेले आहे. आठ मिटरचे काम झालेले आहे. साडे चार लाख रुपयाचे काम व्हावयास पाहिजे होते ते निश्चितपणे झालेले आहे. पण हे एम.बी.रेकार्डस् वगैरे जेव्हा जेव्हा अधिकारी त्याठिकाणी गेले त्यावेळी उपलब्ध असणे अपेक्षित होते. पहिल्यांदा जेव्हा अधिकारी गेले होते तेव्हा व्हॅल्यूएशन आणि पेमेंट याच्यामध्ये फरक होता. त्यामुळे निश्चितपणे टी.पी.एस. आणि ग्रामसेवकावर कठोर कारवाई करण्यात येईल. त्यांच्या विभागीय चौकशीचे आदेश आजच देण्यात येतील.

...4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कुडाळ ग्रामपंचायतीच्या सरपंचानी कामामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता दाखविलेली आहे. जवळ जवळ 20 लाख रुपये ग्रामपंचायतीच्या चेकवर स्वत: सहया करुन काढलेले आहेत. त्यामुळे त्या ग्रामपंचायतीमध्ये मोठा भ्रष्टाचार झालेला आहे.तर अशा भ्रष्टाचारी सरंपचावर आणि अन्य सदस्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अन्य सदस्यांवर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही याचे कारण असे की, ज्या व्यक्तीला सही करण्याचा अधिकार आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी सुध्दा याबाबतीत उल्लेख केला होता. त्या अनुषंगाने मी स्वत: जेव्हा हे प्रकरण तपासले तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, विहिरीच्या कामामध्ये जादा पेमेंट झालेले आहे. त्यानंतर विहिरीचे काम ताबडतोब पूर्ण करावे असे आदेश दिले होते. सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, काम न करता पेमेंट झालेले आहे. जोपर्यंत ग्रामसेवक आणि सरपंच अशा दोघांची सही होत नाही तोपर्यंत पेमेंट होऊ शकत नाही. निश्चितपणे त्याची जबाबदारी त्यांच्यावर येते. सरपंच आणि सचिव या दोघांवर निश्चितपणे कारवाई होणार हे मी आधीच सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : त्यांच्यावर काय कारवाई करणार ? माननीय मंत्रिमहोदयांनी या सदनामध्ये असे निवेदन केले आहे की, त्यांनी स्वत: हे प्रकरण पाहिलेले आहे. काम न करता पैसे दिले गेले आहेत असे सांगण्यात आले. याबाबत काय कारवाई करणार ?

श्री. रणजित कांबळे : यामध्ये दोन बाजू आहेत....

श्री. परशुराम उपरकर : यामध्ये अपहार झालेला आहे.

श्री. रणजित कांबळे : यामध्ये जादा पेमेंट झाले आहे असे मी म्हणालो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : यामध्ये पैशाचा भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्ये चौकशी करुन कारवाई करावी.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. ही कामे अकराव्या वित्त आयोगातील आहेत. यामध्ये व्हॅल्यूएशनमध्ये फरक आलेला आहे. त्याबाबत त्यांच्याकडून रिकव्हरी होणार आहे. हा प्रश्न ऑडिट झाल्यानंतर आलेला आहे. ऑडिटमध्ये असा मुद्दा आला की, व्हॅल्यूएशनमध्ये फरक आहे आणि रिकव्हरी करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये जवळपास 8 लाख 58 हजार रुपयांचे काम झाले आणि 35 हजार रुपयांची रिकव्हरी आहे. निश्चितपणे त्यांच्याकडून रिकव्हरी होणारच आहे. हे खरे आहे की, जेव्हा सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली होती तेव्हा गट विकास अधिकारी आणि उप अभियंता तपासणी करण्यासाठी गेले. त्यामध्ये जादा पेमेंट झालेले होते. साडेचार लाख रुपयांचे पेमेंट दिले होते आणि प्रत्यक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

व्हॅल्यूएशन 2 लाख रुपयांचे झाले. जादा पेमेंट देण्याची जबाबदारी सचिवांवर येते. ते पाणी वापर समितीचे सुध्दा सचिव आहेत. तेथील टी.एस.पी. ने मस्टर आणि इतर जी पुस्तके असतात तो रेकॉर्ड उपलब्ध करुन दिला नाही. म्हणून या दोघांवर कारवाई होणार आहे हे मी अगोदर सांगितले आहे. आता त्या ठिकाणी कार्यकारी अभियंता यांना परत पाठविले. जेवढे पेमेंट केले आहे तेवढे काम झालेले आहे. जादा पेमेंट करण्याच्या बाबतीत सचिवावर कारवाई करण्यात येईल तसेच तेथील टी.एस.पी. बदलण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे निवेदन केले की यामध्ये सचिव दोषी आहे. त्यांना तातडीने निलंबित केले पाहिजे. त्यांना निलंबित करुन चौकशी चालू ठेवावी. ते निलंबित झालेच पाहिजेत नाही तर या सदनाला काय किंमत राहणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेता त्या ग्रामसेवकाला ताबडतोब निलंबित करु आणि त्यांच्याबाबतीत चौकशी करु.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सरपंचावर सुध्दा तशी कारवाई केली पाहिजे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सचिवाला निलंबित करण्याचा अधिकार आहे आणि सरपंचावर कारवाई होते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांचे 2005-06 पासूनचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे

मु. शी. : राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांचे 2005-06 पासूनचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, संजय केळकर यांनी "राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांचे 2005-06 पासूनचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील दुसऱ्या ओळीतील 2008-2009 हा उल्लेख वगळण्यात यावा तसेच 759 ऐवजी 746 असे वाचावे.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. अजित शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय सुध्दा आकृतीबंधासारखा दर अधिवेशनात उपस्थित होत आहे. प्रश्न सोपा आणि सरळ आहे. सन 2000 मध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये जी पदे देय आहेत त्यामध्ये वाढ झाल्यास त्यासाठी फक्त तांत्रिकदृष्टया शासनाने मान्यता द्यावयाची. परंतु शासनाकडे मागील चार-चार वर्षापूर्वीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. हा प्रश्न फक्त एक-दोन पदांपुरता मर्यादित नसून हजारो पदे मजूंर आहेत त्यासाठी फक्त टेक्निकली मान्यता द्यावयाची आहे. त्यासाठी चार-पाच वर्षे लागत आहेत. निवदेनात म्हटले आहे की, उच्च स्तरीय समितीची मान्यता अजून प्रलंबित आहे. मी या निमित्ताने विनंती करु इच्छितो की, उच्च स्तरीय समिती अशाप्रकारे प्रत्येक प्रकरणामध्ये दिरंगाई करीत असेल आपण या संदर्भात आपल्या दालनात बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याच्या संदर्भात निर्देश द्याल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी जमेची बाजू अशी आहे की, सन 2005-06, 2006-07, 2007-08 या तीन वर्षात 466 पदांना वित्त विभागाने मंजुरी दिलेली आहे. उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत ही पदे मान्य करुन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी वित्त विभागाची मंजुरी मिळाली असे सांगितले. तेव्हा या संदर्भातील निर्णय येत्या 15 दिवसांत किंवा महिनाभरात घेण्यात येईल असे सांगावे. कारण गेली चार-पाच वर्षे ही पदे रिक्त आहेत. तसेच निवदेनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, ".. बोर्डाने गणित आणि संख्या शास्त्राची 991 पदे मंजूर केलेली आहेत. या पदास वित्त विभागाची मान्यता मिळालेली आहे काय, असल्यास या सर्व पदांच्या बाबतीत 15 दिवसांत किंवा महिन्याभरात आदेश निर्गमित करण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना हा प्रश्न याठिक्राणी तसेच बाहेरसुध्दा माझ्याकडे उपस्थित केला होता. त्या सदंर्भात विभागाने पाठपुरावा केलेला आहे. तसेच या प्रस्तावास उच्चस्तरीय समितीची लवकर मान्यता मिळावी अशी अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, गणित आणि संख्याशास्त्र विषयांची 991 पदे असून त्या पदाची संपूर्ण छाननी झालेली आहे. तेव्हा प्रस्ताव 15 दिवसांत वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/तुकड्याच्या संदर्भात निर्णय न घेणे.

मु. शी. : कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/तुकड्याच्या संदर्भात निर्णय न घेणे याबाबत सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे व जयंत पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे आणि जयंत पाटील यांनी "कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/तुकड्याच्या संदर्भात निर्णय न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या तुकड्या आणि शाळांसाठी "कायम" शब्द काढून टाकण्याच्या संदर्भात दिनांक 20 जुलै 2009रोजी निर्णय घेण्यात आला. प्रश्न असा होता की, एकाच विभागाकडे असलेल्या प्राथमिक, माध्यमिक आणि ज्युनिअर कॉलेजच्या वर्ग आणि तुकडया या दोघांना आपण न्याय दिला. परंतु उच्च माध्यमिक शाळांच्या आणि तुकड्यांच्या बाबतीत "कायम" शब्द काढलेला नाही. त्यामुळे त्यांना न्याय मिळालेला नाही. निवदेनात नमूद करण्यात आलेले आहे की, उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थी हे 6 ते 14 वयोगटात येत नाहीत. मला विचारावयाचे आहे की, वयोगटाचा आणि अनुदान देण्याचा काय प्रश्न आहे. ज्याप्रमाणे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या बाबाबत "कायम" हा शब्द काढून टाकण्यात आला त्याप्रमाणे ज्युनिअर कॉलेजला आणि तुकड्यांना सन 2012-13 मध्ये अनुदानावर आणण्याचा निर्णय एक महिन्याच्या आत घेणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वय 6 ते 14 शिक्षणाचा हक्क आता देशपातळीवर आलेला आहे. आपण 14 वर्षापर्यंत मुक्त शिक्षण असा विषय घेतलेला आहे.

यांनतर श्री.खंदारे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

आठवीला हायस्कूलला जोडलेले आहे आणि दहावीला हायस्कूलला जोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये दिनांक 16.6.2009 ला की, विद्यालयीन शिक्षण कायम विना अनुदानित होते ते शासनाने आणले आहे. दहावीपर्यंत तो निर्णय घेतलेला आहे. उच्च माध्यमिकच्या बाबतीत तसा निर्णय घेतलेला नाही. तसे विचाराधीन नाही.

श्री.कपिल पाटील : ज्या अनुदानित मराठी शाळा आहेत. त्यांना जोडलेल्या नैसर्गिक वाढीमुळे ज्युनिअर कॉलेजेस सुरु केलेली आहेत. त्या सर्व ज्युनिअर कॉलेजेसना शासन अनुदान देणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबत वेगळे उत्तर असू शकत नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : संजय गांधी हायस्कूल,वर्धा या शाळेस नियमबाह्य पध्दतीने व शासकीय अधिका-यांनी संगनमत करुन अधिक रकमेचे वेतन अदा करणे

मु. शी. : संजय गांधी हायस्कूल,वर्धा या शाळेस नियमबाह्य पध्दतीने व शासकीय अधिका-यांनी संगनमत करुन अधिक रकमेचे वेतन अदा करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,विनोद तावडे, भगवान साळुंखे,संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, संजय केळकर, यांनी "संजय गांधी हायस्कूल,वर्धा या शाळेस नियमबाह्य पध्दतीने व शासकीय अधिका-यांनी संगनमत करुन अधिक रकमेचे वेतन अदा करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शासकीय अधिका-याने जवळजवळ 10-12 लाख रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे. यासंदर्भात अनेक वेळा चर्चा झालेली आहे, चौकशी समिती गठित झाली होती, त्या समितीने ऑक्टोबर, 2009 मध्ये शासनाला अहवाल दिलेला आहे. या गैरप्रकाराला कोणकोण दोषी आहे, गैरव्यवहार कोणी केला, गैरप्रकार कोणी केला यासंबंधीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. शासनाने त्या अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करण्याऐवजी निवेदनात दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे की, हे तिन्ही अधिकारी निर्दोष आढळलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्या चौकशी अधिका-यांनी अहवालात नमूद केलेल्या दोषी अधिका-यांना पाठिशी न घालता त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या अधिका-यांच्या संदर्भात चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीनेच दोषारोप सिध्द होत नाही असे म्हटलेले आहे. चौकशी समितीने असा निष्कर्ष काढला असला तरी हे प्रकरण दिनांक 8.10.2010 रोजी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविलेले आहे. त्या विभागाने उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने आता त्यांच्याकडून खुलासा मागवित आहोत. चौकशी समितीने संबंधितांविरुध्द दोषारोपसिध्द होत नाही असे म्हटले असले तरी आता सामान्य प्रशासन विभाग यासंबंधीची चौकशी करीत आहे असा त्याचा अर्थ होतो. त्या विभागाने शंका घेतल्या आहेत, त्याचे निरसन केले जाईल. कोणालाही पाठिशी घालण्याचे कारण नाही, त्यांनी भ्रष्टाचार केला असेल, चुकीचे वागले असतील तर त्याबाबत निश्चित कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शासकीय कर्मचारी व शिक्षकांना केंद्र शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे वाढीव महागाई भत्ता लागू करणे

मु. शी. : शासकीय कर्मचारी व शिक्षकांना केंद्र शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे वाढीव महागाई भत्ता लागू करणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, यांनी "शासकीय कर्मचारी व शिक्षकांना केंद्र शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे वाढीव महागाई भत्ता लागू करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझी या निवेदनाला हरकत आहे. जवळपास 25 लाख कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न वित्त विभागाला विचारला होता. माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे यासंबंधी निवेदन आलेले आहे. शासकीय कर्मचारी, शालेय शिक्षक व सर्व प्राध्यापक यांचा संयुक्त असा हा प्रश्न आहे. या निवेदनात शालेय खात्यामार्फत असे उत्तर आले आहे की, त्यांच्याकडे लागू होईल त्यावेळी तुमचा विचार करु.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा सर्व कर्मचा-यांचा प्रश्न असल्यामुळे हे 93 चे निवेदन वित्त विभागाकडे पाठविण्यास हरकत नाही.

सभापती : मी हे निवेदन प्रलंबित ठेवत आहे. हे निवेदन वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल.

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्हयातील द डहाणू जनता को-ऑप.बँक लि.च्या संचालकांनी पैशांचा केलेला अपहार

मु. शी. : ठाणे जिल्हयातील द डहाणू जनता को-ऑप.बँक लि.च्या संचालकांनी पैशांचा केलेला अपहार याबाबत श्री कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील यांनी "ठाणे जिल्हयातील द डहाणू जनता को-ऑप.बँक लि.च्या संचालकांनी पैशांचा केलेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने या निवेदनामध्ये थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक दोन वरील ओळ क्र.8मध्ये 'नाही' या शब्दाऐवजी 'आहे' असे वाचावे.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.कपिल पाटील : शासनाने आता कार्यवाही सुरु केलेली आहे. परंतु जे मूळ संचालक आहेत ते याला दोषी आहेत. ते सुटता कामा नये. शासनाने सरसकट कारवाई केली आहे. पण जे अपराधी आहेत त्यांच्यावर मात्र वेगळी कारवाई करण्याची आवश्यकता आहे अन्यथा, ते सुटून जातील. तेव्हा भरत राजपूत यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : या बँकेच्या बाबतीत दोन पध्दतीने चौकशी चालू आहे. एक म्हणजे बँकेने दुस-या बँकेत ठेवी ठेवलेल्या आहेत त्याबद्दल माजी आमदार श्री. कृष्णा घोडा आणि इतर 4 जणांविरुध्द 88 ची कारवाई सुरु आहे. भरत रजपूत तक्रालीन उपाध्यक्ष आणि त्यांचे नातेवाईकांच्या नावे कर्ज वाटप केलेले आहे. साधारणत: 9 खातेदारांना कर्जवाटप केले होते. त्या पैकी 8 खातेदारांकडून कर्जाची संपूर्ण वसुली झालेली आहे. एका प्रकरणी नियमाप्रमाणे वसुली चालू आहे. भरत रजपूत याने स्वत: उपाध्यक्ष पदाचा आणि संचालक पदाचा राजीनामा दिला आहे. ही बाब लक्षात घेता काय कारवाई करावयाची हे आपण सांगा.

श्री. कपिल पाटील : या प्रकरणी कायदेशीर कारवाईची अपेक्षा आहे.

श्री. प्रकाश सोळंके : जे कर्ज वाटप झालेले होते त्याची वसुली पूर्णत: झालेली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांची अपेक्षा अशी आहे की, कायद्यानुसार जी कारवाई करणे शक्य आहे ती बाब तपासून घेऊन कारवाई करावी.

श्री. प्रकाश सोळंके : या बाबतीत कारवाई करण्याची कार्यवाही चालू करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : या बँकेने दादर जनता सहकारी बँक आणि चेतना सहकारी बँक या दोन बँकेत पैसे ठेवले होते. या बँकांमध्ये पैसे ठेवल्यानंतर डेप्युटी रजिस्ट्रार, जॉईण्ट रजिस्ट्रार किंवा अे.आर. यांनी त्या बँकेला अशा प्रकारे बँकेत पैसे ठेवता येत नाहीत अशा सूचना दिल्या नाहीत का ? खरे म्हणजे जिल्हा बँकेमध्ये आणि एमएससी बँकेमध्ये पैसे ठेवायला पाहिजे. तेव्हा याबाबतीत डेप्युटी रजिस्ट्रार, जॉईण्ट रजिस्ट्रार आणि अे.आर यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : चेतना सहकारी बँक आणि दादर जनता बैंकमध्ये 2 आणि 5 रु.नोटा असलेल्या रकमेचा भरणा केला. या संदर्भात 88 ची कारवाई केलेली आहे. जे जबाबदार लोक आहेत त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्याची कारवाई चालू आहे. अधिका-यांच्या संदर्भात अधिक माहिती घेऊन कारवाई करण्याची कार्यवाही केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गोरेगाव पूर्व दिंडोशी येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनीच्या माध्यमातून विकासकाला बाजार भावापेक्षा कमी दराने जागा दिल्याबाबत

मु.शी. : गोरेगाव पूर्व दिंडोशी येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनीच्या माध्यमातून विकासकाला बाजार भावापेक्षा कमी दराने जागा दिल्याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्य.मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी "गोरेगाव पूर्व यदिंडोशी येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनीच्या माध्यमातून विकासकाला बाजार भावापेक्षा कमी दराने जागा दिल्याबाबत". या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की कोकणामध्ये मायनिंगला विरोध केला, बिल्डरला विरोध केला तर विकास कसा होणार ? माझ्या माहिती प्रमाणे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत सरकारने रेडीरेकनर नुसार जो दर ठरविला आहे तो 6 हजार रुपये आहे. मात्र विकासकासाठी तो दर 2 हजार रु. इतका दिला. विकासकामुळे राज्याचा विकास होतोय असे आपणास वाटत असेल तर आमचे काही म्हणणे नाही. पण त्यामुळे आज सरकारचे 150 ते 200 कोटी रुपये बुडत आहेत, त्याचा विचार आम्ही करीत आहोत. सरकारने थातूरमातूर उत्तर दिलेले आहे. किती तरी ठेकेदार अर्धवट कामे सोडून गेलेले आहेत. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत लोकांनी 2200 प्र.चौ.फू. दराने घरे घेतली असती. परंतु असे न करता विकासकाला ती 2200 रु. दराने दिली.

नंतर श्री. भोगले.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-7.... श्री.विनोद तावडे....

पुन्हा त्याला शासन संरक्षण का देत आहे? माझ्याकडे सगळी कागदपत्रे उपलब्ध आहेत. मंत्रीमहोदयांनी बैठक लावावी, मंत्रीमहोदयांना मी पटवून देऊ शकतो. यातून विकास होत नाही. मंत्री बिल्डरने कमी रेट दिला हे मान्य आहे काय? आज 6000 रुपये या दराने विक्री केली जात आहे का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, शासन रेट ठरवित नाही. रेडी रेकनरचे रेट आहेत. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, आज रेट जास्त झालेले आहेत. ज्यावेळी 2004 साली ही योजना चालू झाली त्यावेळी कॉन्ट्रॅक्टरने अर्धवट काम थांबविले. तो कॉन्ट्रॅक्टर गेल्यानंतर त्याने क्लेम देण्याचे काम केले. त्याचे म्हणणे होते की, जे काम केले त्याची किंमत जास्त होते. एसपीपीएलने सांगितले की, एवढी रक्कम होत नाही, तुम्ही मागितलेली रक्कम योग्य नाही. एसपीपीएल आणि प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की, सद्यस्थितीत आणखी पैसे टाकण्यापेक्षा as it is basis वर प्रकल्प घेता आला तर त्यातून पैसे उपलब्ध होतील आणि ते पैसे इतर प्रकल्पासाठी वापरता येतील. एसपीपीएलने प्रकल्प पूर्ण करण्याचे काम केले. त्यामध्ये एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या जागेवरील झोपडपट्टयांसाठी पीएपी केला. एमएसआरडीसी, पीडब्ल्यूडी, बीएमसी यासाठी पीएपी करण्यात आला. रेटी रेकनरचा आधार धरुन बाय टेंडरनुसार जे हायएस्ट बिडर होते त्यांनी रेडी रेकनरपेक्षा कमी रेट कोट केला होता. बाय मिन्स ऑफ निगोसिएशनने एसपीपीएलने समिती केली. ज्या समितीमध्ये वित्त विभागाचे प्रधान सचिव श्री.सुबोधकुमार, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री.स्वाधीन क्षत्रिय, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.देबाशिष चक्रवर्ती, मार्केटिंग मॅनेजर श्री.डी.एस.मालवणकर यांचा समावेश होता. निगोसिएशन करुन बाय टेंडर केले आहे. आज बाजारामध्ये त्यावेळेपेक्षा जास्त किंमत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यावेळी रेडी रेकनरचा रेट काय होता? माझ्याकडे कागदपत्रे उपलब्ध आहेत. मंत्रीमहोदयांना मी हे सिध्द करुन दाखवू शकतो की, ज्यावेळी टेंडर काढले जाते त्यावेळी कमीत कमी किंमत कोट केली जाते. रेडी रेकनरप्रमाणे ती किंमत कोट केली नव्हती. रिंग करुन विकासक पुढे येतात. आपापसात ठरवितात. त्यातलाच एक वरची किंमत दाखवतो. त्यावेळी रेडी रेकनरचा रेट काय होता? तो शासनाला मान्य होता का? रेडी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-7.... श्री.विनोद तावडे....

रेकनरचा रेट त्यावेळी काय होता? या प्रकरणात शासनाचे 150 कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान कसे झाले आहे हे मंत्रीमहोदयांना मी पटवून देऊ शकतो.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, रेडी रेकनरचा रेट 1993 रुपये होता. त्याच रेटनुसार निगोसिएशन केले होते. त्यांनी कमी रेट कोट केला. परंतु निगोसिएशन करुन रेडी रेकनरचा पॅच करण्यात आला. यामध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की त्यांच्याकडे अधिक माहिती आहे. हा प्रकल्प मुळात 2004 साली झाला. 2006 मध्ये वाटप पण झाले असावे अशी स्थिती आहे. गैरप्रकार झालेला नाही. सन्माननीय सदस्यांकडे या संदर्भात अधिक माहिती असेल तर निश्चितपणे ती घेतली जाईल आणि त्याबाबत संबंधित लोकांकडून माहिती मागविली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कुंभारमाठ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील स.क्र.12/44 मधील झाडे विनापरवानगी तोडली जाणे

मु. शी. : कुंभारमाठ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील स.क्र.12/44 मधील झाडे विनापरवानगी तोडली जाणे याबाबत सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (वन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "कुंभारमाठ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील स.क्र.12/44 मधील झाडे विनापरवानगी तोडली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, स.क्र.12/44 मधील आंबा आणि सागाची झाडे तोडण्यास परवानगी दिली होती. सावंतवाडी वन विभागातील वन संरक्षक यांनी चौकशी केल्यानंतर त्यांच्या पंचनाम्यामध्ये जी झाडे तोडली गेली तो स.क्र.12/44 नसून 12/24 व 12/62 आहे. या सर्व्हे क्रमांकातील झाडे परवानगी न घेता तोडली त्यांच्यावर काय कारवाई केली. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला का? शासनाने निवेदनामध्ये म्हटले आहे की, वनपाल, वनक्षेत्रपाल-कुडाळ, वनपाल-मालवण व वनसंरक्षक-कांदळगाव यांच्यावर कारवाई करणार आहोत. 3 मार्च, 2008 रोजी परवानगी दिली आणि 23.1.2009 रोजी चौकशी केली. आज 8.4.2010 पर्यंत चौकशी होऊनही या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई करण्यास का विलंब होत आहे?

नंतर टी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

त्यांची झाडे परवानगी नसताना तोडली व वाहतुकीचा पास देखील बनविला. अशा प्रकारे संबंधित अधिकारी रजेवर असताना बोगस सही करुन झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली त्यांच्यावर आजपर्यंत कारवाई का होत नाही ? वास्तविक तक्रार प्राप्त झाल्यानंतर वन विभागातर्फे परवानगी न घेता झाडे तोडणाऱ्यांवर तीन दिवसाच्या आत कारवाई करण्यात येते. या प्रकरणात मात्र तीन वर्षात सुध्दा कारवाई झालेली नाही, ही कारवाई कधी होणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सर्व्हे क्र. 12/44 च्या अनुषंगाने परवानगी दिली गेली व झाडे तोडण्यात आली. यामध्ये चूक फक्त एवढीच आहे की, त्या सर्व्हे क्रमांकाच्या बाजूला असलेल्या सर्व्हे क्रमांकाचा उताऱ्यावरील सर्व्हे क्रमांक घालण्याचे राहून गेले. म्हणून ज्यांची झाडे आहेत त्या श्री. लक्ष्मी बन्सीधर साळगांवकर यांनी यासंबंधी कोणतीही तक्रार केलेली नाही तर तक्रारदार श्री. बडेकर, ज्यांची सॉ-मिल आहे व त्या सॉ-मिलच्या आवारात अशा प्रकारे अनधिकृत व बेहिशेबी झाडे पडलेली होती व त्या ठिकाणी संबंधित आरएफओ यांनी धाड टाकली होती. त्याचा राग मनात ठेवून थोडीसी टीप मिळाल्यामुळे सॉ-मिलधारक श्री. बडेकर यांनी ही तक्रार केलेली आहे. असे असले तरी यासंबंधीची चौकशी झालेली आहे. वास्तविक यामध्ये जमीनमालक, शेतकरी अथवा इतर कोणीही यांनी तक्रार केलेली नाही. तरी देखील याप्रकरणाची मोबाईल स्क्वॉडकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा, शिस्त व अपिल, नियम 1979 च्या कलम 8 मध्ये सुचविल्यानुसार मेझर पनिशमेंटचे कलम लावून संबंधित आरएफओ आणि वनपाल यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार सीएफ, कोल्हापूर यांना आहेत. त्यानुसार ते कारवाई करीत आहेत. आणि वनरक्षकांवर कारवाई करण्याचे अधिकार हे संबंधित डीएफओचे असल्याने ते सुध्दा आवश्यक ती कारवाई करीत आहेत.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, चुकून 7/12 च्या उताऱ्यावरील क्रमांक टाकण्याचे राहून गेले. परंतु यासाठी आवश्यक असलेला वाहतूक पास देखील माझ्याकडे आहे. त्यावर सर्व्हे क्रमांक सुध्दा घातलेला आहे. अशा प्रकारे विना परवानगी झाडे तोडली म्हणून त्याची चौकशी माझ्या माहितीप्रमाणे दि. 23.12.2008 रोजी वनसंरक्षक, सावंतवाडी यांनी केलेली आहे व त्यात सुध्दा ही बाब निष्पन्न झालेली आहे. सन 2008 पासून हे

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

प्रकरण सुरु असताना अद्यापही संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब का होत आहे ? तसेच कांदळगांवचे वनक्षेत्रपाल रजेवर होते त्यांच्या रजेसंबंधीची डायरी माझ्याकडे आहे. ते रजेवर असताना त्यांनी सही केली म्हणून त्यांच्यावर देखील कारवाई करणार काय ? तसेच या तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबतचे आदेश मंत्री महोदय देतील काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, त्यांनी ही परवानगी रितसर घेतलेली होती व वाहतुकीचा परवाना सुध्दा घेतलेला होता. झाडांची संख्या सुध्दा तेवढीच आहे, फक्त 7/12 चा क्रमांक टाकण्याचे राहून गेले होते. तरी देखील मघाशी सांगितल्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा, शिस्त व अपिल, नियम 1979 च्या कलम-8 नुसार मेजर शिक्षा देण्यासंबंधीचे आदेश दिलेले आहेत.

श्री. विनोद तावडे : महोदय, कोकणात 7/12 चा क्रमांक टाकण्याचे राहून गेल्याचे परिणाम केवढे भयंकर होतात हे कोकणातील मंत्री महोदयांनाही चांगलेच ठाऊक आहे.....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. नियम 93 अन्वयेची निवेदने आता संपलेली आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. पद्माकर वळवी (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई (बृहन्मुंबई,ठाणे आणि रायगड जिल्हयाकरिता) यांचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव

समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करु इच्छितो.

शुक्रवार, दिनांक 9 एप्रिल,2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठराव व पुर:स्थापवनार्थ असलेल्या विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 8 एप्रिल, 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 145 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 145 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>अशासकीय विधेयक</u>

सन 2010 चे वि.प.वि.क्र.1 श्री. कपिल पाटील, वि.प.स. 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

1)ठराव क्रमांक 3 श्री. रामनाथ मोते, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) ठराव क्रमांक 15 श्री. रामदास कदम, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) ठराव क्रमांक 67 श्री. रमेश शेंडगे,वि.प.स. 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावांचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे,असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्यांचा मुद्दा मांडावा.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 2853 च्या दुस-या उत्तरात म्हटले आहे की, "वृत्तपत्रामध्ये छापून आलेली बातमी वस्तुस्थितीशी विपर्यस्त असल्याचे आढळून आलेले आहे". तसेच तिस-या उत्तरात म्हटले आहे की, "ॲग्रो केमिकल्स पॉलिसी ग्रुपने याबाबत चुकीची बातमी छापून आल्याचे मान्य केले असून प्रश्न उद्भवत नाही." असे उत्तर देण्यात आलेले आहे. या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामुळे ख-या अर्थाने प्रश्न उद्भवतो आहे. माझ्याकडे यासंदर्भातील सर्व पुरावे आहेत. वृत्तपत्रात यासंदर्भातील माहिती छापून आलेली आहे. या बातमीच्या हेडींगमध्ये असे म्हटले आहे की, "बनावट किटक नाशके बनविणा-या टोळीचा पर्दाफाश." या बोगस फॅक्टरीवंर कृषी अधिका-यांनीच छापे टाकलेले आहेत. किटक नाशके बनविण्याचे लायसन्स या ठिकाणच्या फॅक्टरीकडे नव्हते. कृषी अधिकारी श्री. बांबळ यांनी माहिती दिलेली आहे. त्यांनी म्हटले आहे की, युनोफ्रॉग नावाच्या कंपनीच्या नावाने बनावट किटक नाषक औषधे तयार केलेली आहेत. ही सर्व माहिती व त्यासंदर्भातील फोटो मी आपल्याकडे पाठवितो आहे. या कंपनीवर कृषी अधिका-यांनी छापा मारतांनाचे फोटो सुध्दा माझ्याकडे आहे. मी सर्व माहिती व फोटो आपल्याकडे पाठवितो. अशा प्रकारची कोणतीही बाब घडलेली नाही असे जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. त्यामुळे या बोगस कंपनीवर कारवाई करण्यात यावी अशी माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासात केवळ सन्माननीय ग्रामविकास राज्यमंत्री श्री. रणजित कांबळे यांनी योग्य उत्तर दिलेले आहे परंतु बाकी सगळया प्रश्नांची योग्य उत्तरे या ठिकाणी मिळालेली नाहीत. यामध्ये मंत्रीमहोदय दोषी आहेत असे नसून अधिकारी दोषी आहेत. अधिका-यांनीच खरे म्हणजे माननीय मंत्रिमहोदयांची तसेच सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण लक्ष घालावे अशी विनंती आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती :सन्माननीय कृषी मंत्र्यांनी यासंदर्भात स्व्त: लक्ष घालावे. या अनुषंगाने विभागाकडून उत्तरे येतांना ती चुकीची व अपूर्ण दिली गेली असेल तर त्याबाबतीत संबंधितांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये "बातमी विपर्यस्त आहे, 1100 कोटीचे यामध्ये नुकसान झालेले नाही." कृषी विभागाचे अधिकारी बोगस किटक नाशके तयार करणा-या कंपनीवर छापे टाकत आहेत हे चांगल्या कामाचे लक्षण आहे.

सभापती : आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक घेण्यात येईल.

...6..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :दुषित पाणी पुरवठयामुळे पुणे शहरात पसरलेले रोगराईचे वातारवण

मु. शी. :दुषित पाणी पुरवठयामुळे पुणे शहरात पसरलेले रोगराईचे वातारवण यासंबंधी श्रीमती वंदना चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्हयातील खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत अनेक वर्षापासून दूषित पाणी पुरवठा होत असणे, माहे जानेवारी, 2010 मध्ये खडकी शहरामध्ये पन्नासहून अधिक रुग्णांना विषमज्वराची लागण झाली असल्याने उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल करावे लागणे, सद्य:स्थितीत जिल्हा रुग्णालयामध्ये एकही खाट शिल्लक नसणे, याप्रकरणी शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, शासनाने याबाबत त्वरित चौकशी करुन रुग्णांवर तातडीने औषधोपचार करण्याची आवश्यकता, तसेच खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील नागरिकांना शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये "खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत जलजन्य आजाराचे माहे जानेवारी, 2010 मध्ये 11 रुग्ण, फेब्रुवारी 2010 मध्ये 34 रुग्ण व मार्च, 2010 मध्ये विषमज्वराचे 32 रुग्ण आढळून आले होते" असे म्हटले आहे. त्या विभागातील पाण्याच्या लाईन्स फुटल्या, ड्रेनेज लाईन्स फुटल्या, त्यामुळे ड्रेनेजमधील दूषित पाणी जल वाहिनीमध्ये गेल्यामुळे ही परिस्थिती उदभवली आहे. ही परिस्थिती या विभागामध्ये अनेक दिवसांपासून आहे. या विभागातील जल वाहिनी 100 पेक्षा जास्त वर्षांची झालेली आहे. त्या भागामध्ये फायर फायटींगवर पाण्याचे लिकेज काढले, पाण्यातील क्लोरीनचे प्रमाण वाढविले अनधिकृत नळ जोडण्या काढल्या, त्यामुळे रुग्णांची संख्या कमी झाली असे आपण म्हणत आहात.माझा प्रश्न असा आहे की, आपण अशाप्रकारे फायर फायटींग किती वर्षे करीत राहणार आहात. 100 वर्षे जुनी झालेली पाईप लाईन आहे. त्याकरिता नव्याने आर्थिक तरतूद करुन महानगरपालिकेला ती बदलण्यास सांगणार काय? त्याकरिता महानगरपालिका पाणीपट्टी वसूल करते. दुसरा प्रश्न असा की, आपण झोपडपट्टीमुक्त शहर करावयाचे म्हणत आहात. परंतु केंद्र सरकार व राज्यसरकारच्या अनेक योजना या कँन्टोंमेंट बोर्डाला लागू नाहीत. त्याकरिता हे शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहे की नाही?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दोन महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. ही पाईपलाईन 80 ते 90 वर्षे इतकी जुनी आहे. त्यामुळे सातत्याने त्यामधून लिकेज होत असते. त्यामुळे पाणी दूषित होत असल्यामुळे त्यामधून आजार उदभवतात. त्याकरिता ही पाईपलाईन आपण बदलणार की नाही असा त्यांचा प्रश्न आहे. मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, या खडकी परिसरात चतुश्रृंगी येथे पाण्याची टाकी आहे. त्या पाण्याच्या टाकीपासून 18 इंच व्यासाची 5 कि.मी. ची पाईपलाईन खडकी कॅन्टोन्मेंट एरीयामध्ये आणून ठेवली आहे. त्याठिकाणी 20 लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी आहे तिथपर्यंत ही पाईपलाईन आणली आहे. त्यानंतर त्यामधून डिस्ट्रिब्युशन लाईन कॅन्टोन्मेंट एरीयासाठी दिली आहे. हा संपूर्ण एरीया प्रोहिबिटेड समजला जातो, व तो केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे, तो सैन्य दलाशी संबंधित आहे. त्या एरीयामध्ये पाण्याच्या वितरणाव्यतिरिक्त किंवा पाण्याची सेवा देण्याव्यतिरिक्त महानगरपालिकेला अन्य कोणत्याही प्रकारची कामे करु दिली जात नाहीत. त्यामध्ये रस्ते करणे, दिवा बत्ती, पथ व्यवस्था करणे ही सर्व कामे कॅन्टोन्मेंट बोर्डामार्फत केली जातात. त्यामुळे पाणी वितरणाव्यतिरिक्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. भास्कर जाधव...

अन्य कोणतीही कामे महानगरपालिका करावयास गेल्यास या बोर्डाकडून महानगरपालिकेला सहकार्य मिळत नाही. म्हणून महानगरपालिकेने बोर्डाला दि.26.11.2007 व 14.6.2008 रोजी विनंती केली आहे की, आम्ही 25 लाख लिटरची मोठी पाण्याची टाकी बांधून देतो. त्या भागामध्ये पाण्याची लाईन टाकून तिचे मेंटेनन्स तुम्ही करा. ही विनंती बोर्डाने मान्य केली तर हा प्रश्न निश्चितपणे सुटेल असे मला वाटते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. गेल्या तीन वर्षापासून त्या पाईपलाईनची डागडुजी पुणे महानगरपालिकेने करावयाची की कॅन्टोन्मेंट बोर्डाने करावयाची याचे भांडण सुरु आहे. पाण्याची टाकी बांधण्यासाठी साडे तीन कोटींचे टेंडर मंजूर झाले आहे.परंतु त्यासाठी बोर्ड जागा देत नाही. पुणे महानगरपालिकेला कॅन्टोन्मेंट बोर्डाला पटविणे जमत नाही. आपले नेते माजी संरक्षण मंत्र्यांचा या कामासाठी आपण उपयोग करुन घेतला पाहिजे. पुणे शहरातील 80 टक्के औषधे ही पोटातील आजारासाठी विकली गेली आहेत. आणि हा आजार दूषित पाण्यामुळे होत असल्याचा हेल्थ रिपोर्ट आहे.त्यामुळे कॅन्टोन्मेंट बोर्ड सहकार्य देत नाही असे म्हणून भागणार नाही. त्यासाठी आपण कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न किती दिवसात सोडविणार?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. तशाप्रकारचा प्रयत्न केला जाईल. परंतु त्या बैठकीला बोर्डाचे अधिकारी येतील की नाही याबद्दल साशंकता वाटते.

श्री. विनोद तावडे : याबाबत सरकार कसे हतबल होते?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती : माननीय राज्यमंत्र्यांनी राष्ट्रीय पातळीवर डिफेन्स मिनिस्टरच्या पातळीवर एखादी मिटिंग आयोजित करता आली तर तसा प्रयत्न करावा. मला वाटते आपण ते करु शकतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे तो प्रयत्न केला जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभपती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी हतबलता व्यक्त केली. मी समजू शकतो पण माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारु इच्छितो की, या पाईपलाईमधून जाणारे जे पाणी आहे त्यांचे सॅम्पल वारंवार विविध प्रकारच्या आजाराच्या संदर्भात इकोलाय आणि टायफाईडच्या संदर्भात टेस्ट करण्यात येते काय? तसे करण्यात येत नसल्यास या पाण्याची तशा प्रकारची टेस्ट करुन जे कोणी ते पाणी वापरतात त्यांना तशी खबरदारी घेण्याच्या सूचना देणार काय आणि हा कार्यक्रम राबविणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या टेस्ट वारंवार घेतल्या जातात. या टाकीतून केवळ याच विभागाला पाणी जात नाही तर रेंजहिल, शिवाजीनगर, बालेवाडी पाषाण,औंध, सूसगाव, बाणेर इत्यादी परिसराला जाते. सभापती महोदय, ही अडचण कां उदभवली? तर या कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत फेव्हरब्लॉक टाकण्याचे काम सुरु होते त्यावेळेला ही पाईपलाईन लिकेज झाली, त्यांनी ती बंद केली नाही, त्यामुळे त्या पाण्यामध्ये कचरा व घाण जाऊन ते पाणी दुषित झाले. सभापती महोदय, यासंदर्भात अधिक प्रश्न उपस्थित केले जातील असे मला वाटले होते. त्या प्रश्नांची उत्तरे मला द्यावयाची आहेत. यासंदर्भात अनेक प्रश्न आहेत. तेथे पाणीपट्टी वसूल होत नाही. अनधिकृत कनेक्शन जवळ जवळ चार ते साडेचार हजार आहेत. अधिकृत कनेक्शन्स फक्त तीनशे आहेत. साडेसात ते आठ लाख रुपये वार्षिक पाणीपट्टी आहे. जवळ जवळ 70 ते 80 लाख रुपये पाणीपट्टीचे महानगरपालिकेला येणे बाकी आहे. वसुलीला गेल्यानंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना वाईट तऱ्हेची वागणूक दिली जाते. या सगळया पार्श्वभूमीवर सभापती महोदय, आपण सूचना केल्याप्रमाणे डिफेन्स मिनिस्टरकडे तर प्रयत्न करुच परंतु या राज्याचा प्रतिनिधी म्हणून, मंत्रिमंडळातील एक सदस्य म्हणून सुरुवातीला मी माझ्या लेव्हवलर यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहे आणि मला असे वाटते की,त्यामध्ये आपण यशस्वी देखील होऊ.

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न अनुत्तरीत राहिलेला आहे. माझा दुसरा प्रश्न असा होता की, केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या योजना आपण महानगरपालिकेत राबवू शकतो पण कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत राबवू शकत नाही. उदाहरण द्यावयाचे झाले तर खडकीमध्ये रेल्वे रुळ आहे त्याच्या एका बाजूला महानगरपालिका आहे आणि दुसऱ्या बाजूला कॅन्टोंन्मेंट बोर्ड आहे. महानगरपालिकेतील झोपडपटयांमध्ये व्यवस्थित कनेक्शन्स आहेत. फक्त उजवीकडच्या बाजूला कॉन्टोंन्मेंट बोर्डाच्या हद्दीत पाण्याचे कनेक्शन्स नाहीत. अनधिकृत कनेक्शन्स घ्यायची लोकांना हौस आलेली नाही. त्यांना पाणीच मिळत नाही. म्हणून त्यांना ते करावेच लागते म्हणून या दृष्टीने केंद्र शासनाकडे काही पाठपुरावा करण्यात येईल काय? जेएनयुआरएमची योजना असेल, बीएसयुपीची योजना असेल अशा विविध योजना असतील, झोपडपट्टीसाठी 2.5 च्या एफएसआयच्या योजना असतील या योजना कॉन्टोंन्मेंट बोर्डाच्या हद्दीत लागू करण्यासाठी शासन पाठपुरावा करील काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वी म्हटल्याप्रमाणे या सगळया विषयामध्ये या विषयाचासुध्दा विचार केला जाईल.

...3.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील नाटय,चित्रपट व तमाशा या क्षेत्रातील कलावंताना वृध्दापकाळात मिळणारे तुटपुंजे वेतन.

मु. शी.: राज्यातील नाटय,चित्रपट व तमाशा या क्षेत्रातील कलावंताना वृध्दापकाळात मिळणारे तुटपुंजे वेतन यासंबंधी श्री. संजय दत्त,चरणसिंग सप्रा, प्रतापसिंह मोहिते-पाटील, सय्यद जमा, जयप्रकाश छाजेड, प्रा. सुरेश नवले,सर्वश्री राजन तेली, सुभाष चव्हाण,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील नाट्य, चित्रपट व तमाशा या क्षेत्रातील कलावंतांना वृध्दापकाळात मिळणारे निर्वाह वेतन अत्यंत तुटपुंजे म्हणजेच 500 रुपये इतके असणे, त्यात अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय खर्च इत्यादी गरजा लक्षात घेऊन निर्वाह वेतनात वाढ करण्याची गरज असणे, राज्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या कलावंतांचे जीवन आरोग्य, विमा आणि आवश्यक तेवढे निर्वाह वेतन मिळत नसल्याने अत्यंत हलाखीत जात असणे, वृध्दत्व आणि आजारपणामुळे त्यांचा प्रवास दवाखाना ते घर असाच चालू असणे, त्यामुळे त्यांची अतिशय दयनीय अवस्था होणे, आयुष्याच्या शेवटच्या क्षणी त्यांच्या जीवनाची वाताहत होणे, राज्यातील जेष्ठ रंगकर्मी, तमाशा व चित्रपट कलावंत जयश्री गडकर, मास्टर भगवान , गणपत पाटील, लावणी सम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग अशा एकेकाळी रंगभूमी गाजवणाऱ्या या कलावंताचे अश्रु पुसण्यास देखील कोणी धजावले नसणे, अशीच स्थिती पार्श्वगायक प्रल्हाद व विठ्ठल शिंदे आणि अनेक वृध्दकलावंतांची असणे, आयुष्यभर रसिकांचे मनोरंजन करणाऱ्या जेष्ठ रंगकर्मीचा, तमाशा व चित्रपट कलावंतांचा मृत्यू अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत होत असल्याने शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेवून वाढत्या महागाईचा विचार करता त्यांच्या निर्वाह वेतन कमीत कमी 5,000 रुपयांपर्यंत वाढ करावी तसेच निवृत्ती वेतन व वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत त्यांच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा विचार करुन त्यांना आधार देण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संजय दत्त : सभापती महोदय, एका अत्यंत संवेदनशील विषयावर शासनाचे लक्ष वेधण्याची संधी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले मनापासून आभार मानतो. सभापती महोदय, आपले आयुष्य या राज्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी वेचणाऱ्या या कलावंताना आरोग्य,विमा आणि आवश्यक निर्वाह वेतन मिळत नसल्याने अखेरचे दिवस अत्यंत हालाखीत काढावे लागतात. सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी मी या विषयावर, या सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी त्या चर्चेमध्ये भाग घेतला होता. सभापती महोदय, मला खेदाने सांगावेसे वाटते की, त्या वेळचे माननीय मंत्रिमहोदय, श्री. रणजितसिंह पाटील यांनी जे आश्वासन दिले होते, त्यासंबंधीचे रेकॉर्ड माझ्याकडे आहे. त्याची अंमबजावणी आजपर्यंत झालेली नाही हे खदाने म्हणावे लागते. 14 वर्षानंतर मानधनात वाढ करण्यात आली मात्र 14 वर्षातील महागाईचा विचार केला नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त .....

इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महागाई निर्देशांकानुसार दर सहा महिन्यांनी वाढ केली जाते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या मानधनामध्ये जी वाढ करण्यात आली आहे ती अत्यल्प व तुटपुंजी असल्यामुळे महागाई निर्देशांक डोळ्यासमोर ठेऊन शासन त्यामध्ये वाढ करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, यासंदर्भात मागे ज्यावेळी चर्चा झाली होती त्यावेळी या सभागृहाचे जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एक चांगली सूचना केली होती की, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला या कलाकारांच्या बँक अकाऊंटमध्ये इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सिस्टीमव्दारे हे मानधन जमा व्हावयास पाहिजे. तत्कालीन मंत्रिमहोदयांनी ते मान्य केले होते परंतु त्याची अजून अंमलबजावणी झालेली नाही. तिसरा प्रश्न असा आहे की, आपण या कलाकारांची केस हिस्ट्री पाहिली तर हे सर्व कलाकार वृध्द असून त्यांच्याकडे औषधोपचारासाठी पैसे नसतात. त्यांच्यासाठी मेडिकल हेल्थ इंश्योरंस लागू केला जाईल काय ? त्यांचे मानधन वाढविणार काय ? त्यांच्या खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सिस्टिमव्दारे मानधन जमा करणार काय ? त्यांना मेडिकल हेल्थ इंश्योरंस लागू केला जाईल काय ? असे तीन प्रश्न मी विचारलेले आहेत. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी मी विनंती करतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनांची कदर करीत असताना मला असे सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र शासनाने नेहमीच संस्कृतीचे जतन, संवर्धन करणाऱ्या कलावंतांची कदर केलेली आहे आणि वारंवार त्यांना मदत करण्याची सुध्दा भूमिका घेतलेली आहे.

श्री. विनोद तावडे : अमिताभ बच्चन आले की पळून जातात. असा सन्मान होतो काय ?

श्री. दिवाकर रावते : अमिताभ बच्चन कलाकार नाहीत काय ? ते आले की पळून जातात.

प्रा. फौजिया खान : मी त्याबाबत काहीच सांगितलेले नाही. कृपया सन्माननीय सदस्यांनी अडथळा निर्माण करु नये.

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी मला उद्देशून बोलावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी तीन प्रश्न विचारलेले आहेत. पहिला प्रश्न मानधनामध्ये वाढ करणार काय असा विचारलेला आहे. याबाबत निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे 1 एप्रिल, 2009 पासून मानधन दुप्पट केलेले आहे.

श्री. संजय दत्त : त्यामध्ये वाढ करणार काय ?

प्रा. फौजिया खान : मानधनामध्ये जी वाढ केलेली आहे त्यानुसार वर्ग-अ श्रेणीसाठी 1400 रुपये, वर्ग-ब श्रेणीसाठी 1200 रुपये आणि वर्ग-क श्रेणीसाठी 1000 रुपये याप्रमाणे मानधनामध्ये वाढ केलेली आहे. तरीही सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी आपल्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवू शकते. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर बाबत विचारलेला आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, अगोदर याबाबत सेंट्रलाईज्ड पध्दत होती परंतु आता ती पध्दत डिसेंट्रलाईज्ड करुन माननीय पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार जिल्हा पातळीवर एक समिती स्थापन केलेली आहे. त्या समितीमध्ये अध्यक्षांव्यतिरिक्त 4 अशासकीय सदस्य आहेत. ही पध्दत डिसेंट्रलाईज्ड झालेली आहे. बीडीएस सिस्टीमधून उशीर होण्याचा प्रश्न नाही. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर सुविधेची गरज नाही असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न त्यांना मेडिकल हेल्थ इंश्योरंस देणार काय याबाबत विचारला. आरोग्य विभागाच्या माध्यमातून आता जी नवीन राजीव गांधी आरोग्यश्री योजना प्रस्तावित होत आहे त्यामध्ये सगळ्यांना हेल्थ कार्ड देऊन या सगळ्यांच्या उपचारासाठी एक मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

डॉ. दीपक सावंत : ती योजना फक्त पाच जिल्ह्यांसाठी आहे. ती योजना संपूर्ण महाराष्ट्रासाठी नाही.

यानंतर श्री. अजित शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे पूर्ण महाराष्ट्रासाठी होणार आहे. सुरुवातीस आपण 6 जिल्ह्यामध्ये पायलट प्रोजेक्ट घेऊन महाराष्ट्रात लागू करणार आहोत. यामध्ये कलावंत आणि दुसऱ्या प्रवर्गाचा विचार होणार आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले हे सरकार कलाकांराची फार काळजी घेत आहे. मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, आपण जिल्हास्तरावर समिती स्थापन केली. परंतु या समितीच्या बैठका होत नसल्यामुळे कलाकारांना खेपा माराव्या लागतात. यामध्ये त्यांना मिळत असलेल्या 500 रुपये मानधनापैकी 400 रुपये प्रवासासाठी खर्च होतात शिवाय त्यांना मानसिक त्रास होतो तो वेगळाच. रत्नागिरी जिल्ह्यात अशा घटना घडलेल्या आहेत. कलाकारांना जे 500 रुपयांचे मानधन देण्यात येते ते पाहता आजच्या महागाईच्या काळात ते कितपत योग्य आहे हे समजत नाही. त्यापेक्षा हे मानधन न दिलेले बरे असे त्यांना वाटते. तेव्हा कलाकरांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. अ वर्ग कलाकारांसाठी 5 हजार रुपये, वर्ग "ब" साठी 4 हजार रुपये आणि वर्ग "क" साठी 3 हजार रुपये अशाप्रकारे मानधनात वाढ करण्यात येईल काय ? कलावंतांना वेळेवर मानधन मिळत नाही. कलाकारांना मिळणारे मानधन त्यांच्या बँकेत जमा करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. तेव्हा महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या अकाऊंटमध्ये मानधन जमा करण्यात येईल काय ? जिल्हा स्तरीय समितीच्या बैठका होत नसल्यामुळे कलाकारांसंबंधीच्या प्रस्तावास मंजुरी मिळत नाही. कलाकार निवडीसंदर्भातील निकषामध्ये सुधारणा करणात आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, कलावंताना वेळेवर मानधन मिळण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कलाकांराना वेळेवर मानधन मिळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीमच्या माध्यमातून काही करणे शक्य होत असेल तर ते निश्चितपणे करण्यात येईल. याठिकाणी सांगण्यात आले की, कलाकार निवडीच्या संदर्भातील जिल्हास्तरीय समितीच्या बैठका होत नाहीत त्यामुळे कलावंताना रखडावे लागते. कलाकार निवडीसंदर्भातील जी समिती आहे त्यामध्ये काही निकष ठरविण्याची आवश्यकता आहे. तमाशा-शाहीर-लोककला, नाटय व चित्रपट, भजन व कीर्तन, नृत्य व संगीत या क्षेत्रातील लोक समितीवर आहेत. जे कलावंत आहेत त्यांच्यासाठी काही स्पेसिफीक पॅरामीटर ठरविण्याची आवश्यकता आहे. कलाकारांचा परफॉर्मन्स कसा आहे....(अडथळा)..

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

कलाकारांना वेळेवर मानधन मिळेल याची काळजी घेण्यात येईल. तसेच शासनाने वेळोवेळी आजारी असलेल्या कलाकारांना मदत केलेली आहे. माझ्याकडे काही नावे आहेत ती वाचून दाखविते. श्रीमती विठाबाई नारायणगावकर यांना तीन वेळा तत्कालीन मंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी त्यांना मदत केली होती. तसेच श्री.नारायणराव सुर्वे यांना देखील मदत केलेली आहे. याशिवाय अनेक कलावंताना हृदय शस्त्रक्रियेसाठी मदत केलेली आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,आमच्या कोकणामध्ये विशेषत: दक्षिण कोकणामध्ये दशावतार कला सादर केली जाते.

यानंतर श्री.खंदारे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

माझा प्रश्न असा आहे की, कोकणातील दशावतार कला सादर करणा-या कलाकारांना अ श्रेणीमध्ये घातले जाईल काय आणि कलावंतांची वर्गवारी करुन 1400 रुपये, 1200 रुपये आणि 1000 रुपये इतके मानधन दिले जाते ते दुप्पट केले जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मानधन ठरविण्यासाठी काही प्रॉपर निकष आहेत. या कलाकारांचे मानधन दुप्पट केले जाईल काय असा प्रश्न विचारण्यात आला आहे. या कलाकारांचे मानधन वाढवून एक वर्ष सुध्दा झालेले नाही. त्यामुळे मानधन दुप्पट करण्याचा विषय मी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमोर ठेवीन.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या कलावंतांच्या श्रेणी करुन त्यांना शासनाच्यावतीने मानधन देण्याची ही योजना आहे. याबाबत प्रामुख्याने असा विचार आहे की, हा कलावंत जेव्हा रंगमंचावर आपली कला सादर करतो त्यातील त्याचा एकूण जो कालावधी आहे त्या कालावधीत रंगकर्मी म्हणून मिळणारे जे उत्पन्न आहे ते इतरांच्या मानाने कमी असते. दुसरी गोष्ट अशी की, तो कलावंत मिळविता असतो तोपर्यंत त्याची घरामध्ये काळजी घेतली जाते. शासनाने त्यांना कितीही मानधन दिले तरी ते कलावंतालाच उपयोगी पडेल अशी शक्यता आता फारशी राहिलेली नाही. चौथा निकष लावण्यामुळे एक वर्ग दुर्लक्षित राहतो. या सर्व कलांचे शिक्षण देणारी जी मंडळी आहेत, ती स्वत:हून अशाप्रकारचे असे काम करतात, अशा शिक्षकांचाही या योजनेत समावेश कराल काय आणि दुसरी गोष्ट अशी की, इतक्या अपु-या मानधनामध्ये त्यांचे उर्वरित आयुष्य चांगल्या प्रकारे निभावेल ही शक्यता नसताना यांच्यासाठी विभागीय स्तरावर वृध्दाश्रमांच्या धर्तीवर घरकूल योजना करुन त्यांची देखभाल व्यवस्थित केली जाईल, औषधोपचार केला जाईल आणि त्यांचे उर्वरित आयुष्य चांगल्या पध्दतीने जाईल यासाठी शासन वेगळा विचार करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी 3 प्रश्न विचारले होते. त्यापैकी दोन प्रश्न आर्थिक भाराशी निगडित आहेत, जे महत्वाचे आहेत. त्यामुळे सन्माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर मिळू शकत नाही हे मी समजू शकतो. परंतु ज्या प्रश्नामुळे आर्थिक भार येत नाही त्याचे उत्तर त्यांच्याकडून अपेक्षित आहे. इलेक्ट्रॉनिक क्लीअरिंग सिस्टीम मार्फत या कलाकारांना पेमेंट करण्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. यामध्ये सर्व लोक येतील असे नाही. यासंदर्भात मंत्री महोदयांनी विभागाला ठामपणे आदेश द्यावेत. कारण सध्याची व्यवस्था दुरुस्त करण्याचा भाग आहे. त्यामुळे ही व्यवस्था एक महिन्यामध्ये दुरुस्त करावी. ज्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल ते घेतील. त्यानंतर बाकीचे लोक या योजनेच्या मागे आपोआप येतील. इ.सी.एस.ही चांगली योजना आहे. त्यासाठी पाहिजे असल्यास ऑप्शन ठेवावा. परंतु ही योजना एक महिन्याच्या आत लागू केली जाईल असे ठामपणे सांगावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी यासंबंधी सुरुवातीलाच उत्तर दिलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे 2-3 वर्षापूर्वीच सांगण्यात आले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कलाकारांच्या 3 श्रेणी केल्या आहेत त्या कशा केल्या जातात ?

प्रा.फौजिया खान : राष्ट्रीय कलाकार 'अ' श्रेणीमध्ये येतात, राज्यस्तरीय कलाकार 'ब' श्रेणीत येतात आणि जिल्हा व स्थानिक स्तरावरील कलाकार हे 'क' श्रेणीत येतात.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी प्रश्न विचारला होता की, जिल्हा स्तरावर बैठका होत नाहीत. समाजकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्याच्याशी काही देणे घेणे नाही.

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. विनोत तावडे...

कलाकारांना 1400 रुपये मानधन आणि ते देखील तीन तीन वर्षे दिले जात नाही. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी इसीएस मार्फत पेमेंट करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. आज जग कुठे चालले आहे आणि आपण कुठल्या जमान्यात आहोत ? शिक्षकांचे दोन-दोन, तीन-तीन महिने पगार होत नाही. समाजकल्याण अधिकारी नियमित बैठका घेत नाहीत. जे अधिकारी नियमित बैठका घेत नाहीत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? महिन्याभरात सर्व बैठका घेऊन नियमितपणे मानधन देण्यात येईल काय ? हे मानधन पुरेसे आहे, असे मंत्री महोदयांना वाटते काय ? दोन वर्षापूर्वी हे मानधन पुरेसे वाटत नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले होते.

प्रा. फौजिया खान : राज्यात सर्व कमिट्यांचा आढावा घेऊन संबंधितांना सूचना देण्यात येतील. ज्या ज्या लोकांनी वेळोवेळी बैठका घेतल्या नाहीत त्यांना तशा सूचना देण्यात येतील. मला हे मानधन अपुरे वाटते. मानधन कमी आहे हे खरे आहे.राज्याच्या इकॉनॉमिक कन्स्ट्रेण्टस् बघून याबाबतीत विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या भावना मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : त्याना सरकारी दवाखान्यात मोफत उपचार देण्यात येतील काय ?

प्रा. फौजिया खान : राजीव गांधी आरोग्य श्री योजना आपण सुरु करीत आहोत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनोद तावडे : मराठी कलाकारांची 1400 रु. मानधन देऊन चेष्टा चालविलेली आहे.

श्री. किरण पावसकर : घरेलू कामगारांना ज्या मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे पगार मिळतो. त्यानुसार तरी हे मानधन द्यावे.

श्री. उल्हास पवार : हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. एकच प्रश्न वेगवेगळया पध्दतीने विचारला जात आहे. मला वाटते आपली ही पध्दत बदलायला पाहिजे. माननीय राज्यमंत्र्यांनी एकच उत्तर तीन वेळा दिले. आपल्या भावना लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा प्रश्न पध्दतशीरपणे मांडण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे विचारतो की, एका लक्षवेधी सूचनेवर किती प्रश्न विचारले जावेत याबाबत आपले ठरलेले आहे. 10-11 प्रश्न विचारले जाऊ लागले तर...

श्री. विनोद तावडे : तुम्ही कलाकारांवर अन्याय करा...

श्री. उल्हास पवार : 5 वर्षे युतीचे सरकार होते त्यावेळी आपण त्यांना किती मदत केली ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

श्री. संजय दत्त : सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. या विषयावर चर्चा करण्या ऐवजी राजकारण करु नये असे मी नम्रपणे आवाहन करतो.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 2.... श्री.संजय दत्त....

माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, त्यांचे मानधन वाढविण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले जाईल. सभागृहाच्या भावना त्या माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविणार आहेत. ते ॲप्रिसिएट केले पाहिजे.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदय, या सभागृहात माननीय राज्यमंत्री महोदय हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून उत्तर देत असतात. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितले की, मंत्रीमहोदयांनी तीन वेळा उत्तर दिले, माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगणार आहेत. हे म्हणणे बरोबर नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने माननीय राज्यमंत्री याठिकाणी बोलत असतात. सभापती महोदय, या संदर्भात प्रत्येक शहरात किती खर्च येतो याची माहिती मी दुसऱ्यांदा विचारली आहे. माननीय मंत्री अभ्यास करुन येत नाहीत. ब्रिफिंग घेऊन येत नाहीत. उत्तर काय द्यायचे? याठिकाणी सभागृह टिंगलटवाळीने चालते असा मॅसेज जनतेमध्ये जायला नको. याठिकाणी तेच तेच उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले. आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न देत असतो. या प्रश्नाचे उत्तर देत असताना योग्य ब्रिफिंग घेऊन आणि अभ्यास करुन मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे अशी आमची अपेक्षा असते. आम्ही प्रत्यक्ष सभागृहात जो प्रश्न विचारतो त्या प्रश्नाला अशा प्रकारचे उत्तर देता कामा नये.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले की, राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे अपुरे मानधन वाढवून देता येणार नाही. आय.पी.एल.वरचा टॅक्स माफ करायला परवानगी दिली जाते. कलावंतांना मात्र उपाशी मारले जाते हे बरोबर आहे का? मंत्रीमहोदयांनी पैसा नाही हे कारण सांगणे पटणारे नाही. शासनाने कबूल केले की, मानधन अपुरे आहे. रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुराला जास्त मानधन मिळते. महाराष्ट्राचे उद्‌बोधन करणाऱ्या आणि मनोरंजन करणाऱ्या कलावंतांना उपाशी मारणार असाल तर ते चुकीचे आहे. एका बाजूला आयपीएलवरचा कर चोरी करण्यास परवानगी देत आहात. दुसऱ्या बाजूला कलावंतांसाठी शासनाकडे पैसा नाही हे सांगणे बरोबर होणार नाही. शासनाच्या वतीने पैसा कमी पडणार नाही असे सांगितले पाहिजे. त्यांना मानधन नको तर निर्वाह भत्ता दिला पाहिजे. त्यांच्या वृध्दापकाळात त्यांना सन्मानाने जगता आले पाहिजे. त्यांना मानधन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाढवून देणार आहात का? त्यांच्या वृध्दापकाळात आजारी पडल्यास पूर्ण मोफत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सोय करणार आहात का?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. यावर्षी याबद्दल ठोस निर्णय घेण्यात येईल. या सुवर्ण महोत्सवी वर्षात याची अंमलबजावणी व्हावी याची दक्षता घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 1 मे रोजी सुवर्ण महोत्सवी वर्ष संपत आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने या संदर्भात निर्णय घ्यावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, आपण नेहमी आपल्या प्रश्नाला मनाजोगे उत्तर मिळाले पाहिजे यासाठी आग्रही का असता? माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले की, हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे, याचा विचार करु. माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न विचारावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही.

उपसभापती : तुमचे समाधान होईल असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांकडून आले तरच आपल्याला उत्तर मिळाले असे समजायचे का? माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न विचारावा.

श्री.कपिल पाटील : हे बरोबर नाही. असे कसे चालेल?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

उपसभापती : सभागृहाचे कामकाज अशाच पध्दतीने चालवायचे असेल तर I will vacate the seat. मी माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली. त्यांच्या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले. त्यांचे समाधान होत नाही तर मग आम्ही काय करायचे? माननीय सदस्यांचे समाधान होईपर्यंत उत्तर कोणते द्यायचे? माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेल्या उत्तरानंतर मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न विचारावा असे सांगितले आहे.

नंतर 2सी.1...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेतर नाही

श्री. संजय दत्त : प्रत्येक जिल्ह्याला ठरविक कोटा ठरवून दिलेला असून त्यानुसार सध्याचा 40 चा कोटा होतो तो शासनाने 60 पर्यंत केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे मानधन देण्याच्या संदर्भात जे कलाकार पात्र असतील त्या सर्वांनाच मानधन मिळावे परंतु हा कोटा वाढविण्याच्याया संदर्भात शासनाने कोणते धोरण आहे ? तसेच या विषयावर दोन वर्षापूर्वी याच सदनात चर्चा झाली होती. तेव्हा ग्रामीण भागातील कलाकारांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने त्यांच्या वारसांना शासनाने सरकारी नोकरीत प्राधान्य द्यावे याबाबतीत सुध्दा शासनाने हमी दिली होती, त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, शासनाने हा कोटा 40 पासून 60 पर्यंत वाढविलेला आहे. हा कोटा वाढविण्याबाबत कोणत्या कलाकारांना मानधन द्यावे यासाठी ऑब्जेक्टीव क्रायटेरिया असणे आवश्यक आहे. त्यानुसार जे निकष असतील त्यात पात्र असणाऱ्या कलावंतांचा विचार शासनामार्फत करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, यामध्ये कलाकारांची "अ", "ब" व "क" अशी वर्गवारी करण्यात आली असून राष्ट्रीय पातळीवरील कलाकार "अ" वर्गामध्ये आहेत. परंतु खरी मानधनाची गरज मात्र "क" वर्गीय कलाकारांना असते. त्यामुळे ही वर्गवारी रद्द करुन "अ" वर्गातील कलाकारांना जे मानधन देण्यात येते तेच "क" वर्गातील कलाकारांना देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, असे शासनाला करता येणार नाही.

श्री. राम पंडागळे : महोदय, "गाढवाचे लगीन" या लोकनाट्याने संपूर्ण राज्यात तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात करमणूक केली. त्या लोकनाट्याचे निर्माते काळू-बाळू यांना शासनाने मदत केली आहे काय ?

उपसभापती : याचे उत्तर मी देतो. त्यातील "काळू" हे वर गेले आणि "बाळू" कुठे आहेत हे मलाही माहीत नाही.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, कोकणात दशावतार आणि भजन ही कला जोपासली जाते. या कलेला सातत्याने सभागृहाच्या माध्यमातून मानधन मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. मंत्री महोदयांनी त्याबाबत "तपासून पाहू" असे उत्तर सुध्दा दिलेले आहे. त्याबाबत कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, तपासून पाहू अथवा चौकशी करु याशिवाय पुढील कार्यवाही करणे कसे शक्य होणार आहे ? म्हणून असे सांगावेच लागणार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3, 4 व 5 संबंधी

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 च्या संदर्भात नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे ठरलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ..

आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेली 4 व 5 क्रमांकाची लक्षवेधी सूचना सोमवार दिनांक 12 एप्रिल रोजी घेण्यात येईल. आता सहाव्या लक्षवेधी सूचनेपरील चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

पृ. शी. : नागपूर येथील भंडारा मार्गावारील उनिया औद्योगिक वसाहतीत जे.डी.इस्पात या कंपनीमध्ये शक्तिशाली स्फोट होऊन त्यात कामगारांचा झालेला मृत्यू.

मु. शी. : नागपूर येथील भंडारा मार्गावारील उनिया औद्योगिक वसाहतीत जे.डी.इस्पात या कंपनीमध्ये शक्तिशाली स्फोट होऊन त्यात कामगारांचा झालेला मृत्यू यासंबंधी श्री.सय्यद जमा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सय्यद जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर येथील भंडारा मार्गावरील उनिया औद्योगिक वसाहतीत जे.डी. इस्पात या कंपनीमध्ये दिनांक १५ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या दरम्यान शक्तिशाली विस्फोट होऊन ३ कामगारांचा घटना स्थळी मृत्यू होणे व ७ कामगारांची प्रकृती चिंताजनक असणे, राज्यात असलेल्या इस्पात कंपन्यांमध्ये अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येणे, उपरोक्त दुर्घटनेमध्ये मृत्यू पावलेल्या व गंभीर दुखापत झालेल्या कामगारांना मदत वा मोबदला मिळण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही तसेच सदर इस्पात कंपन्यांसाठी शासनाने कंपनीतील कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यप्रणाली तयार करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मैंने अपनी लक्षवेधी सूचना में एक विशेष कारखाने के बारे में जानकारी मांगी थी, लेकिन मंत्री महोदय ने जनरल जानकारी दी है. इस कारखाने में हुई दुर्घटना में 4 कामगारों की मृत्यू हुई है और 7 कामगार घायल हुए है. इन लोगों को कम्पेनसेसन दिया है या नहीं दिया है और अगर इनको कम्पेनसेसन दिया है तो कौन से कानून के तहत दिया है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि ये कर्मचारी परमानेंट थे, ठेकेदारी पर थे या कॅजुअल थे ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि जिन कामगारों की मृत्यु हो गई है, उनके आश्रितों को कारखाने में नौकरी देंगे या नहीं ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, या कंपनीमध्ये एकूण 4 कामगार मृत्यूमुखी पडलेले असून त्यांच्या कुटुंबियांना व्यवस्थापनाने सानुग्रह अनुदान सुध्दा दिलेले आहे. या कंपनीमध्ये जे 4 कामगार मृत्यूमुखी पडले त्यांना पुढील प्रमाणे कंपनीच्या व्यवस्थापनाने सानुग्रह अनुदान दिलेले आहे. 1) श्री.पंकज गोपाळ सिंह-40,000 रुपये 2) श्री. गणेश सिंह - 20,000 रुपये 3) विनय सिंह-20,000 रुपये 4) श्री. रामजित राजबर-5,000 रुपये असे सानुग्रह अनुदान कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेले आहे. जे कामगार यामध्ये जखमी झालेले आहेत त्यांना वैद्यकीय खर्च व्यवस्थापनाने दिलेला आहे. व्यवस्थापनाने सर्व कामगारांचा विमा उतरवलेला असल्यामुळे जे कामगार या घटनेत मृत्यू पावले आहेत त्यांना विम्याचे 100 टक्के पैसे मिळतील. ही कंपनी नवीन असल्यामुळे या ठिकाणी कामकरणारे कामगार हे पर्मनंट होते. या कंपनीमध्ये टेम्पररी कोणीही नव्हते सर्व कामगार नियमित होते. मृत्यू पावलेल्या चारही कामगारांना विम्याचे पैसे लवकरात लवकर मिळावे यासाठी संबंधितांना शासनातर्फे आदेश दिले जातील.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या कंपनीमध्ये 4 कामगारांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे बाकीच्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी काय करण्यात आलेले आहे ?

यानंतर श्री. सरफरे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सानुग्रह अनुदान म्हणून आपण कॉंपेन्सेशन देणार आहात. शासनाच्या प्रचलित नियमानुसार मरण पावलेल्या व्यक्तिला 1 लाख रुपये दिले जातात, ते आपण यांना देणार काय? दुसरा प्रश्न असा की, तुमच्या निदर्शनास या सर्व अनियमितता आल्या आहेत, हा कारखाना नवीन असला तरी त्या कारखान्याने सर्व सेफ्टी मेजर्स केले पाहिजेत. त्याशिवाय तो कारखाना चालू करता येत नाही असा कायदा आहे. याठिकाणी भोगवटादाराविरुध्द कारवाई करणार आहात. परंतु कारखान्याच्या मालकाविरुध्द कारवाई करणार काय?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, त्या कारखान्यामध्ये सेफ्टी मेजर्स केलेले नाहीत. आणि म्हणून या कारखान्याविरुध्द कारखाने अधिनियम 1948 च्या कलम 7 अ (2) (अ),(ब),(क) व महाराष्ट्र कारखाने नियम 1963 चे नियम 115 (1) व (2) नुसार व्यवस्थापनाविरुध्द 2 फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणामध्ये पोलीस कारवाई चालू आहे. त्यामुळे या व्यवस्थापनाने केलेल्या चुकीबद्दल कायदेशीर कारवाई करणे आवश्यक होते ती चालू आहे. यामध्ये व्यवस्थापक म्हणून श्री. शिवकुमार गोपाल आहेत. ते व्यवस्थापक व भोगवटदारही असून त्यांच्यावर कारवाई केली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, शासनाच्या धोरणाप्रमाणे एखाद्या कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या वारसांना 1 लाख रुपये दिले जातात. तेव्हा याठिकाणी आपण त्वरित 1 लाख रुपये देणार काय?

श्री. पद्माकर वळवी : होय. कायद्याने जी आवश्यक मदत देता येईल ती दिली जाईल. कॉंपेन्सेशन ॲक्टप्रमाणे कामगार आयुक्तांकडे प्रस्ताव दाखल करावा लागतो. त्यानंतर वारसदार निश्चित करुन कॉंपेन्सेशन देण्यात येते. याठिकाणी 1 लाख रुपये रक्कम जास्त होत आहे. त्यामुळे कायद्याने जी भरपाई देणे आवश्यक आहे ती दिली जाईल.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने बताया है कि अनुग्रह राशि कारखाने की तरफ से दी गई है. माननीय उपमुख्यमंत्री सभागृह में उपस्थित हैं. मेरा उनसे अनुरोध है कि अगर बिजली गिरने से किसी गरीब आदमी की मृत्यु हो जाती है तो उसको 1 लाख रुपए अनुग्रह राशि देते हैं. मेरा स्पेसिफिक प्रश्न है कि इस कारखाने पर भारत सरकार का पेमेन्ट ऑफ कॉंपेन्सेशन एक्ट लागू है, इसलिए उसके शिड्यूल के हिसाब से कम्पेनसेसन मिलना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. सय्यद जमा...

चाहिए. वह कॉपेन्सेशन कारखाने के मालिक ने दिया है या नहीं और अगर नहीं दिया है तो सरकार उसके ऊपर क्या कार्रवाई करेगी ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, कॉपेन्सेशन ॲक्टप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांमार्फत कॅलक्युलेशन करुन आयुक्तांकडे नुकसान भरपाईचा प्रस्ताव दाखल केला आहे. त्यामुळे हे शासन मृत कामगारांच्या वारसांना कायदेशीर नुकसान भरपाई देण्यास पूर्णपणे समर्थ आहे. त्यादृष्टीने कारवाई केली जाईल. ----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी बजाविलेल्या जकात कामगारांबाबत माझा औचित्याचा मुद्दा आहे. मागील चार दिवसापूर्वी घडलेली घटना आहे. ठाणे शहरामध्ये जकात कर्मचारी कायम अन्याय करीत असतात. परंतु कधी कधी हे कर्मचारी चांगले काम करु शकतात हे त्यांनी सिध्द केले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

एका आतरराष्ट्रीय अंमलीपदार्थची तस्करी या जकात अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पकडून दिली आहे. अंमलीपदार्थ ज्या तवेरा गाडीमधून वाहून नेला जात होता. ही गाडी जकात खात्यांच्या कर्मचाऱ्यांनी बाळकुंब परिसरामध्ये अडविली आणि ती ठाणे महापालिकेच्या आवारात आणून उभी केली आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना तशा प्रकारची सूचना दिली. जे 12 खोके सफरचंदाने भरलेले आहेत असे सांगण्यात आले होते त्यामध्ये अंमलीपदार्थ आढळून आले.त्यामुळे अशा प्रकारे एक फार मोठे योगदान या जकात खात्यातील कर्मचाऱ्यांनी 3 एप्रिलला केलेले आहे. संतोष सावंत, अशोक कोळी ही जकात खात्यातील छोटी माणसे आहेत त्यांनी ही मोठी तस्करी पकडून दिलेली आहे. सभापती महोदय, माझी या निमित्ताने विनंती आहे की, अशा प्रकारचे चांगले काम करणाऱ्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली पाहिजे. जशी वाईट काम केल्यानंतर शिक्षा देण्यात येते त्याप्रमाणे चांगले काम करणाऱ्याचा सन्मान केला पाहिजे. सभापती महोदय, जकात तपासणी पथकातील हे कर्मचारी आहेत, त्यांचे यामध्ये योगदान आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय अंमलपदार्थांची महत्वपूर्ण चोरी पकडली या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात यावा अशा प्रकारची विनंती सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला करु इच्छितो.

उपसभापती : या औचित्याच्या मुद्याची प्रत माझ्याकडे आलेली आहे. यासंदर्भातील महत्वाचा मुद्दा माननीय सदस्य नेमके विसरलेले आहेत. हा माल महापालिकेच्या जकात कर्मचाऱ्यांनी पकडला. ज्या गाडीत हा माल होता ती गाडी जकात चुकवून जकात नाक्यावरुन चालली होती त्यावेळी जकात विभागाच्या व्हिजिलन्सच्या कर्मचाऱ्यांनी या गाडीचा पाठलाग केला आणि जकात नाक्यापासून दोन-तीन कि.मी. अंतरावर बिग बझारजवळ ही गाडी अडविली. या गाडीमध्ये काय आहे असे विचारल्यानंतर त्या गाडीच्या चालकाने आणि त्या गाडीमध्ये बसलेल्या एका माणसाने असे सांगितले की, यामध्ये सफरचंदे आहेत. त्या व्हिजिलन्सच्या कर्मचाऱ्यांनी ती गाडी ठाणे महापालिकेच्या आवारात आणून उभी केली. त्याठिकाणी ही खोकी उघडल्यानंतर त्यामध्ये अंमलीपदार्थ असल्याचे त्यांना आढळून आले पण तो पदार्थ नेमका काय आहे हे त्यांना माहीत नव्हते म्हणून त्यांनी ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाला फोन केला आणि त्यांना बोलावून घेतले. त्यानंतर ते चरस असल्याचे आढळून आल्यानंतर पोलिसांनी ती गाडी जप्त केली

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

केली आणि दुसऱ्या दिवशीच्या सगळया वर्तमानपत्रातून एक बातमी अशी आली की,ठाणे पोलिसांनी फार मोठा छापा घातला आणि चरस जप्त केले. यामध्ये मूळ मुद्दा असा आहे की, अंमली पदार्थ पकडल्यानंतर त्याच्या दहा टक्के बक्षीस मिळते. या बक्षिसाचे जाऊ द्या पण ज्या कर्मचाऱ्यांनी खऱ्या अर्थाने हा अंमली पदार्थ पकडला त्यांचे नामो-निशाण वर्तमानपत्रात नव्हते. पोलिसांनी हे आयते मिळालेले घबाड आपल्याकडे नेले आणि दुसऱ्या दिवशीच्या सर्व वर्तमानपत्रातून पोलिसांनी एवढा मोठा छापा घातला अशा प्रकारची बातमी त्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यापासून बाकी सगळयांच्या फोटोसहीत छापून आली. म्हणजे ज्यांनी मेहनत केली ते पूर्णपणे बाजूला राहिले, अंधारात राहिले. शेवटी त्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव गृह विभाग, यांना पत्र लिहून आपली व्यथा कळविली. ते अधिकारी काल मलाही भेटले. त्यांनी त्यांचे हे दु:ख मला सांगितले. त्यांचे म्हणणे असे होते की, आम्हाला दुसरे काही नको परंतु ज्या कर्मचाऱ्यांनी हे अंमली पदार्थ पकडले त्यांचा कुठेतरी एक साधा उल्लेख तरी करावयास पाहिजे होता. सगळेच पोलीस वाईट आहेत असे आपण कधीच म्हटलेले नाही. अत्यंत कर्तबगार पोलीस अधिकारी देखली आपल्याकडे आहेत. परंतु "चोरुन पोळी खायची आणि बोंबलून तूप मागायचे" अशा प्रकारचे देखील काही अधिकारी कार्यरत आहेत याची गंभीर नोंद शासनाने घ्यायला हवी, असे माझे प्रामाणिक मत आहे. आणि ज्यांनी खऱ्या अर्थाने हा माल पकडला आणि पोलिसांच्या ताब्यात दिला त्यांना देखील सन्मान प्राप्त झाला पाहिजे. त्यांचा देखील गौरव झाला पाहिजे. त्यांची देखील कुठे तरी नोंद झाली पाहिजे असे मला या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सभासद आणि आपण जी वस्तुस्थिती या सभागृहासमोर मांडलेली आहे ती लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ या ठिकाणी उपस्थित आहेत आणि त्यांनी याबाबत उत्तर दिले तर योग्य होईल. सभापती महोदय, राज्यामध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुका सर्वत्र होत असून अनेक ठिकाणी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख उद्या म्हणजे 9 एप्रिल 2010 आहे. या निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी जात पडताळणी प्रमाणपत्र सोबत जोडण्याचे बंधन घालण्यात आले आहे परंतु सदरहू जात पडताळणी प्रमाणपत्र एवढ्या तातडीने उमेदवारांना मिळणे शक्य होत नाही. अमरावती जिल्हा समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात 5 ते 7 हजार लोक या प्रमाणपत्राकरिता ये-जा करीत आहेत. याकरिता सदरहू उमेदवारी अर्ज दाखल करताना नामनिर्देशन पत्रासोबत जात पडताळणीकरिता सादर केलेल्या अर्जाची पावती जोडली तरी ते अर्ज स्वीकारावे व एक महिन्यात प्रमाणपत्र देणे बंधनकारक करावे असा निर्णय शासनाने आता देणे अपरिहार्य आहे. कारण नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी उद्याचा एकच दिवस आहे. जात पडताळणी अधिकारी अजिबात दाद देत नाहीत. पाच-सहा हजार लोक त्या ठिकाणी आहेत. सर्वांची उमेदवारी कारण नसताना बाद होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. एक महिन्यापासून हे सर्व चालू आहे. त्याबाबतीत तात्काळ निर्णय घेतला पाहिजे. तांत्रिकदृष्ट्या यामध्ये काय आहे ते बघावे. या महत्वाच्या विषयावर मी या औचित्याच्या मुद्याव्दारे आपले लक्ष वेधत आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी व्यथा मांडलेली आहे ती व्यथा सरकारी पक्षातील जे उमेदवार आहेत त्यांची सुध्दा आहे. त्यामुळे यासंदर्भात काल माननीय मुख्यमंत्र्यांकडे काही लोकांनी आपले मत मांडले. माझ्याकडे सुध्दा लोक आले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयुक्तांबरोबर चर्चा केली. त्याबाबतीत निश्चित काय झाले हे मला माहीत नाही. त्यासंदर्भात आपण कायदा पास केलेला आहे. त्यामुळे या क्षणाला आपल्याला त्यांना कितपत मदत करता येईल याबाबतीत माझ्या मनामध्ये शंका आहे. किंबहुना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS

श्री. छगन भुजबळ ....

आता फॉर्म भरतेवेळी ते प्रमाणपत्र द्यावयास पाहिजे पण निदान छाननीच्या दिवसापर्यंत तरी वाढ मिळावी यासाठी सुध्दा आमचा प्रयत्न होता. कायदा आडवा येत असेल तर मग याबाबतीत आपल्याला काही करता येणे शक्य होणार नाही. परंतु काही करता येणे शक्य होत असेल तर निश्चितपणे यामध्ये लक्ष घालण्यात येईल्.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. मला शासनाकडून एवढीच माहिती पाहिजे की, परवा जळगाव जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांवरील सर्व राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आले होते. त्याचे लॉजिक कोणालाही माहीत नाही. कोणत्या माननीय व्यक्तीचे निधन वगैरे झाले आहे काय याबाबत आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशी केली. त्यांनी सांगितले की, याबाबत पोलीस खात्याकडून सूचना येते. पोलीस खात्याकडून सूचना येत असल्यामुळे जळगावच्या पोलीस अधिक्षकांना विचारले पाहिजे. 26 नोव्हेंबरची घटना घडल्यानंतर सुध्दा ज्यांनी पोलिसांच्या करमणुकीचा कार्यक्रम केला तेच पोलीस अधिक्षक त्या ठिकाणी आहेत. त्याचा प्रोटोकॉलचा वेगळाच नियम चालतो. ज्यावेळी कार्यक्रम रद्द करावयास पाहिजे होता त्यावेळी त्यांनी कार्यक्रम केला. छत्तीसगडमधील नक्षलवादी हल्ल्याच्या संदर्भात राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविले असतील तर त्याबाबतीत शासनाचे आदेश होते काय ? केवळ त्याच जिल्ह्यामध्ये तसे का करण्यात आले ? इतर जिल्ह्यामध्ये तसे का झाले नाही ? याबाबतीत शासनाने अधिकृत माहिती दिली तर ते का झाले हे कळेल. याबाबतीत जे नॉर्म्स आहेत ते राज्यभर पाळणार की प्रत्येक एस.पी. आपल्याला वाटेल ते करणार ? याबाबतीत शासनाने सभागृहाला माहिती द्यावी अशी मी विनंती करतो.

उपसभापती : याबाबत चौकशी करुन शासन माहिती देईल.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, याबाबतीत निवेदन करण्यात येईल्.

यानंतर श्री. अजित शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. :संयुक्त महाराष्ट्र लढ्या विषयीची वेबसाईट हॅक करुन त्यावरील माहिती नाहीशी करण्यात येणे

मु. शी. संयुक्त महाराष्ट्र लढ्या विषयीची वेबसाईट हॅक करुन त्यावरील माहिती नाहीशी करण्यात येणे याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"संयुक्त महाराट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सुरुवातीलाच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची माहिती देणारी वेबसाई जगप्रसिध्द आंतरजालीय माहितीस्त्रोत (encyclopedia) विकोपेडीयावरील nttp// en.wikipedia.org/wiki Samyukta-Maharashtra-Samiti यावर संयुक्त महाराष्ट्र लढ्या विषयी थोडीफार माहिती मिळाली असून सदर वेबसाईट हॅक करुन त्यावरील हुतात्म्यांची आणि मराठी माणसांच्या दृष्टीने जिव्हाळ्याची असणा्री माहिती नाहिशी करुन जपानी भाषेतून चित्रलिपीतील काही अनाकलनीय मजकूर दिल्याचे आढळून आले आहे. या प्रकाराबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे दिनांक 6.4.20109 रोजी लेखी तक्रार केली आहे . या संदर्भात त्वरित चौकशी करुन सदर वेबसाईट निर्माण करणाऱ्या विरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची उत्पन्नाची मर्यादा 15 हजार रुपयांऐवजी 50 हजार रुपये करणे.

मु. शी. : दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची उत्पन्नाची मर्यादा 15 हजार रुपयांऐवजी 50 हजार रुपये करणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यात सुरु असलेल्या संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी निराधार योजना इत्यादी योजनांचा लाभ घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची उत्पन्नाची मर्यादा सन 1980 साली 15,000/- इतकी होती. सन 1980 साली जीवनाश्यक वस्तू, अन्नधान्न व इतर गरजू वस्तूंचे भाव व आजच्या भावात जमीन अस्मानाचा फरक आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना पाचवा आणि सहावा वेतन आयोगाचा लाभ, महागाई भत्ता, आदि सुखसुविधा मिळत असताना दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबाना मात्र त्याच 15000 रुपयांच्या मर्यादेत जीवन व्यतीत करावे लागते.

सन 1980 साली आयकराची मर्यादा रु. 15000/- पर्यंत होती. ती आज 2010 मध्ये 1,60,000/- पर्यंत पोहोचली आहे. या व्यतिरिक्त सन 1980 साली साखर 3 रुपये किलो होती ती आज 33 रुपये किलो झाली आहे. तूरडाळ 4 रुपये किलो होती ती 62 रुपये किलो झाली आहे. शेंगतेल 7 रुपये किलो होते ते 70 रुपये किलो झाले आहे. गहू-तांदूळ 2 रुपयांवरुन 18 ते 20 रुपयांपर्यंत गेलेले आहे. ज्वारी 2 रुपयावरुन 15 रुपयांपर्यंत झालेले आहे. अशी परिस्थिती असताना दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची उत्पन्नाची मर्यादा वाढविली गेली नाही ही बाब त्यांच्यावर अन्यायकारक आहे. उत्पन्नाची मर्यादा वाढविली गेली नसल्याने अनेक दारिद्रय रेषेखालील लोकांना शासनाच्या अनेक योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे शासनाने दारिद्रय रेषेची मर्यादा रु,15000/- वरुन 50,000/- करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, यासाठी विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी याठिकाणी उपस्थित करीत आहे."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रत्नागिरी बंदीराजवळील क्लिजर जेटी जवळ समुद्रात बांधलेल्या संरक्षक भिंतीमुळे इतर भागात समुद्राचे पाणी शिरुन भूभाग जलमय होणे.

मु.शी. : रत्नागिरी बंदीराजवळील क्लिजर जेटी जवळ समुद्रात बांधलेल्या संरक्षक भिंतीमुळे इतर भागात समुद्राचे पाणी शिरुन भूभाग जलमय होणे याबाबत श्री. संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर,यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

रत्नागिरी बंदराजवळील क्लिजर जेटी जवळ समुद्रात संरक्षक भिंत (भगवती संरक्षक भिंत) बांधली असून त्यामुळे समुद्रातील अंतर्गत पाण्याचा प्रवाह अडला जाऊन तो किनाऱ्याच्या दुसऱ्या भागात असलेल्या जाकिमिऱ्या, सडेमिऱ्या, भाटीमिऱ्या व मुरुगवाडा ह्या गावात शिरुन त्या गावातील बराचसा भूभाग जलमय झालेला असून ही गावे संपूर्णत: समुद्राच्या पाण्याखाली जाण्याची भीती निर्माण झालेली आहे. या चार गावाचे अस्तित्व टिकवायचे असेल तर सदर संरक्षक भिंतीची समुद्रात पुढे 40 मीटरने वाढवावी अन्यथा आहे ती संरक्षक भिंत काढून टाकावी म्हणजे पाण्याचा प्रवाह सरळ वाहत जाईल अशी गावकऱ्यांची रास्त मागणी आहे. या मागणीकडे शासनाचे पूर्णत: दुर्लक्ष झाल्याने या चारही गावकऱ्यांमध्ये शासनाबद्दल प्रचंड असंतोष व चिडीची भावना निर्माण झाली आहे ती या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. तरी यावर शासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी ही विनंती."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर येथील मेयो रुग्णालयात सुरु असलेला अनागोंदी कारभार

मु. शी. : नागपूर येथील मेयो रुग्णालयात सुरु असलेला अनागोंदी कारभार याबाबत डॉ. दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"नागपूर अधिवेशनात मेयो रुग्णालयात म्हणजे इंदिरा गांधी वैद्यकीय मेडीकल कॉलेज, याच्या अनागोंदी कारभाराविषयी, व्हर्टीकल एक्स्पान्शन विषयी आवाज उठविला त्याचबरोबर माननीय उपसभापती महोदयांनी बैठकही लावली पण आजही मेयो हॉस्पीटल्मध्ये कोणतीच सुधारणा झाली नाही तर तेथे अनेक त्रुटी तयार झाल्या आहेत. या मेयो हॉस्पीटलबाबत राज्य शासनाने त्वरित निर्णय घेण्याबाबत तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, मागील नागपूरच्या अधिवेशनात मी मेयो हॉस्पीटलला वैयक्तिक भेट दिली होती. त्यावेळी मला तेथे आढळून आलेल्या गैरसोयी बाबत मी सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय उप सभापतींनी या प्रकरणी चौकशी करण्याचे तसेच त्या संदर्भात एक बैठक घेण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे बैठक घेण्यात आली.

यानंतर श्री.खंदारे

अशुद्धीत मत/शोधनासाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

एकूण हॉस्पिटलची दुरवस्था, स्ट्रेचर्सची कमतरता, बाकीची अनावस्था, व्हर्टिकल एक्सपांशन तसेच बाकीची इतर गैरव्यवस्था होत आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये झालेल्या बैठकीत चर्चा झाली होती. उपसभापती महोदय, दुर्दैवाने त्यानंतर काहीच घडलेले नाही. आता त्याला सहा महिने झालेले आहेत. त्यामुळे मध्यंतरी मी पुन्हा आपल्याला सूचित केले होते. या वर्षाच्या बजेटमध्ये मेयो हॉस्पिटलसाठी 10 कोटी रुपये येणार होते, तेही आलेले नाहीत. तसे त्या बैठकीत देण्याचे ठरले होते. परंतु व्हर्टिकल एक्सपांशनचा प्रस्ताव पुढे देखील गेलेला नाही. आपण सूचना देऊन सुध्दा कोणतीच कार्यवाही झालेली नाही. माझी विशेष उल्लेखाद्वारे विनंती आहे की, मेयो हॉस्पिटलला इंदिरा गांधींचे नाव आहे, नागपूरचे हे प्रसिध्द हॉस्पिटल आहे. तेथे अनेक विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेतात. तेथील गैरव्यवस्थेमुळे पुढील वर्षी एमबीबीएसच्या जागा कमी होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. म्हणून तेथे प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन एमबीबीएसच्या सीट कमी न होण्यासाठी काळजी घेण्यात यावी.

उपसभापती : या प्रश्नासंबंधी संबंधित माननीय मंत्री महोदयांबरोबर मी नागपूरला तातडीने बैठक घेतली होती. त्यावेळी निर्णय घेण्यात आला होता, परंतु आजतागायत यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही झाली नसल्यामुळे उद्याच्या दिवसाचे कामकाज संपण्यापूर्वी या खात्याच्या मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहून यासंबंधीचे निवेदन करावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

पृ. शी. : बीड जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची कामे अपूर्ण राहणे

मु. शी. : बीड जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची कामे अपूर्ण राहणे याबाबत ॲड.उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"ग्रामीण भागामध्ये पाण्याची स्थिती उन्हाळयामध्ये गंभीर बनत असणे, अनेक ठिकाणी टँकर्सद्वारे तर काही गावांमध्ये बोअर, विहिरीचे अधिग्रहण केले जाते. यासाठी कोटयवधी रुपयाचा निधी दरवर्षी खर्च करण्यात येतो व कायमस्वरुपी योजना राबविल्या जातात. तथापि, बीड जिल्हयातील पाणी पुरवठा विभागाला चार वेळा प्रभारी अधिकारी मिळाल्याने पाणी पुरवठा योजनेचे उद्दिष्टय गाठता न येणे, पर्यायाने हाती घेतलेल्या 429 योजनांपैकी केवळ 123 योजना पूर्णत्वास जाण्याची वर्तविण्यात येत असलेली शक्यता, तसेच बीड जिल्हयातील परळी तालुक्यात असलेली दादाहरी वडगाव गटात संगम अठरा खेडी योजना चार वर्षांपासून व मांडवा सहा खेडी पाणी पुरवठा योजना दहा वर्षांपासून बंद पडल्यामुळे अनेक गावातील नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ येणे, खुद्द दादाहरी वडगावातही पाणी टंचाई निर्माण झाली असून खाजगी विहिरी वरुन पाणी विकत घेण्याची वेळ सुमारे दोन महिन्यापासून येणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन परळी तालुक्यातील पाण्याची टंचाई दूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, बीड जिल्हयातील अनेक गांवाना महिन्याला 1 हजार रुपये देऊन पाणी विकत घ्यावे लागत आहे. दादाहरी वडगांव या गावात खाजगी विहिरीतून पाणी घेण्याची वेळ दोन महिन्यांपासून आलेली आहे. म्हणून बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांची कामे होण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे विनंती करते.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सोलापूर विद्यापीठाला संत श्री नामदेव महाराजांचे नाव देणे

मु. शी. : सोलापूर विद्यापीठाला संत श्री नामदेव महाराजांचे नाव देण्याबाबत श्री.चरण सिंग सप्रा, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.चरण सिंग सप्रा यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.चरण सिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्राचे थोर संत श्री नामदेव महाराज यांचे संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर भारतात पंजाप, हरियाना, उत्तर प्रदेश अशा अनेक राज्यात अनेक अभंग प्रसिध्द आहेत. आपल्या अभंगाच्या वाणीने फार मोठे समाज प्रबोधनाचे काम संत नामदेव महाराजांनी केलेले आहे. पंजाबमध्येही थोर संत नामदेव महाराजांचे अनेक भक्त आहेत. गुरु ग्रंथ साहीब या पवित्र ग्रंथातही संत नामदेव महाराजांचे अनेक अभंग अंतर्भूत केलेले आहेत. या थोर संताचे वास्तव्य सोलापूर जिल्यातील पंढरपूर या तीर्थक्षेत्रात होते. म्हणून सोलापूर विद्यापीठास महाराष्ट्राचे थोर संत श्री नामदेव महाराजांचे नामकरण करण्यात यावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे सभागृहास करु इच्छितो."

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत/शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी. : शालेय विद्यार्थ्यांसाठी पांढरा शर्ट व खाकी हाफ पॅण्ट/फुल पॅण्ट आणि विद्यार्थीनींसाठी पांढरा ब्लाऊज व निळा परकर/ स्कर्ट निर्धारित करणे

मु.शी. : शालेय विद्यार्थ्यांसाठी पांढरा शर्ट व खाकी हाफ पॅण्ट/फुल पॅण्ट आणि विद्यार्थीनींसाठी पांढरा ब्लाऊज व निळा परकर/ स्कर्ट निर्धारित करणे याबाबत श्री. भगवान साळुंखे. वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"शासनाने शालेय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी पांढरा शर्ट व खाकी हाफ पॅण्ट/फूल पॅण्ट आणि विद्यार्थीनीसाठी पांढरा ब्लाऊज व निळा परकर/ स्कर्ट निधारित केला आहे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखालील शाळांतून या आदेशाचे पालन उत्तमप्रकारे केले जाते. तसेच रयत शिक्षण संस्थांसारख्या खाजगी शिक्षण संस्था देखील या आदेशाचे पालन काटेकोरपणे करतात, इतकेच नव्हे तर मुलांच्या डोक्यावर पांढरी शुभ्र गांधी टोपीही घातली जाते, त्यामुळे उंची कपड्यांच्या माध्यमातून श्रीमंतीचे प्रदर्शन करणारे विद्यार्थी व गरिबीने लाजून चूर झालेले विद्यार्थी अशा विसंगतीचे प्रदर्शन पहावयास मिळत नाही, मात्र आजकाल अनेक संस्थांनी आपल्या स्तरावर विविध रंगीबेरंगी गणवेश ठरविले असून त्यामुळे गणवेशावरुन शाळांची वेगळी ओळख प्रस्तावित केली जाते. त्यामुळे विद्यार्थी, पालक व समाज यांना वेगवेगळे संदेश मिळतात. त्यातून शिक्षणाच्या बाजारीकरणास चालना मिळते आहे. सारांश शासनाने राज्यातील शालेय शिक्षणातील सर्व विद्यार्थ्यांसाठी पांढरा शर्ट व खाकी पॅण्ट हा गणवेश वापरण्या बाबत सर्व शिक्षणसंस्थांना बंधनकारक करावे."

सदर विषय महत्वाचे असल्याने मी तो विशेष उल्लेखासद्वारे उपस्थित केला आहे.

.....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय,मी पुढील प्रमाणे प्रस्ताव प्रस्तुत करतो :

महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समिती□डे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

1) श्री. श्रीपाद कर्वे, सह आयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती यांचेविरुध्द श्री.पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमा□ाचे प्रकरण,

2) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय; प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जि. बुलढाणा आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेविरुध्द श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी उपस्थित □लेले विशेषाधिकार भं□ाचे व अवमा□ाचे प्र□र□,

3) सुझलॉन कंपनीविरुध्द श्री. दिवाकर रावते, श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद, श्री. विनोद तावडे, डॉ. वसंत पवार, श्री. अरुण गुजराथी, श्री. मोहन जोशी, प्रा.बी.टी. देशमुख यांनी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण

या तीनही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178 (1) च्या परंतु□ाबाबये पुढील अधिवेश□ाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवू□ दे□यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास दिलेला नकार

मु.शी.: श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास दिलेला नकार याबाबत विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इ. धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणी संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या तदर्थ समितीने दिनांक 16 जानेवारी, 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रुग्णांचे रेकॉर्ड मागितले असता श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास नकार दिल्यामुळे तसेच समिती सदस्यांशी दुरुत्तरे व गैरवर्तन केल्यामुळे उद्भवलेल्या समितीच्या, सन्माननीय सदस्यांच्या व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा असा आपल्या अनुमतीने मी प्रस्ताव मांडतो.

सदरहू अहवाल दिनांक 22 डिसेंबर 2009 रोजी नागपूर येथील अधिवेशनामध्ये मांडलेला आहे.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी विशेष हक्क समितीचे समिती प्रमुख या नात्याने जो प्रस्ताव मांडला आहे तो आम्ही नाकारीत आहोत. श्री.मनेश मसंद हे जसलोक हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांनी राज्याच्या मंत्रीमहोदयांसमवेत आमचाही अपमान केला आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे देखील त्या समितीचे सदस्य होते आणि ते त्याप्रसंगी उपस्थित होते. तत्कालीन माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण हेही उपस्थित होते. श्री.मनेश मसंद यांची मस्ती अद्याप उतरलेली नाही. काल माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी जसलोक हॉस्पिटलला भेट दिली होती. त्यांनी जसलोक हॉस्पिटलमधून मला फोनवरुन विचारले की, कोणाला भेटू? मी त्यांना सांगितले की, सीईओ श्री.मनेश मसंद यांना भेटा. या सभागृहाचे तत्कालीन सदस्य व सध्याचे विधानसभा सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांच्या बंधूंचे ऑपरेशन व्हावयाचे आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य ॲड.अनिल परब तिथे गेले होते. त्यांनी फोन करुन सीईओ यांच्या सचिवांना सांगितले की, मला श्री.मनेश मसंद यांना भेटावयाचे आहे. सुरुवातीला त्यांनी दुरुत्तरे दिली. दूरव्यवहार केला. पहिल्यांदा मराठी भाषेतून बोलायला तयार नव्हते. मग माननीय सदस्यांनी आपली ओळख करुन दिली. मी शिवसेनेचा अमुक आमदार बोलत आहे असे सांगितले. यांची मस्ती कधी उतरणार आहे? आपण यांना असे माफ करीत गेलो तर त्यांना कधीच धडा मिळणार नाही. त्यांना कमीत कमी दोन दिवसांची कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी माझी मागणी आहे. आता मला चिठ्ठी पाठविण्यात आली की, माननीय आमदार श्री.जेथलिया यांच्या बंधूंचे ऑपरेशन आहे त्या ऑपरेशनसाठी जे डॉक्टर आवश्यक आहेत ते डॉक्टर उपलब्ध करुन देण्यास तयार नाहीत. पूर्वेतिहास आहे, त्यांनी मस्तीमध्ये उत्तर दिले आहे. समितीने ज्यावेळी भेट दिली त्यावेळी त्यांनी दूरदर्शनवर आणि विविध वाहिन्यांवर स्टेटमेंट केले होते की, मी सरकार मानत नाही. आमच्यावर कोणाचे नियंत्रण नाही. आम्ही स्वतंत्र आहोत अशा प्रकारचे स्टेटमेंट माननीय मंत्रीमहोदयांसमोर केले होते. अशी स्टेटमेंट्स विविध वाहिन्यांवरुन देखील केली होती. अशा व्यक्तीला सभागृह माफी देत असेल तर यासारखी दुर्दैवी घटना या सभागृहाच्या इतिहासात घडलेली नाही. म्हणून माझा या प्रस्तावाला विरोध आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले ती वस्तुस्थिती आहे. पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदणी झालेली जी धर्मादाय रुग्णालये आहेत त्यांनी कायद्यातील कलम 41अअ प्रमाणे 10 टक्के गोरगरिबांवर उपचार केले पाहिजेत अशी तरतूद आहे. त्या तरतुदीचे पालन ही धर्मादाय रुग्णालये करीत नव्हती. ते गरिबांचा अपमान करीत होते. म्हणून सभागृहाने माझ्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली होती. मी आणि सन्माननीय समिती सदस्यांनी अनेक धर्मादाय रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. सभापती महोदय, श्री.मनेश मसंद यांनी आमचा फार मोठा अपमान केला. त्यांनी आम्हाला जवळजवळ हाकलून लावले. त्यानंतर हा हक्कभंग प्रस्ताव दाखल झाला होता. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आता जी घटना सांगितली ती घटना वेगळी आहे. आता ते काय करीत आहेत? या सर्व धर्मादाय रुग्णालयांचे असोसिएशन करुन हा कायदा मानायचा नाही, गरिबांवर उपचार करायचे नाहीत, कंपनी ॲक्टखाली या रुग्णालयांची नोंदणी करायची यासाठी श्री.मनेश मसंद मार्गदर्शन करीत आहेत. समितीने जो निर्णय घेतला आहे त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु या प्रस्तावाचा फेरविचार करावा आणि त्यांना कठोर शिक्षा केल्याशिवाय गरिबांना सेवा मिळणार नाही. फार मोठे काम या निमित्ताने व्हावयास लागले आहे. एखाद्या गरिबाच्या घरामध्ये कोणाला हृदयविकार झाला असेल, टी.बी. किंवा कॅन्सर झाला तर उपचारासाठी 2-3 लाख रुपये त्यांनी कुठून आणायचे? आपले घर, दागदागिने विकूनही इतके पैसे जमा करु शकत नाही. शेवटी मरणाची वाट पहावी लागत होती. या कायद्यातील तरतुदीप्रमाणे 25 हजाराच्या आत उत्पन्न असलेला तहसीलदाराचा दाखला असल्यास मोफत उपचार, 25 ते 50 हजाराच्या आत उत्पन्न असल्यास 50 टक्के मोफत उपचार मिळतात. त्यामुळे समितीने फेरविचार करुन कठोर शिक्षा दिल्याशिवाय ही धर्मादाय रुग्णालये वठणीवर येणार नाहीत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, परंतु काळ सोकावतो आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

नंतर 2एल.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापासून नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय उपमुख्यमंत्री व सभागृहाचे नेते यांना हा प्रस्ताव सभागृहात मांडावा लागेल. कारण आमचा विश्वास आता विशेष हक्क भंग समितीवर राहिलेला नाही. प्रत्येक गोष्टीला माफी वगैरे जो प्रकार चालू आहे त्यामुळे आमचा विश्वासच नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, ज्यावेळेस श्री. मसंद यांना समितीसमोर बोलाविण्यात आले होते त्यावेळेस सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे सुध्दा या समितीचे सदस्य होते. श्री. मसंद यांना समितीसमोर साक्षीसाठी बोलाविण्यात आले त्यावेळेस क्रॉस एक्झामिनेशन होत असते. हे क्रॉस एक्झामिनेशनचे काम जवळपास 5-6 तास चालू होते. त्यावेळेस सुध्दा माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या उपस्थित होते. त्यानुसार प्रथमदर्शनी या समितीने इन्फरन्स काढला होता की या प्रकरणात श्री. मसंद यांनी सभागृहाचा अवमान केलेला आहे या निष्कर्षाप्रत समिती आलेली आहे व त्यासंबंधी संपूर्ण विवेचन नागपूर अधिवेशनात समितीने या प्रकरणाचा अहवाल सभागृहाला सादर केला त्यात केलेले आहे. प्रश्न एवढाच मर्यादित होता की, श्री. मसंद यांना सजा द्यावयाची की नाही ? त्यावेळेस समितीने पुनर्विचार केला. एवढे होऊन देखील सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आताच सांगितल्यानुसार श्री. मसंद पुन्हा पुन्हा त्याच चुका करीत आहेत. समितीसमोर क्रॉस एक्झामिनेशन झाल्यानंतर श्री. मसंद यांनी अनकन्डिशनल स्वरुपाचे लेखी पत्र समितीला दिले होते की, "मला समितीने क्षमा करावी, माझ्याकडून चूक झालेली आहे आणि यापुढे एकही चूक होणार नाही" हे त्यांचे निवेदन समितीने मान्य केले. एवढेच मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, समितीसमोर असे लेखी लिहून दिल्यानंतर देखील काही घटना घडल्या आहेत. याचा अर्थ त्यांच्या वागण्यात सुधारणा झालेली दिसत नाही. उलट मुंबईतील अशा हॉस्पिटल्सची युनियन करुन हे गरिबांवर एक प्रकारे अत्याचारच करीत आहेत. म्हणून माझी विनंती अशी आहे की, समितीने दिलेल्या अहवालावर सभागृहाने फेरविचार करावा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, माझी अशी आग्रहाची विनंती राहील की, नागपूर अधिवेशनात यासंबंधीचा जो अहवाल सादर केलेला आहे. तरी देखील श्री. मसंद यांच्या वागण्यात व बोलण्यात कोणतीच सुधारणा झालेली दिसत नाही म्हणून यासंदर्भात सभागृह कारवाई करु शकते.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या राज्याचे जबाबदार मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी सभागृहाला जी माहिती दिली ती अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. श्री. मसंद यांनी समितीसमोर लेखी निवेदन करुन माफी मागितलेली असताना देखील त्याच इतिहासाची पुनरावृत्ती ते करणार असतील तर हा ठराव फेटाळण्याचा अधिकार सुध्दा सभागृहाला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

जर हा ठराव आपल्याला फेटाळावयाचा असेल तर हा ठराव फेटाळण्याचा अधिकार या सभागृहाला आहे म्हणून आम्ही हा ठराव फेटाळत आहोत. हे प्रकरण पुन्हा विशेष हक्क समितीकडे देण्यात यावे आणि या हक्कभंगाचे प्रकरण कंटीन्यू सुरु ठेवावे. श्री.मनेश मसंद जर अशा प्रकारे माननीय मंत्रीमहोदयांचा अपमान करीत असतील तर ते योग्य राहणार नाही. त्यांचे ज्या जागेवर दवाखाने आहेत त्या जागा आमच्या असून त्यावर ते करोडो रुपये कमावित असतात. आमच्या जागेवर करोडो रुपये कमावित असतांना त्या दवाखान्यात जर लोकप्रतिनिधी किंवा गोरगरीब गेला आणि त्यांचा जर अवमान केला जात असेल तर ते यापुढे खपवून घेतले जाणार नाही. त्यामुळे हा ठराव फेटाळला पाहिजे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे ते प्रकरण सुध्दा या हक्कभंगामध्ये घेऊन संबंधितांना पुन्हा साक्षीसाठी बोलावले पाहिजे.

उपसभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकलेले आहे. मंत्रीमहोदयांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच विशेष हक्क समितीच्या समिती प्रमुखांचे म्हणणे सुध्दा ऐकून घेतलेले आहे. या ठिकाणी जो ठराव आलेला आहे तो आपल्याला मान्य नाही असे आपण सांगितलेले आहे. या ठरावाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सुध्दा त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या ठिकाणी समिती प्रमुखांनी असे सांगितले की, यापूर्वी श्री. मनेश मसंद यांच्याकडून ज्या चुका झालेल्या होत्या त्या त्यांनी मान्य केलेल्या आहेत. श्री. मसंद यांनी त्यावेळी माफी मागितली होती परंतु ती आता आपल्याला मान्य नाही, हा भाग वेगळा. परंतु त्यानंतर पुन्हा अशा काही घटना घडलेल्या आहेत की, श्री. मसंद यांनी सन्माननीय सदस्यांचा अवमान करण्याचे काम कायम ठेवलेले आहे. या ठिकाणी जो अहवाल ठेवण्यात आलेला आहे त्यासंदर्भात मी एवढेच म्हणेन की, पुनर्विचारार्थ हाच अहवाल तसेच डॉ. दीपक सांवत यानी या ठिकाणी जे विचार व्यक्त केलेले आहेत तो विषय सुध्दा या हक्कभंगात घेऊन आपण हा हक्कभंग विशेष हक्कभंग समितीकडे सोपवू या. (अडथळा) यासंदर्भात मी पुन्हा सांगतो की, या ठिकाणी आता समितीने जो अहवाल सादर केला त्याच्यावर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आपले म्हणणे मांडलेले आहे तसेच माननीय मंत्री महोदय व विशेष हक्क समितीचे समिती प्रमुख यांनी सुध्दा त्यांचे म्हणणे मांडलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

आहे. या सर्वांच्या म्हणण्यावरून श्री. मसंद यांच्या बद्दल तीव्र नापसंती लक्षात आलेली आहे. पहिली घटना घडली त्यावेळेस विशेष हक्क समितीच्या समिती प्रमुखांनी संपूर्ण चौकशी केली. श्री. मसंद यांना समितीपुढे पाचारण करण्यात आले होते. श्री. मसंद यांनी त्यांचे म्हणणे समिती पुढे मांडले व नंतर माफीही मागितली. श्री. मंसद यांनी चूक केली होती म्हणूनच त्यांनी माफी मागितली होती हे तितकेच खरे आहे. श्री. मसंद यांनी माफी मागितल्यानंतर अशाच प्रकारची घटना घडली असेल तर श्री. मसंद यांच्या वर्तणुकीत काही सुधारणा झाली नाही असे सकृतदर्शनी मान्य करण्यास काहीही हरकत नाही. आपण असे म्हणतो की, 10 गुन्हेगार सुटले तरी चालतील परंतु एका निरपराध्याला शासन होता कामा नये. या न्यायाने श्री. मसंद यांची आधीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन आणि आता पुन्हा त्यांच्याकडून जी घटना घडलेली आहे त्यासंदर्भात पुनर्रचौकशी करावी आणि त्याचौकशीसह सकट आपण आपला फेर अहवाल सभागृहाला सादर करावा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी आता आपण जे निर्देश दिलेले आहेत ते समितीला बंधनकारक राहणार आहेत. या ठरावाचे पुनर्चौकशी करावायाची असेल तर आता आपल्याकडे जी नवीन माहिती उपलब्ध झालेली आहे ती सर्व माहिती समिती समोर यावयास पाहिजे. या ठिकाणी आता केवळ निवेदन करण्यात आलेले आहे. म्हणून निवेदन करणे एक गोष्ट आणि त्यासंदर्भातील जी परिस्थिती उद्‌भवली आहे त्यासंदर्भातील स्पष्ट निवेदन समिती समोर येणे आवश्यक आहे. जी माहिती समिती समोर येईल त्या माहितीच्या आधारेच समिती कार्यवाही करेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

उपसभापती :हे सगळे प्रकरण मी विशेष हक्क समितीकडे पुनर्विचारासाठी पाठवित आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मला आपल्याकडून थोडे मार्गदर्शन हवे आहे कारण प्रोसिजर प्रमाणे विशेष हक्क समितीच्या समिती प्रमुखांनी हा ठराव मांडलेला आहे. त्यामध्ये त्यांनी शेवटी असे म्हटले आहे की, "विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

तो विचारात घेण्यात यावा की नाही? त्यावेळी "होय" असे म्हटल्यानंतर त्यावर चर्चा होऊ शकते. त्या चर्चेमध्ये आपल्याला हा अहवाल मंजूर नाही किंवा या अहवालामध्ये आपल्याला सुधारणा करुन हवी आहे, अशाप्रकारची चर्चा होते. आणि ही चर्चा यापूर्वी अनेकवेळा झालेली आहे. एकदा हा अहवाल समितीकडे पाठविल्यानंतर तो दोन वर्षानंतर येणार. त्याऐवजी आपल्याला या अहवालावर आजच चर्चा करुन त्यातील शिफारशींना अमेंडमेंट देता येईल. त्यामुळे याठिकाणी अहवाल विचारात घेण्यात आल्यानंतर त्यावरील चर्चेला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता या अहवालाला सुधारणा येऊ शकते. त्या सुधारणेसहीत हा ठराव आपल्याला सभागृहासमोर मांडता येईल असे माझे मत आहे. ते योग्य आहे की अयोग्य आहे हे आपण समजून सांगितले तर त्यामुळे सभागृहाचा वेळ जाणार नाही. एकदा समितीने निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्याच समितीकडे हे प्रकरण पाठवून तुमचा निर्णय पुन्हा सांगा असे म्हणणे म्हणजे कोर्टाने एकदा निर्दोष असल्याचा निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्याच कोर्टापुढे जाऊन हा निर्दोष की दोषी आहे असे त्या कोर्टाला विचारण्यासारखे आहे, असे कसे करता येईल?

श्री. दिवाकर रावते : सभागृहाचे नेते व उपमुख्यमंत्री माननीय श्री. छगन भुजबळ यांनी या अहवालाच्या संदर्भात दोन विषय मांडले आहेत. विशेष हक्क समितीच्या माननीय समिती प्रमुखांनी सभागृहापुढे अहवाल मांडल्यानंतर तो स्वीकारावयाचा की नाकारावयाचा हा या सभागृहाचा अधिकार आहे. तो अधिकार बजावीत असतांना त्या अहवालाच्या संदर्भात या सभागृहाला नक्की काय म्हणावयाचे आहे, म्हणून आपल्याला उपसूचना देता येते. याबाबत मी मघाशी आपणास विनंती करीत होतो की, माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव हा दुरुस्तीसह आपल्याला मांडावा लागेल. आपण याठिकाणी जो मूलभूत विषय मांडला आहे तो मला महत्वाचा वाटतो. याचे कारण समितीकडून एकदा अहवाल मांडण्यात आल्यानंतर त्या समितीकडे पुन्हा तो अहवाल पाठवून त्यामधून वेगळा अहवाल येईल असे मला वाटत नाही. याबाबतीत मला अनुभव आला आहे. मागील वेळी माननीय सभापतींच्या विनंतीवरुन माझ्या संदर्भात विशेष हक्कभंग समितीचा अहवाल परत पाठविल्यानंतर तो दीड वर्षानंतर जसाच्या तसा सभागृहापुढे पुन्हा सादर करण्यात आला. मी त्यावेळी गप्प बसलो, पुन्हा त्याबाबत वाद-विवाद नको म्हणून गप्प बसलो. या सदनाची समिती असल्यामुळे तिचा अवमान करणे योग्य वाटले नाही म्हणून मी शांत राहिलो. परंतु याठिकाणी माननीय मंत्री उभे रहातात व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

ते आपला अवमान झाला असे सांगतात. मुंबईच्या दृष्टीने हा विषय गंभीर आहे. या शहरामध्ये मोठमोठी खाजगी रुग्णालये झालेली आहेत त्याठिकाणी त्यांनी ठरवून दिल्याप्रमाणे आणि सरकारने करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे 5 ते 10 खाटा राखीव ठेवून त्याठिकाणी गोरगरिबांना ट्रिटमेंट दिली पाहिजे असा विषय सदनापुढे होता. त्या निमित्ताने समिती नियुक्त करण्यात आली होती. समितीने त्या रुग्णालयाला भेट दिली होती. त्यावेळी समितीचा जो अवमान झाला त्याचा बोलबाला मुंबईतील वर्तमानपत्रामधून आणि दूरदर्शनवरुन झाला. हे लोक सरकारला जुमानत नाहीत. आणि म्हणून माझी विनंती आहे की, हा अहवाल आपल्याला मंजूर नसेल तर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांची उपसूचना मांडावी आणि ती स्वीकारल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्र्यांना व सभागृहाच्या नेत्यांना ठराव मांडावा लागेल. त्यानंतर पुढील कारवाई माननीय सभापतींच्या मान्यतेने आपल्याला करता येईल असे मी सांगू इच्छितो.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, विशेष हक्क समितीच्या माननीय समिती प्रमुखांनी समितीचा अहवाल सभागृहापुढे सादर केल्यानंतर या सभागृहामध्ये माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ साहेबांनी जे निवेदन केले आहे, व जी वस्तुस्थिती समोर आली आहे ती गंभीर स्वरुपाची आहे. या कायद्याच्या राज्याला "मसंद" नावाचा माणूस मानीत नाही. हा केवळ या सभागृहाचा नाहीतर कायद्याचा अपमान करीत आहे. याठिकाणी या सभागृहाच्या माननीय नेत्यांनी जी सूचना मांडली आहे, त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांचा पुढील प्रस्ताव दुरुस्तीसह आपल्याला मांडता येईल. आणि त्यावर आजच सभागृहाचा निर्णय घ्यावा. सभागृहाच्या माननीय नेत्यांनी दुरुस्तीसह ठराव मांडून तो सभागृहाने आजच मंजूर करावा आणि संबंधित व्यक्तिला दोन दिवसांची शिक्षा करावी.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते व माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेल्या चर्चेनुसार आपण हा ठराव याठिकाणी मांडावा. आणि पुन्हा एकदा समितीकडे हा विषय पाठविण्यात यावा. याठिकाणी आपण उपसूचना देऊ शकता. परंतु दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांचे हे मत असल्यामुळे आपण हा ठराव मांडावा व तो सभागृहाने एकमताने संमत करावा.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय भुजबळ साहेब यांनी या ठिक्राणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, विशेष हक्क समितीने आपला अहवाल दिलेला आहे. समितीचे या संदर्भातील जे काही म्हणणे आहे ते मी केवळ समिती प्रमुख म्हणून दिलेले नाही तर समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांची या अहवालाला पूर्णत: मान्यता आहे असे गृहीत धरुन हा अहवाल देण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या समितीसमोर काय भाष्य केले,त्यांची उलट तपासणी काय केली हे त्यामध्ये नमूद केलेले आहे. माजी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनीही त्याठिक्राणी काय आक्षेप घेतले, त्यांनी उलट तपासणीत काय विचारले हेही अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.माननीय मंत्रिमहोदयांनी आता या सभागृहात जी भूमिका मांडली तीच त्यांची भूमिका होती. पण श्री. मसंद संबंधित समिती रुग्णालयामध्ये भेटीसाठी गेली होती त्यावेळी समितीसमोर न आल्यामुळे त्यासंदर्भात या दोन्ही सन्माननीय सदस्यांनी त्यांची भूमिका या समितीसमोर मांडलेली होती. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर यासंदर्भात विशेष हक्क भंग झालेला आहे, सभागृहाचा अवमान झालेला आहे, सदस्यांचा अवमान झालेला आहे. या निष्कर्षाप्रत ही समिती आली. परंतु या श्री.मसंद यांनी समितीसमोर लेखी लिहून कळविले की, माझ्याकडून जर चुका झाल्या असतील तर मला तुम्ही क्षमा करा.(अडथळा)त्यांनी बिनशर्त माफी मागितलेली आहे. मला कुठल्याही वादात जायचे नाही, मला माफी द्या, असे प्रकार माझ्याकडून कधीही होणार नाहीत हे त्यानी एकदा मान्य केल्यानंतर आणि त्यासंबंधीचा समितीचा अहवाल सभागृहासमोर आणल्यानंतर आता पुन्हा त्यात फेरफार करुन, पुन्हा जर तोच रिपोर्ट येणार असेल,.... सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी जी भिती व्यक्त केली त्याप्रमाणे दुर्दैवाने तशाच प्रकारचा निर्णय करावा लागेल म्हणून यासंदर्भात या सन्माननीय उच्च सभागृहाचे सभापती म्हणून आपण जो निर्णय घ्याल तो समितीला बंधनकारक राहील एवढेच मला या निमित्ताने निदर्शनास आणावयाचे आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, विशेष हक्क समितीचा निर्णय असा आहे की, श्री. मसंद हे दोषी आहेत हा विषय येथेच संपला. आता हे दोषी आहेत तर त्यांना माफ करावे की आणखी काही शिक्षा द्यावी, एवढाच प्रश्न आहे आणि मला असे वाटते की, या सभागृहाने याबाबतीत निर्णय घेण्याचा हा प्रश्न आहे.

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी सुध्दा विशेष हक्क समितीचा गेली पाच वर्षे सभासद होतो. सभागृहाच्या नेत्यांनी या ठिक्राणी उल्लेख केल्याप्रमाणे हे सभागृह सर्वोच्च आहे कारण या समितीत एकदा निर्णय झाल्यानंतर परत तो तिकडे रेफर करणे हे तांत्रिकदृष्टया आणि कायदेशीरदृष्टया किती योग्य आहे हे मला माहीत नाही. तेवढा माझा स्वत:चा अभ्यास नाही. परंतू हे अत्युच्च सभागृह आहे. या सभागृहाला अधिकार आहेत. या सभागृहाने निर्णय घ्यावा आणि यामध्ये सुधारणा करुन शिक्षेची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विशेष हक्क समितीचे समिती प्रमुख सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यामध्ये असे लिहिलेले आहे की, "हा प्रस्ताव विचारात घेण्यात यावा." याचा अर्थ हा प्रस्ताव आता सभागृहाची प्रॉपर्टी झालेला आहे. सभागृहाने यावर निर्णय करायचा आहे. या सभागृहाचे नेते श्री. भुजबळसाहेबांनी या ठिकणी जी सूचना केलेली आहे ती सूचना योग्य आहे असे मला वाटते. पुन्हा हा अहवाल समितीकडे पाठवावयाचा आणि पुन्हा त्याला दोन वर्षे लागायची..... आता ही प्रॉपर्टी सभागृहाची झाली. तेव्हा हा प्रस्ताव सभागृहात विचारात घेण्यात यावा. ही घटना घडलेली आहे हे सिध्द झालेले आहे. माननीय समिती प्रमुखांनी या ठिकाणी सांगितले की, त्यांनी हे कबूल केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांचा अवमान झालेला आहे.त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्टेटमेंट दिलेले आहे. सभापती महोदय, आधी थोबाडीत मारायची आणि पुन्हा माफी मागायची आणि पुन्हा तशाच पध्दतीचा प्रकार करायचा. सभापती महोदय, आपण त्यावेळी या सन्माननीय आसनावर नव्हतात.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या सभागृहाचे सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांच्याही बाबतीत काल अशी घटना घडली. हे सन्माननीय गृहस्थ एवढे मोठे आहेत काय ? त्यांनी पहिल्यांदा हा सगळा गुन्हा मान्य केला. त्यांनी गुन्हा कबूल केल्यानंतर आपण उदार अत:करणाने त्यांना माफी द्यावयाची आणि त्यांनी पुन्हा तोच गुन्हा करावयाचा हे योग्य नाही. सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांनी जी सूचना मांडली त्या सूचनेचे मी समर्थन करतो आणि त्याला अशी उपसूचना मांडतो की, या सभागृहामध्ये त्याला दोन दिवसांची शिक्षा द्यावी अशा प्रकारचा निर्णय सभागृहाने करावा अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी या समितीवर होतो आणि माझ्यामुळे हा वाद झाला होता त्यामुळे आपण मला दोन मिनिटे बोलू द्यावे. सभापती महोदय, त्यावेळी आम्ही तीन चार हॉस्पिटल्सना भेट देण्याचे ठरविले होते. आधी आम्ही बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेलो. त्यानंतर हिंदुजा हॉस्पिटलमध्ये गेलो आणि नंतर जसलोक हॉस्पिटलमध्ये गेलो. जसलोक हॉस्पिटलमध्ये ज्यावेळी आम्ही गेलो त्यावेळी मी अशी विचारणा केली की, या हॉस्पिटलचे मॅनेजर कोण आहेत ? त्यावेळी असे सांगण्यात आले की, ते भेटावयास यायला तयार नाहीत. त्यांची जी कोणी स्टेनो किंवा पी.ए.होती ती आम्हाला भेटावयास आली आणि त्या ठिकाणी जेव्हा हा वाद झाला तेव्हा मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगितले की, आपल्याला या हॉस्पिटलची कोणत्याही प्रकारे चर्चा करावयाची नाही किंवा यावर कोणतेही भाष्य करावयाचे नाही. जेव्हा श्री. मसंद आमच्यासमोर आले तेव्हा ते माननीय मंत्रिमहोदयांच्या आणि आमच्या अंगावर येण्यासारख्या भाषेमध्ये बोलावयास लागले. त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत मध्ये पडले. आम्ही सांगितले की, तुमच्या विरुध्द हक्कभंग देऊ. ते असे म्हणाले की, मी कोठलाही हक्कभंग वगैरे मानत नाही. त्यांनी एवढी अरेरावी केली की त्या ठिकाणी हातघाईवर येण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. या निमित्ताने आणखी एक गंभीर बाब मला सांगावयाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी गंभीरपणे असे वक्तव्य केले आहे की, श्री. मसंद हे सगळ्या हॉस्पिटल्सचे असोसिएशन करावयास मागत आहेत. सभापती महोदय, यामध्ये आणखी एक बाब अशी आहे की, या हॉस्पिटलने नुसती जागा घेतलेली नाही तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

त्यांनी ऑक्ट्रॉयची सवलत घेतली. त्यांनी सेल्स टॅक्सची सवलत घेतली. पाण्याची सवलत घेतली तसेच त्यांनी कस्टम ड्युटी सुध्दा माफ करुन घेतली आहे. जर त्यांना असोसिएशन करुन वेगळी कंपनी करावयाची असेल तर या सवलती आणि जमिनीची किंमत आता बाजारभावाप्रमाणे जी असेल त्याप्रमाणे वसूल करावी लागेल अशा प्रकारची नोंद मी या निमित्ताने सभागृहामध्ये करीत आहे. यादृष्टीकोनातून शासनाने कायदेशीर बाब तपासून ती कंपनी कशी होणार नाही यासाठी आधीच कोर्टात जाऊन आपल्याला त्यावर बंधन आणावयास पाहिजे. माझी या ठिकाणी मांडण्यात आलेल्या उपसूचनेच्या बाबतीत माझी अशी मागणी आहे की, त्यांना दोन दिवसांची नाही तर सात दिवसांची शिक्षा द्यावी.

सभापती : या अनुषंगाने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्या समितीचे समिती प्रमुख म्हणून आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुध्दा या अनुषंगाने भाष्य केलेले आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी या अनुषंगाने 20 मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करतो आणि त्यानंतर याबाबत निर्णय देण्यात येईल्.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.29 ते 3.49 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. अजित शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.50 ते 4.05 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.05 ते 4.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांच्या वर्तणुकीच्या संदर्भात या सभागृहाच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. विशेष हक्क समितीने त्यासंदर्भात ते दोषी असल्याचा अहवाल सभागृहाला सादर केला आहे. त्यामध्ये त्यांची क्षमायाचाना स्वीकारुन त्यांना माफ केलेले आहे. परंतु त्यांना दिलेली माफी सभागृहाला मान्य नाही. म्हणून माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांना 2 दिवसाची सजा द्यावी अशा प्रकारची सूचना केली आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी त्यांना 7दिवस शिक्षा करावी असे सांगितले. विशेष हक्क समितीसमोर केलेली क्षमायाचना आणि त्यांच्या समिती समोरील 5-6 साक्षी लक्षात घेता मी माननीय सभागृहाचे नेते आणि उपमुख्य मंत्री यांना अशी सूचना करतो की, त्यांना या सर्वोच्च सदनाच्या न्यायासना समोर बोलावून सक्त ताकीद द्यावी. ज्या प्रमाणे लेडीज बारच्या प्रकरणी सजा दिली होती त्याप्रमाणे आपण ताकीद दिली तर आख्ख्या महाराष्ट्रामधे या सर्वोच्च सदनाचा अवमान करणा-यांना संदेश जाईल, म्हणून मी ही सूचना आपणास करीत आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सभापती : अहवाल विचारात घेण्यात आला आहे. आता माननीय उपमुख्य मंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा

श्री. छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय "श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास दिलेला नकार" या विषयावरील विशेष हक्काच्या प्रश्नाबाबत विशेष हक्क समितीचा अहवाल आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्यानंतर हे सभागृह असा ठराव करते की,

"मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इ. धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणी संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या तदर्थ समितीने दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रुग्णांचे रेकॉर्ड मागितले असता श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास नकार दिल्यामुळे तसेच समिती सदस्यांशी दुरुत्तरे व गैरवर्तन केल्यामुळे उद्‌भवलेल्या समितीच्या, सन्माननीय सदस्यांच्या व

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपमुख्यमंत्री...)

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह असा ठराव करीत आहे की, विशेष हक्क समितीने त्यांची क्षमायाचना सभागृहाने औदार्य दाखवून स्वीकारावी अशी शिफारस केली असली तरी श्री. मनेश मसंद यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे विशेष हक्काचा भंग झाला आहे. म्हणून सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन श्री. मनेश मसंद यांना या सर्वोच्च सभागृहाच्या न्यायासनासमोर तात्काळ बोलावून ताकीद देण्यात यावी व भविष्यात असा प्रकार घडल्यास ते कठोर शिक्षेस पात्र राहातील, असे कळविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील 8000 मराठी शाळांना अद्याप मान्यता न मिळणे

मु.शी.: राज्यातील 8000 मराठी शाळांना अद्याप मान्यता न मिळणे या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.किरण पावसकर, ॲड.अनिल परब, श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी दीड तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"मराठी शाळांना अनुदान द्यावे लागत असल्यामुळे आर्थिक बोजा सरकारवर पडतो त्यापेक्षा इंग्रजी शाळांना अनुदान द्यावे लागत नसल्यामुळे इंग्रजी शाळांना तात्काळ राज्य शासनाकडून मंजूरी दिली जाते अशा आशयाचे विधान शालेय शिक्षण मंत्री यांनी धुळे येथील देवरे गावातील बापू साहेब ठोंबरे विद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या कार्यक्रमात जाहीर करणे, सन २००८ मध्ये महाराष्ट्रातील ८००० मराठी शाळांना मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करूनही त्या शाळांना मान्यता देण्यात न येणे. मराठी शाळांना कायम विना अनुदानित म्हणूनही मान्यता न देणे, त्यामुळे राज्यातील लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहणे, राज्य शासनाच्या कारभारात मराठीचा वापर करावा असे राज्य शासनाने आदेश काढणे, परंतु मराठी शाळांना मात्र परवानगी दिली जात नाही, या विसंगतीमुळे राज्यातील मराठी मुलांवर होत असलेला अन्याय याबाबत फेरविचार करुन मोठ्या प्रमाणावर मराठी शाळांना मान्यता देण्याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(नंतर 2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : महोदय, लक्षवेधी क्रमांक 3 ही सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी दिलेली आहे. ती लक्षवेधी सूचना या चर्चेत क्लब करण्यात आली आहे.

सभापती : ठीक आहे, मी सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांना देखील बोलण्याची संधी देणार आहे. या प्रस्तावावर ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल त्यांनी आपापली नावे प्रतोदामार्फत पाठवावीत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांच्यासाठी 15 मिनिटे वेळ जास्त देणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपले भाषण सुरु करतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मराठी भाषेकरिता सतत आणि सातत्याने आग्रह धरण्याची पाळी या सभागृहात येत आहे. राज्याच्या माननीय शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भातील धोरणात्मक परिस्थिती काय आहे हे उत्तरातच सांगितले पाहिजे अशी मी अपेक्षा करतो. धुळे येथे माननीय शिक्षण मंत्री गेले होते त्या ठिकाणी शाळेच्या समारंभात राज्यातील मराठी शाळांच्या संदर्भातील विदारक परिस्थिती त्यांनी मांडली. हा विषय टीकात्मक न होता राज्याच्या शिक्षणविषयक धोरणाच्या अनुषंगाने त्याकडे पहावे या उद्देशाने जसा मी उभा राहिलो आहे तसेच राज्यातील मराठी कुटुंबांनी, सर्व मराठी अभिमान्यांनी देखील या बाबीची गंभीरपणे दखल घ्यावी यादृष्टीने ही चर्चा मी उपस्थित करीत आहे. हे करीत असताना मला ज्ञात असलेले दाखले अवश्य मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारची घोषणा धुळ्याच्या कार्यक्रमात केली. मुळात त्यांच्यावर अशी परिस्थिती का यावी याचे आत्मचिंतन राज्यातील 10 कोटी जनतेने करावे इतकी ही गंभीर बाब आहे. मी समजू शकतो की, प्रत्येक कुटुंबातील स्वाभिमानी पालकाला वाटते की, माझा पाल्य उच्च शिक्षीत व्हावा, प्रचंड ज्ञानी व्हावा आणि त्याच्या शिक्षणाच्या कवडशामधून त्याने उंच झेप घ्यावी व आपल्या शिक्षणाने त्याने जग जिंकावे. मग तो श्रीमंत पालक असो वा गरीब असो, झोपडपट्टीत राहणारा असो अथवा महालात राहणारा असो. घरात काम करणाऱ्या मोलकरणीला सुध्दा आपला मुलगा, ज्याच्या घरी आपण काम करतो त्याच्या मुलापेक्षा जास्त शिकलेला असावा अशी भावना असणे ही आनंदाची गोष्ट आहे. मी ग्रामीण भागात काम करणारा आहे, तसेच आपण देखील ग्रामीण भागातीलच आहात. प्रत्येक शेतकऱ्याला वाटते की, आपण उपाशी राहून मुलाला शिकवावे. त्यानुसार काही ठिकाणी ज्यांना दोन-चार मुले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

असतात त्यांच्यात वाटण्याच झालेल्या असतात की, कोणत्या मुलाने शेती करावी, कोणत्या मुलाने शिक्षण घ्यावे, त्यासाठी आम्ही मात्र उपाशी राहू पण मुलांना शिकवू अशी त्यांची तयारीच असते. वास्तवात असे करतात की नाही माहीत नाही पण तशी इच्छाशक्ती असावी की माझा मुलगा शिकावा. या राज्याची राज्यभाषा मराठी असावी आणि प्रत्येक जन्माला येणाऱ्या मुलाला मराठीचा स्वाभिमान असावा. माझ्या मातेतील भाषा मला आलीच पाहिजे यासाठीच हे शिक्षण धोरण असावे अशी मी अपेक्षा करतो. या राज्यात श्री. पी.जी.खेर यांनी त्या काळात शिक्षण धोरण आखले होते व त्यांनी मराठीचा ध्यास घेतला होता. त्या काळात मराठी भाषेत सातवीपर्यंत शिक्षण देण्याचा आग्रह त्यांनी धरला होता व त्यावर बरीच टीका-टिप्पणी सुध्दा झाली होती. मी त्या काळात शाळेत शिकणारा विद्यार्थी होतो. त्या काळात सातवीपर्यंत फक्त मराठी भाषाच होती. आठवीमध्ये "ए""बी""सी""डी" आम्हाला शिकवत होते. आठवीमध्ये आम्ही "ए""बी""सी""डी" शिकलो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्यानंतर पुढचे शिक्षण घेतले. आम्हाला उच्च शिक्षण घेतांना आम्ही मराठी भाषेत शिक्षण घेतले म्हणून कधीही अडचण भासली नाही. त्यावेळी चांगल्या प्रकारे शिक्षण मिळत होते याची प्रचिती आजच्या शिक्षणावरुन आपल्याला दिसून येते. मराठी भाषेच्या बाबतीत जी भयानकता निर्माण झालेली आहे ती आता आपल्याला पटते.

तपश्चर्येतून निर्माण झालेल्या धोरणाला नेहमी सन्मानित करावे असे मी नेहमी बोलत असतो. यामध्ये मी कधीही राजकारण आणत नाही. सरकारचे कोणतेही धोरण चांगले असेल तर मी नेहमीच पाठिंबा देत असतो. 8000 प्रस्ताव शासनाकडे येऊन पडले आहेत हे सांगण्यास मला अतिशय वेदना होतात. 8000 शाळांच्या प्रस्तावाला मान्यता दिली आणि त्यांना विद्यार्थी मिळाले नाहीत तर त्या शाळा अनुदान प्राप्त होतील आणि करोडो रुपयांचे अनुदान शासनाला द्यावे लागेल अशी भिती शिक्षण खात्यापुढे निर्माण झालेली आहे. ज्या शाळेकडे मुले जात नाही अशा शाळांना शासनाने मान्यता द्यावयाची काय? विनाअनुदानितची मान्यता घेतल्यानंतर मग विद्यार्थी मिळो अथवा न मिळो त्या शाळा एकदा अस्तित्वात आल्यानंतर या शाळांना शासनाला अनुदान द्यावेच लागणार आहे. या सदनाला एक खास अधिकार प्राप्त झालेला आहे तो अधिकार विधानसभेलाही प्राप्त झालेला नाही. शिक्षक मतदारसंघातून या ठिकाणी निवडून येणारे आमचे सर्व सन्माननीय सदस्य शिक्षकांचे प्रश्न लावून धरण्यासाठीच येथे आलेले आहेत. विना अनुदानित मधला "विना" हा शब्द कधी काढता यासाठी प्रश्न उपस्थित करीत असतात. त्या शाळा अनुदानित झाल्या की, त्या शाळांचा प्रश्न मिटेल अशी परिस्थिती आहे. या सभागृहातील सर्वात जास्त वेळ आदिवासी लोकांकरिता जातो का? रंजलेल्या गांजलेल्यांसाठी जातो का? जनतेच्या समस्यांसाठी जातो का? गरिंबासाठी जातो काय ? या सर्व विषयांवर या ठिकाणी नक्कीच चर्चा होत असते. परंतु या सदनामध्ये शिक्षकांच्या पगाराचा विषय जास्त वेळ चालतो म्हणून माझी कोणतीही तक्रार नाही. कारण शिक्षण दिलेच नाही तर हा महाराष्ट्र घडणार नाही अशी माझीही भूमिका आहे. खरे म्हणजे घटनेनेच शिक्षकांची काळजी घेतलेली आहे. घटनेने शिक्षक मतदार संघ तयार केलेले आहेत. आपल्या अर्थसंकल्पात शिक्षणावर 42 टक्के खर्च होत असतो. चौथा वेतन आयोग, पाचवा वेतन आयोग, सहावा वेतन आयोगाच्या उणिवांवर या ठिकाणी चर्चा होत असते. या सदनामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

शिक्षणापेक्षा शिक्षकांवरील चर्चा जास्त ऐकावयास मिळते ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणाच्या हिताचा प्रस्ताव मांडत असतांना शिक्षकांच्या धोरणात्मक भूमिकेच्या संदर्भात भूमिका मांडली गेली पाहिजे. ज्यावेळेस कामगारांचा प्रश्न येतो त्यावेळेला माझ्या सारखा सदस्य, श्री.भाई जगताप, श्री.जमा हे विचार मांडत असतात. त्यांचे विचार ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक असतो. 8000 मराठी शाळांना मान्यता देण्याचा बिकट प्रश्न शासनापुढे निर्माण झाला आहे. मला येथे नमूद करावेसे वाटते की, आम्ही परप्रांतियांच्या लोंढयाच्या संदर्भात विचार मांडल्यानंतर अनेकांना चिंता वाटते, अनेकांना काळजी वाटते,अनेकांना मत्सर वाटतो आणि अनेकांना त्यामध्ये राजकारण दिसते. मुंबईतून मराठी माणसे संपली आहेत काय ? मुंबईत मराठीतून शिक्षण घेणारी मुले संपलेली आहेत काय ? मुंबईत येणा-या लोंढयानी मोठया प्रमाणात मराठी शिक्षणाचा घास गिळंकृत केलेला आहे, मराठी शिक्षण उध्वस्त केलेले आहे हे मी आकडेवारी नुसार सिध्द करु शकतो.

मुंबई महानगरपालिकेत मी महापौर म्हणून काम केलेले आहे, विविध समित्यांवर काम केलेले आहे. मुंबईतील शिक्षणाच्या संदर्भातील परिस्थिती मी आपल्या निदर्शनास आणली तर येथे बसलेले सदस्य मग ते कोणत्या पक्षाचे आहेत, कोणत्या विचाराचे आहेत, सर्व भारतीय आहेत काय ?

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

हे सर्व विचार बाजूला ठेऊन आपले घर व्यवस्थित असेल तर बाकीचे सर्व व्यवस्थित असते., नाहीतर काहीच नसते. या भावनेने आपल्या महाराष्ट्रामध्ये आपली मुंबई मराठी माणसाच्या हातामध्ये असेल तर ती आपली राजधानी आहे अशी भूमिका आपण मांडीत आलो. त्यामध्ये दुजाभाव असण्याची गरज नाही. त्यामध्ये परप्रांतियाचा व्देष नाही, मत्सर तर बिल्कुल नाही. परंतु आमचे अस्तित्व संपवून जर कुणी येत असेल तर त्याकरिता प्रखरतेने विरोध करणे ही ठाम भूमिका असली पाहिजे, ती असणारच आहे. कारण महाराष्ट्राच्या भूमीकरिता रक्तसिंचन झाले आहे.

सभापती महोदय, आज मुंबईची परिस्थिती काय झाली आहे? मराठी माणसे कमी झाली आहेत. 27, 28 किंवा 29 टक्के मराठी माणसे झाली आहेत. आणि 70 ते 72 टक्के परप्रांतीय झाले आहेत, इतर भाषिक झाले आहेत. त्यांच्याबद्दल व्देषभावनेने मी बोलत नाहीतर माझ्याकडील आकडे बोलू लागले आहेत. मी याठिकाणी इतर खाजगी शाळांचा आलेख मांडीत नाही. तो कसा मांडावा हा माझ्यापुढे प्रश्न आहे. परंतु शासकीय धोरणानुसार ज्यांच्यावर घटनात्मक व कायदेशीर बंधने आहेत त्या महानगरपालिकेच्या अखत्यारीत शाळा आहेत, त्यांचा आलेख याठिकाणी मांडीत असतांना या मुंबई महानगरपालिकेच्या एकूण 428 शाळा आहेत, त्यामध्ये फक्त 1लाख 19 हजार 588 एवढेच मराठी विद्यार्थी शिकत आहेत, आणि 5358 शिक्षक आहेत. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेच्या हिंदी माध्यमांच्या शाळा 237 असून त्याठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या मराठीच्या संख्येच्या तोलामोलाने बरोबर आहे. म्हणजेच 1लाख 19 हजार 353 आहे. मराठी भाषिकांबरोबर हिंदी भाषिकांची संख्या फक्त 200 ने कमी आहे. या क्षेत्रामधून परप्रातियांचा एक अजब नमुना तुमच्यासमोर येत आहे. ते परप्रांतीय आहेत म्हणून त्यांच्या मुलांना शिकवू नका असे मी म्हणत नाही. त्यांना मुंबईमध्ये शिकविले जात आहे याचा मला आनंद आहे. परंतु मराठी भाषिकांची व हिंदी भाषिकांची संख्या बरोबरीने असल्याचे हे आकडेवारीवरुन दिसते. हे एक ज्वलंत उदाहरण आहे. सभापती महोदय, इंग्रजीच्या एकूण 48 शाळा आहेत, त्याठिकाणी 23 हजार 170 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. व शिक्षकांची संख्या 253 आहे. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या गुजराती समाजाच्या 95 शाळा आहेत, त्याठिकाणी 9847 विद्यार्थी आहेत, आणि 295 शिक्षक आहेत. सभापती महोदय, आणखी एक महत्वाचा मुद्दा असा की, मुंबई महानगरपालिकेच्या उर्दू भाषिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मराठी भाषिक व हिंदी भाषिकांच्या बरोबरीची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे.या विद्यार्थ्यांची संख्या 1 लाख 5 हजार 106 इतकी आहे. मुंबई महानगरपालिकेच्या उर्दू शाळा 206 आहेत. सभापती महोदय, आम्ही मुंबई महानगरपालिकेमध्ये सर्वधर्मसमभाव संभाळतो. आणि म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या तेलगू भाषिक शाळा असून त्यांची संख्या 4344 आहे, तेथील शिक्षकांची संख्या 198 आहे. या संपूर्ण चर्चेचे इंगित यामध्येच साठविले आहे. तामिळ भाषिकांच्या मुंबईत 46 शाळा आहेत, त्यामध्ये विद्यार्थी संख्या 11,129 इतकी आहे, आणि 403 शिक्षक आहेत. सभापती महोदय, कन्नड भाषिकांच्या 42 शाळा असून त्या ठिकाणी 4566 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व 147 शिक्षक त्यांना शिकवीत आहेत. या मुंबई महानगरपालिकेच्या विविध भाषिकांच्या एकूण 1146 शाळा मुंबईमध्ये आहेत, त्यामधील विद्यार्थ्यांची संख्या 3 लाख 97 हजार 104 आहे व शिक्षकांची संख्या 11 हजार 818 आहे . याचा अर्थ एकच आहे की, हे सर्व गणित एकत्र केले व या तीन लाखांमधून मराठीची संख्या उणे केली तर 30 टक्के मराठी व 70 टक्के इतर भाषिकांच्या शाळा मुंबई महानगरपालिका आपल्या खर्चाने चालविते.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मुंबईतील परप्रांतीयांच्या लोंढयांनी अस्तित्वात असलेल्या मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर ढकलले, त्याचा परिणाम म्हणून मुंबईतील मराठी शाळा ओस पडल्या. याबाबतीत जे आणखी अभिमानी आहेत त्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून इंग्रजीची कास धरली. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपल्या मुलांना टाकले. मराठी भाषेमध्ये काही दम नाही. मराठी भाषेमध्ये शिकविले तर आपला मुलगा मोठा होणार नाही, आपला मुलगा मराठी भाषेत शिकला तर त्याला काही भवितव्य रहाणार नाही, अशा प्रकारचा एक न्यूनगंड आपल्या मनामध्ये साठवून इंग्रजीचा वेगळया प्रकारचा प्रचार सुरु झाला. जनमाणसामध्ये असा एक पगडा बसला की, आपला मुलगा इंग्रजीतच शिकला पाहिजे. त्याचा परिणाम मराठी भाषेकडे तुच्छेतेने पाहण्याचा झाला.

सभापती महोदय, मी अनुभवातून सांगतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेची अडचण येते त्यांना मराठी बरोबर लिहिता येत नाही, वाचता येत नाही. पण परीक्षेत तर लिहावे लागते. माझी पत्नी मराठी भाषेची प्राध्यापक आहे. माझा मुलगा आता इयत्ता दहावीत आहे. आमच्या आजूबाजूचे कोणी इयत्ता बारावीत आहेत. त्याला मराठीचा पेपर अवघड जाणार आहे. सभापती महोदय, बेस्ट ऑफ फाईव्हचा विषय येथे आहे. मला कौतुकाने सांगावेसे वाटते की, ज्या विद्यार्थ्यांना मराठी या विषयात 35 टक्के मार्क्स मिळण्याची शक्यता नव्हती त्या विद्यार्थ्यांना सहा महिने व्यवस्थित मराठी शिकविल्यानंतर आज त्या विद्यार्थ्यांना 70 टक्क्याच्या वर मार्क्स मिळाले आहेत. हा माझ्या घरचा अनुभव आहे. विद्यार्थ्यांना मराठी शिकविले तर ते चांगल्या तऱ्हेने शिकू शकतात आणि मार्क्स मिळवू शकतात हे मी माझ्या घरात अनुभवले आहे. त्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना आपण आपल्या मुलांना मातृभाषेपासून वंचित ठेवले हे नंतर कळले. त्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीची पायरी ओलांडताना मातृभाषा येत नसल्याची अडचण आली. सभापती महोदय, अशा प्रकारे माझ्या पत्नीने पाच-दहा विद्यार्थ्यांना मराठीचे ज्ञान शिकविण्याची मदत केली असेल पण आज हजारो, लाखो विद्यार्थी असे आहेत की, ज्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकविले जाते मग ते बरोबर इयत्ता दहावी आणि बारावीत आल्यानंतर अडकतात. मला वाटते या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील चांगल्या प्रकारे प्रकाश टाकू शकतील. ही फार गंभीर बाब आहे. मराठी आवश्यक आहे. मराठी आलीच पाहिजे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मराठीमध्ये पुढे गेलेच पाहिजे. याबाबतीत श्री. पी.जी.,खेर यांचे धोरण सर्वश्रेष्ठ होते. प्रत्येकाला इयत्ता सातवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण कोणत्याही परिस्थितीमध्ये माझ्या शुब्द मराठी भाषेमध्येच मिळाले पाहिजे असे त्यांचे धोरण होते. इंग्रजी असो वा अन्य भाषा असो ती इयत्ता आठवी पासून शिकविली गेली पाहिजे. शासनाने ते धोरण बदलले. माननीय माजी शिक्षण मंत्री श्री. वसंत पुरके हे इतके उत्साही होते की, काहीही झाले तरी इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शिक्षण सक्तीचे केले जाईल असे धोरण त्यांनी या सभागृहात उभे राहून जेव्हा जाहीर केले तेव्हा मी उठलो आणि त्यांना विचारले की, अहो पुरके साहेब, आपण काय करीत आहात? इंग्रजीचे शिक्षण इयत्ता पाचवी पासून कां इयत्ता पहिलीपासून? तेव्हा ते असे म्हणाले की, "मी इयत्ता पहिलीपर्यंतच थांबणार नाही तर बालवाडीत देखील इंग्रजीचे शिक्षण आणायचे झाले तर मी ते आणीन." ते याबाबतीत अतीच उत्साही होते. माझी चूक होणार नसेल तर मी त्यांना असे सांगणार होतो की, आपण संत वाड़मयाचे प्राध्यापक आहात. पण मी त्यांना इंग्रजीचे आव्हान दिले नाही. इयत्ता आठवी नंतर एबीसीडी शिकलेला मी आज सुध्दा इंग्रजी बोलू शकतो. कदाचित अस्खलीत इंग्रजी बोलतो की नाही मला माहीत नाही पण मी परदेशात गेल्यानंतर मला जमते तेवढी इंग्रजी भाषा बोलून मी माझी सर्व कामे व्यवस्थितपणे पार पाडतो. तेथे इंग्रजीमुळे माझे कधी कुठले काम अडले नाही. आमची जी पिढी येथे बसली आहे ती इयत्ता आठवी नंतरच इंग्रजी शिकलेली आहे. पण ते इंग्रजी भाषेत जगामध्ये पुढे जात आहेत. आमच्या मराठी माणसातील न्यूनगंड काढायचा असेल तर पहिल्यांदा शासकीय धोरणामध्येच ती हिंमत दाखवावी लागेल. या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये या महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थी तो कुठल्याही जातीचा, प्रांताचा, भाषेचा असेल तो पहिल्यांदा मराठीच शिकेल हे धोरण अवलंबिणार की नाही? याकरिता ही आजची चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. 8000 शाळांना मान्यता देताना अनुदान द्यावे लागेल आणि विद्यार्थी मिळणार की नाही ही चिंता माननीय शिक्षण मंत्र्यांना पडत असेल तर ही महाराष्ट्रातील मराठी जनतेकरिता एक चिंतची बाब आहे. म्हणून मी सुरुवातीला म्हणालो की, आता सर्वांनाच आत्मचिंतन करावे लागणार आहे. मराठी विद्यार्थी कमी होतात हे सांगताना आम्हाला लाज वाटायला पाहिजे होती परंतु तशी वाटत नाही. म्हणून या सुवर्ण महोत्सवी वर्षात अशी चिंता करावी लागते.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, या मुंबईमध्ये हिंदी, मराठी आणि उर्दू माध्यमाचे विद्यार्थी बरोबरीने चालत आहेत. या मुंबईला परप्रांतीयांनी किती ग्रासले आहे याचे हे जिवंत आणि मूर्तिमंत उदाहरण आहे. हे सांगत असताना मला असे नमूद करावेसे वाटते की, मुंबईमध्ये सन 2008-09 मध्ये एकूण 1379 शाळा होत्या परंतु गेल्या वर्षी ही संख्या 62 ने कमी होऊन 1327 शाळा राहिल्या. शाळांची संख्या 62 ने कमी झाली. मुंबईमध्ये मराठी विद्यार्थ्यांची संख्या सन 2008-09 मध्ये 4 लाख 58 हजार 414 होती ती संख्या 4 लाख 42 हजार 840 वर आलेली आहे. मराठी विद्यार्थ्यांची संख्या 15 हजार 574 ने कमी झालेली आहे. हे सर्व घडत असताना दुर्दैव असे आहे की, आमच्या शिक्षकांची संख्या कमी होत आहे. सन 2008-09 मध्ये 13 हजार 134 शिक्षक होते. ती संख्या 2009-2010 मध्ये 14 हजार 611 झाली. शिक्षकांची संख्या 1477 ने वाढली परंतु ती संख्या मराठी माध्यमामध्ये न वाढता इतर माध्यमांमध्ये वाढली. मराठी माध्यमाचे शिक्षक घरी बसले आणि दुसऱ्या माध्यमातील शिक्षक वाढले. ही फार चिंताजनक परिस्थिती निर्माण झालेली आहे. मला आवर्जून नमूद करावयाचे आहे की, मराठीचा ध्यास आणि मराठीचा बडगा आपल्याला निर्माण करण्याची गरज आहे. मराठी माणूस जागाच्या पाठीवर कोठेही कमी पडतो असे मानण्याचे कारण नाही. बिहारमध्ये एक संपूर्ण तालुका मराठी लोकांचा आहे. उत्तर प्रदेशमध्ये अर्ध्या तालुक्यात 100 टक्के मराठी लोक राहतात. ते लोक त्या ठिकाणी जातात तेव्हा काय होते ? मी शिक्षणावर प्रस्ताव मांडत असताना सांगू इच्छितो की, या देशामध्ये महाराष्ट्राव्यतिरिक्त तीन राज्यांमध्ये मराठी शाळा आहेत. आंध्र प्रदेशमध्ये कॉलेजेस सुध्दा मराठी आहेत. आंध्र प्रदेशमध्ये पहिली पासून ते उच्च शिक्षणामध्ये एम.ए. आणि एम.एससी. पर्यंतचे शिक्षण मराठीमध्ये देणाऱ्या शाळा आणि कॉलेजेस असतील तर महाराष्ट्र शासन अशा कोणत्या कवचकुंडलामध्ये अडकलेले आहे की, ज्यामुळे इंग्रजीच्या बाहेर पडावेसे वाटत नाही ? महाराष्ट्र शासनामध्ये असे धोरण का निर्माण झाले की, या महाराष्ट्रातील मुले मराठी शिकले नाही तरी चालेल परंतु ते इंग्रजी शिकले पाहिजे म्हणून पहिलीपासून इंग्रजी शिकविणे चालू करतो. माननीय शिवसेनाप्रमुख नेहमी सांगतात की, लोक काय मागतात ते देण्यापेक्षा समाजाला ज्याची गरज आहे ते देण्याची इच्छाशक्ती राजकारण्यांची आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

राजकीय पक्षांची असावी. या दृष्टीकोनातून पाहण्याचे सामर्थ्य श्री. पी.जी.खेर यांच्यामध्ये होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी जगन्मान्य शास्त्रज्ञ श्री. जयंत नारळीकर यांचा उल्लेख केला. ज्ञानाच्या बाबतीत त्यांच्यामध्ये कोणतीही कमतरता नाही. ते शास्त्रज्ञ आहेत. त्या मराठी कुटुंबात त्यांचे वडील बनारस हिंदू विद्यापीठामध्ये प्राध्यापक असल्यामुळे त्यांचे पूर्ण आयुष्य त्या ठिकाणी गेले. श्री. जयंत नारळीकर यांनी पी.एच.डी. सुध्दा हिंदीमध्ये केली. काल सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी उल्लेख केला. त्यांचे कोठेही काही अडले नाही. त्यांचे पूर्ण शिक्षण हिंदीमध्ये झाले. ते हिंदीमध्ये शिकले म्हणून जगामध्ये त्यांचे काही अडले नाही. इंग्रजी येत असेल तरच जयंत नारळीकर निर्माण होईल, नाही तर होणार नाही अशी न्यूनगंडाची भूमिका शासनाच्या धोरणातून निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे घात होतो. मुंबईमध्ये परप्रांतीयांमुळे निर्माण झालेली परिस्थिती या ठिकाणी मांडत असताना मी सांगू इच्छितो की, परप्रांतीय आल्यामुळे आमचे लोक मुंबईच्या बाहेर ढकलले गेले. आमचे मराठी विद्यार्थी आहेत, मराठी कुटुंबे आहेत पण ते इथून बाहेर गेले. अनेक परिस्थितीमुळे त्यांना इथून परागंदा व्हावे लागले. बनारस हिंदू विद्यापीठामध्ये हिंदीतून पी.एच.डी. हा विषय आहे.

सभापती महोदय, मध्य प्रदेश सरकारची हिंदी भाषेबद्दलची इच्छाशक्ती किती आहे ? मध्य प्रदेशमध्ये विज्ञानातील फिजिक्स, केमिस्ट्री, गणित इत्यादी सर्व विषयांपासून वैद्यकीय शिक्षणापर्यंत सर्व शिक्षण शुद्ध हिंदीमध्ये दिले जाते.

यानंतर श्री. अजित शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याठिकाणी हिंदी भाषेत शिक्षण घेतलेला डॉक्टर तेथे डॉक्टरकीचा व्यवसाय करतो. त्याला इंग्रजीच्या भाषेच्या ज्ञानाची आवश्यकता भासली नाही. हे 21 व्या शतकातील उघड सत्य आहे. मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये व्यवस्थापकीय क्षेत्रातील म्हणजे बिझनेस मॅनेजमेन्टची कॉलेजेस पूर्ण हिंदी भाषेत आहेत. त्यांच्या स्वत:च्या भाषेत आहेत. आपल्या बाजूच्या गुजरात राज्यात सुध्दा अभियांत्रिकी कॉलेज आणि वैद्यकीय कॉलेजेसमध्ये 100 टक्के गुजराथी भाषेतून शिकविले जाते. गुजराथी भाषेत डॉक्टर झालेल्या व्यक्तीस रोग्याची नाडी बघून रोग ओळखता येत नाही असे कधी झालेले नाही. गुजराथी भाषेत शिकलेल्या डॉक्टरला त्याच्या अत्युच्च क्षेत्रात जाता येत नाही असे झालेले नाही. आजच्या युगातही तो आपल्या मातृभाषेत क्षेत्र पादाक्रांत करतो. मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश राज्यात जवळपास 300 ते 350 हिंदी भाषेतून पदवी घेतलेले इंजिनिअर्सस पुणे - खडकी येथील लष्करी संशोधन विभागात काम करीत आहेत. हिंदीतून शिक्षण घेतलेले 300 उच्च शिक्षित विद्यार्थी हे कॅन्टोन्मेंट येथे नोकरी करीत आहेत. स्वत:च्या मातृभाषेतून सर्वोच्च शिक्षण घेतलेले, इंग्रजीचा संबंध नसलेले विद्यार्थी पुण्यात येऊन आपले पोट भरत आहेत. इंग्रजीत इंजिनिअरींग केलेल्या विद्यार्थ्यांएवढा पगार घेत आहेत. इंजिनिअर्रींगंचे शिक्षण त्यांनी मातृभाषेतून घेतले असल्यामुळे कदाचित ते त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे आहेत. आंतरराष्ट्रीय सिध्दांत आहे.. मी काही शिक्षण तज्ज्ञ नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे जास्त भाष्य करतील कारण ते त्या क्षेत्रातील आहेत.

मातृभाषेतून जो शिक्षण घेतो जो जास्त प्रगती करतो. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे त्याची समज वाढते असा सिध्दांत आहे. या देशात भाषावार प्रांत राज्य झाल्यानंतर प्रत्येक राज्याने आपली भाषा जपली आहे. तामिळनाडू राज्यात 100 टक्के त्यांची भाषा बोलली जाते. तसे ते इंग्रजीचे भोक्ते आहेत. केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू राज्यांमध्ये स्थानिक भाषांमध्ये आणि इंग्रजी भाषेत उच्च शिक्षण दिले जाते. ते हिंदी भाषेला मानत नाहीत. सर्वधर्मसमभाव वगैरे माहीत नाही. त्यांच्यापुढे दिल्ली नतमस्तक होते. त्यांना कोणी सुनवत नाही. सर्व डोस आम्हाला पाजले जातात. मराठी माणसाला पाजतात. मराठी माणूस लढायला लागला तर मरेपर्यंत लढतो नाहीतर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

गुलामासारखा वागतो हे आमच्या स्वभावाचे दुर्दैव आहे. तेव्हा ही सर्व परिस्थिती असताना आम्ही मात्र अट्टाहास धरुन मराठी शाळेला मान्यता देणार नाही, मराठी शाळेच्या तुकड्या कमी करु. वर्गात 25 विद्यार्थी पाहिजेत, कमी असतील तर मान्यता रद्द करु असे धोरण स्वीकारीत आहोत. मुंबईमध्ये तेल्गु शाळा आहेत. त्याठिकाणी पुरेसे विद्यार्थी नाहीत. परंतु शिक्षक तेवढे ठेवून तुकड्या सुरु ठेवल्या आहेत. त्यांना पगार दिला जातो. भाषिक प्रांत रचना केल्यानंतर इतर प्रांताचा घटनेप्रमाणे सन्मान ठेवून त्यांना महापालिकेने "राईट टू एज्युकेशन" दिले आहे. या देशातील गोरगरिबांना शिक्षण मिळत नाही असे केंद्र सरकारला 60 वर्षानंतर वाटले. म्हणून त्यांनी काल राईट टू एज्युकेशनची घोषणा केली. ते घटनेने सुरुवाती पासून दिलेले आहे. या देशात जन्माला आलेल्या प्रत्येकाला शिक्षण हे अनिवार्य आहे. आता ते कंम्पलसरी केले. त्यामुळे आता घोषणा होतील. करोडो रुपये येतील, मग ते लुटता येतील, लुटलेल्या पैशातून चांगले राजकारणी निर्माण होतील.

गोरगरिबांच्या आश्रमशाळा हा विषय येथे मी मांडणार नाही. आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना आम्ही या चर्चेला जोडून घेतली. त्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाच्या धोरणाची गाथा दिलेली आहे. निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे की,

यानंतर श्री.खंदारे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जिल्हा व राज्य समिती यापैकी एका समितीची शिफारस असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना सन 2009-10 पासून इयत्ता पाहिलीच्या वर्गास कायम विना अनुदानित तत्वावर भविष्यात बदल करता येणार नाही या अटीवर इंग्रजीची शाळा सुरु करण्याचे मान्य केले आहे. मराठी शाळा नाही. विना अनुदानित शाळा हया तुमच्या जीवावर चालवाव्यात. मराठी माध्यमाच्या शाळा चालवाव्या. इंग्रजी शाळेकरिता येथे सोस लागलेला आहे. इंग्रजीचे माध्यम मात्र कधीही बदलता येणार नाही. उद्या त्यांना असे वाटले की, इंग्रजीसाठी विद्यार्थी मिळत नाही तरी माध्यम बदलता येणार नाही, शाळा बंद करा. या शासनाने मराठी पायदळी तुडवून 20-25 विद्यार्थी असले तरी इंग्रजीचा सोस लागला असल्यामुळे ही अट घातली आहे. मुंबईत विद्यार्थ्यांची ही शोकांतिका सांभाळण्याकरिता गरिबातील गरीब माणसांना झेपत नाही तेव्हा ते आपल्या मुलांना महापालिकेच्या शाळेत पाठवितात. ग्रामीण भागात जिल्हा परिषदेत पाठवितात. खाजगी शाळेमध्ये पाठविणारे पालक वेगळेच आहेत. एका बाजूला विषमता असल्यामुळे शासन त्या व्यवस्थेबाबत काही करु शकत नाही. काही करावयाचे असेल तर विद्रोही परिस्थितीने समोर उभे रहावे लागेल. नक्षलवाद हा नको त्या भागाला झुकला आहे. त्यामध्ये कम्युनिस्ट आहेत. हा विषय झालेला आहे. विद्रोही परिस्थितीला सामोरे जायचे असते तेव्हा ती दडपून टाकण्यासाठी हातामध्ये काही तरी घ्यावे लागते. ज्यांच्या घरी पालक नोकरीला जातात त्यांच्या घरातील मुलगा हा सकाळी निघतो व संध्याकाळी घरी येतो. शाळेमध्येच जेवणाची व्यवस्था असते, ए.सी.शाळा आहे. त्याची व्यवस्था उच्च दर्जाची आहे. पंचतारांकित व्यवस्था असलेला मुलगा त्याच्या घरात काम करणारा नोकर बघतो, त्याचा मुलगा मात्र महापालिकेच्या शाळेत जात असतो. तो विचार करतो, एकाच वयाची मुले असतात, त्यांना शिकण्याचा अधिकार तेवढाच आहे. पण संपत्तीचा एवढा सोस आहे. कायदा सगळयांना समान असे म्हणतो ना, त्यावेळी शिक्षण समान पातळीवर आले पाहिजे. मुळात शासनाला हे झेपत नसल्यामुळे, तिजोरीवर भार येत असल्यामुळे, शिक्षणाचा अवाढव्य खर्च होत असल्यामुळे आपल्याला जेवढे झेपेल तेवढया अनुदानित शाळा निर्माण केल्या, तुम्ही शिकवा, आम्ही तुम्हाला अनुदान देतो. म्हणजे इन्फ्रास्ट्रक्चर त्यांचे होते, बाकी सर्व ते उभे करतात. पण तेथे जी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते....

लूट होते ती इतकी भयानकपणे होते त्यावर मी येथे बोलणार नाही.

शिक्षकाच्या पगारासाठी झगडत असताना, नोकरीवर लागणारा शिक्षक आपली वडिलोपार्जित जमीन विकून 4-5 लाख रुपये असेच त्या शिक्षण संस्थेला देतो आणि 2-3 वर्षे पगार न घेता काम करतो. हे मी ग्रामीण भागामध्ये बघतो त्यावेळी कोणाची कीव करावयाची आणि कोण मस्तवाल आहे हे शोधावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. त्यांच्याकरिता नेहमी झगडत असतो, हे कसले शिक्षण देणार असा प्रश्न आहे. निशाणी डावा अंगठा या चित्रपटातील बुलडाणा जिल्हा परिषदेचे शिक्षक श्री.इंगोले यांनी शिक्षण क्षेत्राचे वाभाडे काढून सत्य सांगितलेले आहे. हे तर मी स्वत: सगळीकडेच पाहतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे कसे दुरापास्त होते, शिक्षकांची ठेवण कशी आहे, शिक्षकांची कुवत कशी आहे, हे सर्व त्यांनी सांगितले आहे. शिक्षणापेक्षा शिक्षकात राजकारण कसे गुंतले आहेत हे त्यात पहावयास मिळते. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे विद्यार्थी येत असताना जगाला तोंड देणारे विद्यार्थी निर्माण होणार नाहीत काय ही शंका मातृभाषेतील शिक्षणाबद्दल घेणे म्हणजे बाजूला असलेला मध्य प्रदेश, गुजराथ, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश येथे त्यांच्या त्यांच्या भाषेमध्ये शिकून डॉक्टर व इंजिनिअर होत असतील आणि त्यांनाही इंग्रजी माध्यमातून शिकलेले इंजिनिअर म्हटले जात असेल तर मग मराठी भाषेला शिक्षण पध्दतीमध्ये दुय्यम स्थान का मिळते ते कळत नाही. म्हणून मराठी माध्यमातील शाळा काढणा-यांना मान्यता,केवळ उद्या अनुदान द्यावे लागेल या भीतीपोटी परवानगी नाकारणार असू हे बरोबर नाही. विना अनुदानित किंवा अनुदानित हा माझा विषय नाही. त्यासाठी शिक्षक मतदार संघातील सदस्य येथे आहेत. त्यांचा आम्ही आदर करतो, ते विषय मांडतात. आम्ही त्यांना प्रतिबंधही केलेला नाही. मतदार संघ सुध्दा त्यांना सांभाळायचे असतात. कोणत्याही परिस्थितीमध्ये महाराष्ट्रात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी आलेच पाहिजे आणि ते उच्च दर्जाचे आले पाहिजे.

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. दिवाकर रावते...

मला अजून हे कळलेले नाही की, मराठी माध्यमातून शिकणारा 8वी तील मुलगा आणि इंग्रजी माध्यमातून शिकणारा 8वी तील मुलगा असेल तर मरठी माध्यमातून शिकणा-या 8वीतील मुलाला कठीणातील कठीण प्रश्न घालायचे आणि इंग्रजी माध्यमातून शिकणारा विद्यार्थी कसा पास होईल या दृष्टीने साध्यातले साधे प्रश्न टाकायचे.. कारण तू बाबा पास हो आणि पुढे जा. हे का ? तर तू आमच्या इंग्रजांच्या इंग्रजी शाळेमध्ये जातोस, त्यामुळे तू फार मोठा आहेत. तू टाय बांधतोस आणि आमचं फाटकं शर्ट घातलेलं मराठी माध्यमाच्या शाळेत जाणारं पॅण्ट न धुतलेलं पोरगं त्याला आपलं काय मराठी येतय ते शिकव. ही आजच्या शिकणाच्या धोरणातील परिस्थिती आहे असे मला वाटते. मी चुकत असेन तर माझ्यात सुधारणा केली तर मला आनंद होईल. पण ही परिस्थिती 100 टक्के आहे. या महाराष्ट्रामध्ये शिकणा-या प्रत्येक विद्यार्थ्याला किमान मराठीचे शिक्षण हे समान पातळीवरच असले पाहिजे. हे सोपे आणि ते कठीण, हे कशासाठी ? आता तुमच्या जो बेस्ट ऑफ फाईव्हचा फॉर्म्युला आहे त्यामध्येही तेच आहे. या महाराष्ट्रामध्ये सीबीएसई, आयसीएसई या शाळा काढा पण शिक्षणाचे तंत्र एकच ठेवा. आम्ही आमच्या मर्जीचे शिक्षण देऊ, आम्ही आमच्या मर्जीचे. कसली मर्जी ? 11वीचा प्रवेश,12वीचा प्रवेश आणि त्यानंतरचे प्रवेश हे समपातळीवर येत नाही. त्यामुळे कोर्टकचे-यापर्यन्त हे युध्द चालू आहे. गरिबांचा मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणारी ही शिक्षण पध्दती तुम्ही थांबविणार आहात की नाही हा प्रश्न यातून निर्माण होत आहे. ही शिक्षण पध्दती थांबवायची असेल तर किमान या महाराष्ट्राच्या राज्यभाषेचा सन्मान ठेवणारा, 1ली पासून 12वी पर्यन्त तू कोणत्याही शाळेत जा, फाईव्ह स्टार शाळेत जा, एअर कंडिशन वर्गान बस, सकाळ संध्याकाळचा नाश्ता शाळेत घे, इकडे एकवेळचा भुकेलेला आमचा गरीब विद्यार्थी महापालिकेच्या शाळेत शिको किंवा जिल्हा परिषदेच्या शाळेत शिको, मराठीचे शिक्षण हे 1ली ते 12वी पर्यन्त सर्व पातळीवर एक असले पाहिजे. मराठी शिकत असताना मराठी विषयामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता एकाच पातळीवर शिक्षण मिळाले पाहिजे. मग तुमच्या लक्षात येईल की इंग्रजीचा सोस धरणारे शेवटी मातृभाषेकडे वळतील. दुय्यम भाषा इंग्रजी ठेवतील. त्यांच्या लक्षात येईल की, आपले आई-बाबा सुरुवातीपासून मराठीमध्ये शिकलेले असताना सुध्दा ते चांगले इंग्रजी बोलून पुढे जातात, ते जगामध्ये कुठे अडत नाहीत, त्यामुळे आपणही कुठे अडणार नाही, अशा प्रकारचा आत्मविश्वास मुलांमध्ये निर्माण करता येईल. आमुलाग्र शिक्षण पध्दतीमध्ये मराठी भाषेचा सन्मान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

ठेवून मराठी भाषेच्या शाळा कशा प्रगत होतील अशा प्रकारची धोरणात्मक व्यवस्था करावी लागेल. तुम्ही आम्हाला मुले दिलीत तर आम्ही शाळा चालवू, शाळा ओस पडत आहेत, वर्गात मुले कमी पडत आहेत, म्हणून वर्ग कमी करावे लागत आहेत, इतके आपण हतबल होत असताना तुम्ही विनाअनुदानित इंग्रजी शाळा घ्या, अशा प्रकारचे कायदे करीत आहात. इंग्रजी शाळांचे पेव पुटण्याचे हे एक कारण आहे. इंग्रजी शाळांच्या मान्यतेचे आदेश काढता आणि सांगता की फक्त माध्यम बदलता येणार नाही. म्हणजे भविष्यामध्ये पुढच्या पिढीला इंग्रजीच शिकवा अशी तंबी देऊन तुम्ही शाळेला मान्यता देत आहात. लक्षवेधीच्या उत्तरात शासनाचे हेच धोरण नमूद केलेले आहे. या प्रस्तावाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय काय उत्तर देतील हे मला माहीत नाही. ते उत्तर देतीलच. परंतु ठोस आणि या मराठी भाषेचा सन्मान करणारे मराठी शाळेला भविष्यामध्ये भवितव्य निर्माण करणारे आणि आपल्या या महाराष्ट्रामध्ये कोणाला राहायचे असेल आणि शिक्षण घ्यायचे असेल तर माझ्या मुलाला शंभर टक्के मराठी शिकता आलेच पाहिजे, मराठी शिकले गेलेच पाहिजे त्या शिवाय या महाराष्ट्रामध्ये पर्याय नाही अशा प्रकारची शिक्षण पध्दती तुम्ही निर्माण करणार काय ? आणि ती समपातळीवरची निर्माण करणार काय असा प्रश्न उपस्थित करुन सभापती महोदय आपण मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो, जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 101 अन्वये विचारण्यात आलेली लक्षवेधी सूचना आणि नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेली अल्पकालीन चर्चा एकत्र गठित करुन आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या प्रश्नाची एक बाजू सांगितली. मी दुस-या बाजूने या प्रश्नाकडे बघणार आहे. 1 मे 2008 ते 20 मे 2008 या 20 दिवसाच्या कालावधीमध्ये राज्य शासनाने नवीन प्राथमिक, माध्यमिक शाळांसाठी प्रस्ताव मागितले होते. सबंध महाराष्ट्रातून आलेल्या या प्रस्तावांची संख्या सुमारे 25 हजाराच्या घरामध्ये होती. याकडे दोन्ही अर्थाने पाहिले पाहिजे. ज्यांच्याकडून 25 हजार प्रस्ताव प्राप्त झाले होते ती मंडळी कर्मवीर भाऊराव पाटलांच्या पावलावर पाऊल ठेवून शाळा चालवायला निघालेली आहेत काय ?

(सभापतीस्थनी तालिकासभापती श्री. रमेश शेंडगे)

==नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

ही मंडळी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या विचाराने निघालेली आहेत? विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचाराने निघालेली आहेत? एवढ्या मोठया प्रमाणात प्रस्ताव का मागविले? दुसरा मुद्दा म्हणजे बहुतेक सगळे प्रस्ताव इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे होते. तिसरा मुद्दा म्हणजे हे प्रस्ताव सादर करणाऱ्यांचे चारित्र्य तपासले का? ज्यांचे प्रस्ताव दाखल झाले त्यातील बहुसंख्य मंडळी व्यापारी आहेत. शाळा चालवायला निघाले आहेत त्यात बहुतेक मटका किंग आहेत, गुटखा किंग आहेत आणि काही झटका किंग आहेत. मी झटका किंग हा शब्द वापरला तो कदाचित सभागृहाला नवीन आहे. झटका किंग याचा अर्थ गुन्हेगारी क्षेत्रात ऊंची गाठलेली मंडळी शिक्षणाच्या क्षेत्रात वावरत आहेत. ही मंडळी शाळा काढायला निघाली आहेत. व्हाईट कॉलर बिझिनेस म्हणून पुढे आली आहेत. या सगळ्या शाळांच्या प्रस्तावांना गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीची झालर होती. त्यावेळी शालेय शिक्षणमंत्री श्री.विखे-पाटील होते. आम्ही अनेकदा त्यांना निवेदने दिली. आमचे म्हणणे त्यांच्यासमोर मांडले होते. आमची पहिली मागणी अशी होती की, इतक्या मोठया संख्येने प्रस्ताव दाखल झाले या प्रस्तावांना ताबडतोब मान्यता देण्याची कोणतीही घाई तुम्ही करु नका. दुसरी मागणी अशी होती की, बृहत आराखडा तयार केला पाहिजे. डेव्हलपमेंट प्लॅन तयार करा. तो डेव्हलमेंट प्लॅन तयार करीत असताना तो केवळ मराठी माध्यमांच्या शाळांसाठीच नव्हे तर इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी, सीबीएसई पॅटर्नसाठी तयार करा. सैनिकी शाळांसाठी पॅटर्न तयार करा. इंटरनॅशनल स्कूल ज्यांना आंतरराष्ट्रीय शाळा म्हटले जाते त्यांच्यासाठी तयार करा. मुंबईमध्ये सुमारे 25 इंटरनॅशनल स्कूल आहेत. पुण्यामध्ये 18 इंटरनॅशनल स्कूल आहेत. माझ्या कोल्हापूरमध्ये 3 आल्या आहेत. सोलापूरमध्ये आल्या आहेत. इंटरनॅशनल स्कूलचा हा मोठा विषय पुढे आला आहे. सर्व प्रकारच्या शाळा महाराष्ट्रात येत आहेत. महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळांची संख्या घटत आहे. मराठी माध्यमांच्या शाळांचा रेट ऑफ डेथ म्हणजे मृत्यूदर याबाबत मी धक्कादायक स्टेटमेंट करतो. महाराष्ट्रात दरवर्षी मराठी माध्यमांच्या सरासरी सुमारे 100 प्राथमिक शाळा बंद पडत आहेत. मराठी माध्यमाच्या सरासरी 50 माध्यमिक शाळा दरवर्षी बंद पडत आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण वाढत आहे. त्याचबरोबर मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी संख्या घटत आहे. शासनाला एका दगडात दोन पक्षी मारायचे आहेत असे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे.....

आमच्या लक्षात आले आहे. एका बाजूने सरकारला तिजोरीवरच्या खर्चाचा बोजा कमी करायचा आहे. दुसऱ्या बाजूने शिक्षणाच्या क्षेत्रात भांडवलदारी अर्थव्यवस्था प्रस्थापित करावयाची आहे. या क्षेत्रात अर्थपायाधिष्ठित शिक्षण व्यवस्था सरकारला प्रस्थापित करावयाची आहे. 'करा फी गोळा आणि चालवा तुमच्या शाळा' अशा प्रकारचा संदेश सरकार देत आहे. किती फी गोळा केली जात आहे? मला याप्रसंगी स्व.यशवंतराव चव्हाणांची आठवण येते. या महाराष्ट्रात बालवाडीपासून पीएचडीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. आजही काही अंशी ही व्यवस्था आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये अकृषिक विद्यापीठे निघाली, महाविद्यालये निघाली. माध्यमिक शाळा काढल्या गेल्या. प्राथमिक शाळांचे जाळे पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात, म्हणजे 1952 ते 1962 या काळात प्रचंड वेगाने हे जाळे महाराष्ट्रात उभे राहिले. त्याच महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांचा वारसा मिरविणारी मंडळी त्यांच्या बगलबच्च्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढायला परवानगी देऊन जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या मराठी माध्यमांच्या शाळा बंद पाडल्या जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांख्यिकी माहिती सादर केली. मी एवढेच सांगेन की, केव्हा तरी मुंबईत फेरफटका मारला जावा. मुंबईतील 50 टक्के मराठी प्राथमिक शाळांना कुलूप लागले आहे. तेच पुणे महापालिकेच्या बाबतीत घडत आहे. ही बाब सार्वत्रिक होऊ पहात आहे. त्याठिकाणी मुले नाहीत म्हणून मराठी माध्यमाच्या शाळा बंद असल्याचे चित्र पहावयास मिळते. नक्की काय अभिप्रेत आहे? मराठी माध्यमाच्या शाळांचे उच्चाटन केले जात आहे. नक्की सरकारला काय करावयाचे आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. दुसऱ्या एका गोष्टीकडे मला सरकारचे लक्ष वेधावयाचे आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस स्वत:चा घाम गाळून मिळणाऱ्या उत्पन्नातील 30 टक्के महसूल सरकारच्या तिजोरीत प्रत्यक्ष कर रुपाने भरतो. कारण आपण कल्याणकारी राज्याची कल्पना मान्य केली आहे. म्हणून तो कर भरतो.

(नंतर 3डी.1....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

आणि त्यानुसार ज्या संकल्पना अभिप्रेत आहे त्यातील दोन संकल्पनांचाच मी उल्लेख करणार आहे. म्हणजेच त्यात असे म्हटले आहे की, आरोग्याची सुविधा आम्ही देऊ आणि तुझ्या मुलाला शिक्षण मोफत देऊ. त्यामध्ये सुध्दा डोळ्यात धूळ फेकली जात आहे. राईट फॉर एज्युकेशन प्रमाणे ज्यावेळेस 0 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देण्याची संकल्पना आहे त्यात मात्र 0 ते 6 वयोगटातील मुलांच्या शिक्षणाकडे पूर्ण दुर्लक्ष होते. केंद्रसरकार असो अथवा राज्य सरकार असो दोन्हीकडून ही शिक्षणाची जबाबदारी झटकली जाते. पूर्व प्राथमिक शिक्षण मोफत मिळावे, राईट फॉर एज्युकेशननुसार या शिक्षणाचा हक्क असे म्हटले आणि 14 वर्षापर्यंत ते शिक्षण असेल तर 0 ते 14 वयोगटामध्ये ते निघून जात आहे. याचा अर्थ पूर्व प्राथमिक शिक्षण तुमच्या खिशातून घ्या आणि माध्यमिक शिक्षण मोफत देण्याला आम्ही तयार आहे, याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. त्याचप्रमाणे सरकारने या सर्वांना मोफत शिक्षण देण्याची संकल्पना आहे. कारण या राज्यात तसेच देशात 30 टक्के महसूल प्रत्येक माणूस भरत असतो तरी देखील त्याच्या मुलांचे मोफत शिक्षण हिरावून घेतले जात आहे. मराठी माध्यमाचे शिक्षण हिरावून घेतले जाते. कारण आजच्या परिस्थितीत राज्यातील मराठी शाळा दिवसेदिवस बंद पडत आहेत. मराठी भाषेचा दिवसेदिवस ऱ्हास होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अतिशय विश्लेषणात्मक सांगितले की, जगातील कोणत्याही शिक्षण तज्ज्ञांना म्हणजे Ability to think मातृभाषेतूनच चांगले शिक्षण मिळू शकते. विचार करण्याची प्रक्रिया ही मातृभाषेतूनच चांगली होऊ शकते. मातृभाषा शिकल्यानंतर दोन-दोन, पाच-पाच अथवा दहा-पंधरा भाषा शिकण्याची मानसिक क्षमता असणारी माणसे या राज्यात आहेत. मूळ भाषा म्हणून मातृभाषाच अवसली पाहिजे आणि तीच मातृभाषा बंद करण्याचे काम ही यंत्रणा काम करीत आहे. आपले ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, पॉलिटिकल लिडर हे सुध्दा तेच काम करीत आहे. म्हणून हे तुम्हाला-आम्हाला परवडणारे नाही. म्हणून अत्यंत नम्रपणे मी सांगू इच्छितो की, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्यांची संख्या प्रचंड असली तरी त्याहीपेक्षा खाजगीकरण, जागतिकीकरण, कंत्राटीकरण यांच्या माध्यमातून राज्यात भांडवलदारी अर्थव्यवस्था प्रचंड वेगाने अवतरते आहे. खेड्यातील एक-दोन एकर जमीन असलेला किंवा छोटासा शेतकरी अथवा उद्योग करणारा माणूस आज पूर्णपणे विस्थापित होत आहे. दारिद्र्यरेषेखाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

फेकला जात आहे. तो स्वत:च्या जीवाने जगू शकत नाही कारण त्याच्या मुलांचे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षण सुध्दा हिरावून घेतले जात आहे. या सभागृहात अनेक गोष्टींचा उल्लेख करीन की डॉ. विजय भटकर, ज्यांनी परम संगणक निर्माण केला ते सुध्दा विदर्भातील छोट्याशा गावात देवळात भरणाऱ्या जिल्हा परिषदेत शिकूनच मोठे झालेले आहेत. ते ज्ञान देखील आमच्या मराठी शाळेतून विकसित झालेले आहे. त्याच मराठी भाषेवरील प्रेत आता कमी होत आहे. मातृभाषा चांगली शिकल्यामुळे इंग्रजी शिकता येत नाही असे म्हणणाऱ्या विद्वानांची बौध्दिक दिवाळखोरीच त्यातून पुढे येते. कुठल्याही विद्यापीठाचा कुलगुरु असो अथवा कोणताही मोठा असो तो जर असे म्हणत असेल तर तो चुकीचे विधान करतो असेच माझे मत आहे. सेकंड लँग्वेज म्हणून इंग्रजी ठीक आहे, परंतु फर्स्ट लँग्वेज म्हणजे इंग्रजी शिकण्याची गरज नाही असे माझे मत आहे. म्हणून या निमित्ताने मी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्याकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आपण 20 जुलै, 2009 रोजी जो शासन निर्णय घेतला त्यानुसार "कायम" हा शब्द जो वापरला होता तो काढला व हा विषय जवळपास पूर्ण होत आला. परंतु शाळांना "कायम" हा शब्द काढल्यासंबंधीचे पत्र देखील आपण देऊ शकला नाहीत. की आपल्या शाळेच्या मान्यतेतील "कायम" हा शब्द शासनाने काढलेला आहे. राज्यात जितक्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहे त्यांना एक साधे पत्र सुध्दा हे शासन देऊ शकले नाही. असे पत्र दिले असते तर या शाळांमधील मुलांना शालेय पोषण आहार, मोफत पुस्तके, ईबीसीची सवलत तसेच शिष्यवृत्ती या सवलती प्राप्त झाल्या असत्या. या सर्व शाळांचा अभ्यास केला तर खेड्यापाड्यातील गरीब मुलेच त्यात शिकत आहेत. श्रीमंत व धनिकांची, ग्रीन बेल्ट ज्याला म्हणतो त्यांची मुले यात शिकत नाही. अशा शाळांची संख्या अत्यंत कमी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

या सगळया शाळांना त्यांच्या शाळेचा "कायम" शब्द काढून घेतल्याचे पत्र तातडीने पाठवावे अशी विनंती करतो.

सन्माननीय विखे-पाटील यांच्या काळामध्ये 2500 प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना मान्यता मिळालेली आहे. यातील फार थोडया शाळा गेल्या वर्षीच्या जून, 2009 मध्ये सुरु झालेल्या आहेत परंतु येत्या जूनमध्ये राहिलेल्या सर्व शाळा सुरु होणार आहेत. आपल्या महाराष्ट्रातील आजची स्थिती अशी आहे की, एक इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु झाली की, एक मराठी माध्यमाची शाळा बंद पडते. सरकारला एका दगडात दोन पक्षी पाडायचे आहेत. सरकारला तिजोरीवरील खर्च कमी करावयाचा आहे आणि दुस-या बाजूने "करा फी गोळा आणि चालवा तुमच्या शाळा" म्हणून इंग्रजी माध्यमांच्या शाळा जन्माला घालण्याचे काम शासनाकडून केले जात आहे.

इंग्रजी शाळांच्या संदर्भात मी नम्रपणाने परंतु तितक्याच प्रभावीपणे सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. महाराष्ट्रात आता चार प्रकारच्या शाळा तयार झालेल्या आहेत. पहिल्या शाळेचे नाव आहे आंतरराष्ट्रीय शाळा. या शाळा अब्जाधीशांच्या आहेत. या शाळेची वर्षाला 5 ते 10 लक्ष फी असते. दुस-या शाळा पब्लीक स्कूलच्या, कॉनव्हेंट स्कूल नावाने तयार झालेल्या आहेत. त्यांची वर्षाची फी लाख दीड लाख रुपये आहे. तिसरी शाळा इंग्रजी माध्यमाची आहे. या शाळेंची नावे सुध्दा फार छान छान आहेत. चाणक्य अॅकडमी, ज्ञानेश्वर अॅकडमी, एकलव्य अॅकडमी, आपल्या तालुक्याच्या आमदाराचे नाव सुध्दा दिले जाते. उद्या बाळासाहेबांच्या नावाने सुध्दा "बाळासाहेब अॅकडमी" नावाने शाळा सुरु होतील. या सर्व शाळा तुमच्या आमच्या कार्यकर्त्यांनी सुरु केलेल्या आहेत. गावातील लोक मुंबईला येतात, तुमच्या माझ्याजवळ बसतात, शाळेची मान्यता घेतात परंतु मुंबईहून जातांना डबा घेऊन जातात. डबा म्हणजे जुनी चार चाकी टुरिस्ट गाडी. आईला मम्मी, वडीलांना डॅडी, गळयात टाय, पायात बूट, स्कूलबस मधून निघते त्या पोराची वरात आणि अनुदानित शाळेतील मास्तर घरात. यामुळे मराठी माध्यमाची आता तुकडी बंद पडत आहे. सरकार कोणत्या पध्दतीने शाळा चालवते ते काही समजत नाही. सरकारने घेतलेल्या धोरणांचे दुष्परिणाम काय होतात हे बघण्यासाठी सेन्सेटीव्ह, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲबेलिटी असलेले अधिकारी दुर्दैवाने आमच्याकडे नाहीत. शिक्षण अधिकारी आता मनी मेकींगच्या कामाला लागले आहे. आमच्याकडे बी.ए.बी.एड. झालेला शिक्षक केव्हातरी एमपीएससी होतो, क्लास वन होतो, क्लास टू होतो आणि जिल्हयाचा शिक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

अधिकारी होतो. त्याच्या संपत्तीची चौकशी केली तर आपल्याला दिसून येईल की, एका एका अधिका-याची 100-100 एकर जमीन झालेली आहे. म्हणजे आंधळयाची वरात बहि-याच्या घरात असा हा प्रकार आहे. अधिका-यांना शिक्षकाबंद्दल, शाळेबद्दल, शिक्षणाबद्दल यत्कींचीतही प्रेम राहिलेले नाही. 70 हजार पगार घेणारा अधिकारी फक्त खुर्चीत बसण्यासाठी पगार घेतो आणि त्याच्याकडे येणा-या माणसाला कापणे हा माझा धर्म आहे असे तो आता मानतो आहे तीच खरी या महाराष्ट्राची शोकांतिका आहे. त्या अधिका-याकडे कोणी लक्ष देण्याच्या मन:स्थितीत नाही. It is a basic political will power which we lack. आमच्याकडे तशा प्रकारची इच्छाशक्ती देखील राहिलेली नाही, त्यामुळे यासंदर्भात मला तीव्र शब्दात या ठिकाणी नोंद करावी लागत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

ज्या तिस-या प्रकारच्या शाळा आहेत त्या इंग्रजी मेडियमच्या शाळा आता खेडया पाडयात गेलेल्या आहेत. महाराष्ट्रातील असे एकही खेडे नाही की, त्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची शाळा नाही. या इंग्रजी माध्यमाच्या शाळा खेडया पाडयात स्कुलबस घेऊन गेलेल्या आहेत. त्या कर्मवीर भाऊराव अण्णांचे विचार खेडयात घेऊन गेलेल्या नाहीत तर शाळा चालवून मनी मेकींग करीत आहेत. इंग्रजी माध्यमासाठी सरकारची सर्व धोरणे अनुकुल आहेत. एनसीटीसीने भोपाळमध्ये दुकानच खोलले आहे. त्यांच्याकडे येईल त्याला बी.एड. कॉलेज, येईल त्याला डी.एड. कॉलेज देत सुटलेले आहेत. त्या ठिकाणी जे अधिकारी आहेत ते हिन्दुस्तानात जन्माला आलेले आहेत काय? कशा रितीने ते विचार करतात, कशा रितीने धोरणे ठरवितात याचा आपण कधी विचार करणार आहोत की, नाही. महाराष्ट्रात किती डी.एड.कॉलेज असावीत, किती बी.एड.कॉलेज असावीत याचा आपण विचार करणार आहात की, नाही ? या ठिकाणी प्रवेश घेणारी जी मुले आहेत त्यांच्या आईवडीलांना वाटते की, आपल्या मुलाला चांगली नोकरी मिळावी म्हणून ते त्या ठिकाणी प्रवेश घेतात. त्याचे आई वडील आपल्याकडे असलेली जमीन गहाण ठेवून आपल्या मुलाला प्रवेश देत आहेत. बी.एड.ला प्रवेश पाहिजे असेल तर त्यासाठी 50 हजार ते 1 लक्ष रुपये मोजावे लागतात. त्या ठिकाणावरुन शिक्षण घेतल्यानंतर त्या मुलांना कोठेही नोकरी मिळत नाही म्हणून ज्या खेडयापाडयात तथाकथित अॅकडमी नावाच्या शाळा उघडलेल्या आहेत त्याच ठिकाणी ते 1000-2000 रुपयांमध्ये काम करीत आहेत.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

दहा ते पंधरा वर्षापासून त्या मुलांचे आर्थिक शोषण होत आहे. नजिकच्या काळात ही मुले आत्महत्त्येला सामोरी जाणार आहेत. तुमच्या आणि आमच्या महाराष्ट्रामध्ये शिक्षक हा एक वर्ग आहे, ज्या शाळेमध्ये त्या शिक्षकाला हजार रुपये सुध्दा पगार मिळत नाही. माननीय सदस्य श्री. रावते साहेब नेहमी म्हणतात हे शिक्षकांचे प्रतिनिधी नेहमी शिक्षकांच्या पगाराविषयी बोलतात. अशाप्रकारे बिनपगारी काम करणारा मोठा शिक्षकांचा वर्ग आहे. तो अशा शाळांमधून काम करीत आहे. आणि चौथा प्रकार असा आहे की, तुमच्या आणि आमच्या अनुदानित शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळांना मात्र अडथळयाच्या शर्यतीमध्ये टाकले जात आहे. त्या शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे नजिकच्या काळामध्ये, मध्यम आणि गरीब वर्गाच्या मुलांना शाळेची दारे बंद केली जातील. त्यावेळी हा मुलगा शाळेतून बाहेर फेकला जात आहे असे तुमच्या लक्षात येईल. सांख्यिकीय माहिती सुध्दा आम्हाला खरी दिली जात नाही. प्राथमिक शाळेतून बाहेर पडणारी मुले, माध्यमिक शाळेतून बाहेर पडणारी मुले, उच्च माध्यमिक शाळेतून बाहेर पडणारी मुले, आणि सिनियर कॉलेजमधून बाहेर पडणारी मुले अशाप्रकारे मध्येच शिक्षण सोडणाऱ्या मुलांची सांख्यिकीय माहिती घेतली तर तुमच्या लक्षात येईल की, त्याची आर्थिक क्षमता चांगली आहे. परंतु त्याला नीट मार्गदर्शन मिळाले नाही. त्याला नीट शिकविले गेले नाही. त्याला पुरेसा आर्थिक पुरवठा झाला नाही. म्हणून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामधून बाहेर पडणारा मोठा वर्ग व्यसनाकडे वळत आहे, गैरकृत्यांकडे वळत आहे, हिंसाचाराकडे वळत आहे, नक्षलवादाकडे वळत आहे, ईझी मनीकडे वळत आहे, आतंकवादाकडे वळत आहे. तो या सर्वांकडे वळण्यापूर्वीच तुम्हा-आम्हाला प्रयत्न करावे लागतील. म्हणून मी राज्यातील, देशातील सर्व विचारवंताना सांगतो की, देशातील या नवीन पिढीने "भारत माझा देश आहे, आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत" असे खऱ्या अर्थाने म्हणावे अशी जर तुमची मनोमन इच्छा असेल तर तुमचे राजकीय झेंडे बाजूला ठेवा, राजकीय इच्छाशक्ती बाजूला ठेवा, आणि बालवाडीपासून सर्वांना मोफत शिक्षण द्या. टाटा, बिर्लांचा मुलगा आणि गरिबांचा मुलगा एकाच बाकावर बसून "भारत माझा देश आहे,सारे भारतीय माझे बांधव आहेत" असे म्हणून त्याला शिकू द्या.

सभापती महोदय, आपण याठिकाणी एन.आर.आय. चा उल्लेख करीत असतो. देशाबाहेर जाणारे हे नॉन रेसिडेंशिअल इंडियन्स कोण आहेत? ही सर्व खेडापाडयातील मुले आहेत. ज्यांना तुम्ही आणि आम्ही गेल्या 30-40 वर्षापूर्वी शिकविले आहे. आजची शिक्षण व्यवस्था सदोष आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

आजची शिक्षण व्यवस्था ही मॅकॅले शिक्षणव्यवस्था आहे. या शिक्षण व्यवस्थेमध्ये जरुर दोष आहेत, ते आपण रेक्टिफाय करु. परंतु सर्वांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. आणि आपण जर त्यांना मोफत शिक्षण दिले नाहीतर एका वेगळया संकटाला आपल्याला सामोरे जावे लागेल. ते मोफत शिक्षण आपण मातृभाषेतून दिले पाहिजे अशी मागणी करतो. शिक्षण व्यवस्थेसंबंधी आपण एक बृहत आराखडा तयार केला पाहिजे. तो बृहत आराखडा तयार केल्याशिवाय आपण नवीन शाळांना मान्यता देऊ नका. त्याचबरोबर या शाळांना "कायम स्वरुपी" करण्याचे पत्र आपण त्यांना द्यावे अशी मी विनंती करतो. आपण या शाळांकरिता एक मूल्यांकन समिती नेमण्याचे ठरविले होते. त्या समितीने आपला अहवाल अजून तयार केला नाही. त्या समितीला मी चार पानी पत्र लिहिले आहे. तेव्हा नवीन मूल्यांकनाचे निकष आपण निर्धारीत केले पाहिजेत. येत्या मे महिन्याच्या आत या शाळांचे आपण मूल्यांकन पूर्ण केले पाहिजे. व त्यानंतर या शाळांना मान्यता दिली पाहिजे. आणि सर्व प्रकारच्या शाळांकरिता बृहत आराखडा तयार करुन त्यानंतर नवीन शाळांना आपण मान्यता द्यावी. नाहीतर महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये एक वेगळया प्रकारचे युग सुरु झाले आहे. त्यामधून गरीब मुलाच्या शिक्षणाचा अंत होईल, तो अंत आपण पाहू नका अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगावयाची राहिली आहे. आमची मुले कुठे शिकली ? असे त्यांचे म्हणणे मी ऐकले. मी सांगू इच्छितो की, माझी दोन्ही मुले मराठी शाळेतच शिकली. त्यापैकी एक भोसला मिलिटरी स्कूलमध्ये गेला. त्याठिकाणी मराठी माध्यम नव्हते, हिंदी व इंग्रजी माध्यम होते. तो हिंदी माध्यमामध्ये शिकला, दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला. शेवटपर्यंत तो इंग्रजी माध्यमामध्ये नव्हता. आता तो एम.एस्सी. झाल्यानंतर पी.एच.डी. करीत आहे. म्हणजे इंग्रजी माध्यमाची शाळा असेल तर भविष्य घडते असे नाही, असा माझा स्वतःचा अनुभव मी मुद्दाम याठिकाणी नमूद करीत आहे.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : या चर्चेकरिता 15 माननीय सदस्यांकडून नावे आलेली आहेत. त्यापैकी 2 माननीय सदस्यांची भाषणे झालेली असून अजून 13 सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. म्हणून यापुढे बोलणाऱ्या माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत अशी माझी विनंती आहे. या चर्चेकरिता 5 वाजून 52 मिनिटांपर्यंत वेळ दिलेली आहे,त्यानंतर मंत्रिमहोदयांचे 15 मिनिटांचे उत्तर मिळून 6 वाजून 07 मिनिटांनी ही चर्चा संपली पाहिजे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, ही चर्चा अतिशय उत्तम प्रकारे सुरु आहे. सर्व माननीय सदस्यांची मते आणि मतांतरे त्यामधून व्यक्त होणे आवश्यक आहेत. मंत्रिमहोदयांचे उत्तर देखील त्याच तोडीचे असावे. म्हणून आपण आता विश्रांती घेऊन शिल्लक राहिलेली चर्चा उद्या पुढे सुरु करावी अशी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी नियम 97 अन्वये जी चर्चा घडवून आणलेली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असल्यानंतरही महाराष्ट्रात मराठी शाळांना परवानगी दिली जात नाही हा फार चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. गोरगरिबांच्या मुलांना, दलितांच्या मुलांना, गल्ली-बोळातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे अशी शासनाची भूमिका असल्यानंतर आणि मराठी ही महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा असल्यानंतरही या ठिकाणी आठ हजार मराठी शाळांना परवानगी नाकारण्यात आलेली आहे. या महाराष्ट्रात शिक्षणाची चळवळ सुरु झाली. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख आणि इतर अनेक शिक्षण महर्षिंनी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी फार मोठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. त्यांचा उद्देश एकच होता की,शिक्षणाने माणूस मोठा होतो. शिक्षणाने स्वत:चा विकास तर होतोच परंतु कुटुंबाचा विकास होतो, समाजाचा विकास होतो, गावाचा विकास होतो,देशाचा विकास होतो. आणि देश समृध्द बनतो हे सर्वांनाच माहीत आहे.

सभापती महोदय, या शिक्षण महर्षिंचा शाळा काढण्यामागचा उद्देश आणि आज ज्या शाळा काढण्यात येत आहेत, शाळा काढण्यासाठी जे हजारो प्रस्ताव शासनाकडे येत आहेत त्यांचा उद्देश काय आहे याचा शासनाने कधी विचार केलेला आहे काय? सभापती महोदय, याबातीत कधीच विचार झालेला नाही. मराठी भाषिकांवर एवढा अन्याय केलेला आहे की, आठ हजार मराठी शाळांना मान्यता दिलेली नाही. शासन निर्णयान्वये प्रस्ताव मागविण्यात आले होते. मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमाच्या ज्यांना शाळा काढावयाच्या असतील त्यांनी पाच हजार रुपयाच्या चलनासह शासनाकडे प्रस्ताव सादर करावा असे म्हटले होते. त्याप्रमाणे या निकषात बसणारे अनेक प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. थोडयावेळा पूर्वी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी मुंबईची माहिती दिलेली आहे. ही चिंतनीय बाब आहे की, मराठी शाळांची संख्या, मराठी भाषिकांची सख्या, मराठी लोकांची संख्या मुंबईत कमी होत आहे. मराठी शाळा ओस पडत आहेत. मराठी शिक्षण कोणी घेत नाही, याचा शासनाने कधी विचार केला आहे काय? मराठी शाळेत मुले कां जात नाहीत. नगरपालिकेच्या शाळेत का जात नाहीत? जिल्हापरिषदेच्या शाळेत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे...

का जात नाहीत? खासगी शाळा का निवडतात? याचा शासनाने कधी विचार केलेला आहे काय? नगरपालिकेच्या शाळांना इमारती नाहीत. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांना इमारती नाहीत. शाळाखोल्या नाहीत. बसायला बेंचेस नाहीत. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. शिक्षक नाहीत. त्यामुळे अशा शाळांमध्ये आपल्या पाल्याला पाठवतांना पालक विचार करतात. पण ज्यांना कुठेच प्रवेश मिळत नाहीत अशी गरिबांची मुले, दलितांची मुले या शाळांमध्ये जातात आणि त्या शाळांमध्ये ते काय शिकत असतील हे आम्हाला माहीत आहे. मी एका संस्थेत मुख्याध्यापक म्हणून काम केलेले आहे त्यामुळे मला हे माहीत आहे. माझा इंग्रजीला विरोध नाही. ज्यांना इंग्रजी शिकावयाचे असेल, जो हुशार असेल त्यांनी जरुर इंग्रजी शिकावे. त्यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जावे. सभापती महोदय, इंग्रजी माध्यमाच्या भरमसाठ शाळा दिलेल्या आहेत. पण या शाळेतील मुले इंग्रजी माध्यमातच इयत्ता दहावी पर्यंत शिकतात हे कधी पाहिलेले आहे काय? याबाबतीत मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शंभर मुले असतील तर त्यापैकी फक्त 30 ते 40 टक्केच मुले इंग्रजी माध्यमात शिकतात आणि बाकीचे 70 ते 80 टक्के मुले इयत्ता चौथ्या ते पाचव्या वर्गापासून मराठी माध्यमाच्या सेमी इंग्रजी शाळेत प्रवेश घेतात.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे ....

त्यांना धड इंग्रजीही येत नाही आणि धड मराठीही येत नाही. आपण ज्या शाळा दिल्या त्या देताना भेदभाव का केला ? या ठिकाणी मराठी भाषिकांची संख्या जास्त असल्यामुळे आपण समतोल प्रमाणात या शाळांचे वाटप करावयास पाहिजे होते. आपण त्यांच्याकडून फी घेतली आणि यांच्याकडूनही फी घेतली. यासंदर्भात अन्याय झालेला आहे. माध्यमिक शाळांची जी यादी लागली त्यामध्ये माध्यमिक शाळांचे प्रस्ताव पाठवित असताना जिल्हा समिती आणि राज्य समिती अशा दोन्ही समित्यांची मान्यता त्या प्रस्तावास असली पाहिजे. ज्या शाळांच्या प्रस्तावांच्या बाबतीत दोन्ही समित्यांची मान्यता आहे अशांची यादी लागली. त्यामध्ये कमी प्रस्ताव निकषामध्ये बसले. एक दोन महिने निर्णय मिळाला नाही. या दोन समित्यांपैकी कोणत्याही एका समितीची शिफारस असेल तर त्याचा पुन्हा त्यांचे पुनर्मूल्यांकन झाले. दोन समित्यांपैकी एका समितीची शिफारस असेल तर अशा प्रस्तावांना शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु त्यामध्ये अन्याय झालेला आहे. कारण मराठी शाळांचे जे प्रस्ताव शासनाकडे आले त्यांच्याकडून आपण फी वसूल केलेली आहे. जी काही पाच हजार रुपये, दहा हजार रुपये फी असेल ती आपण त्यांच्याकडून वसूल केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, जर आपल्याला सर्व स्तरापर्यंतच्या लोकांना शिक्षण देणे आवश्यक आहे, सर्वांना शिक्षण मिळावयास पाहिजे असे वाटत असेल तर मराठीच्या शाळांना परवानगी देणे अत्यंत आवश्यक आहे. तसे केले तरच शिक्षण वस्त्यावस्त्यांपर्यंत पोहोचेल. शाळा कायम विनाअनुदान तत्वावर देऊ नका. शाळा कमी द्या परंतु अनुदान तत्वावर द्या. पाहिजे तर शाळांना निकष लावा. त्या ठिकाणी चांगले प्रशिक्षित शिक्षक असले पाहिजेत, शाळेला इमारत असली पाहिजे, पिण्याच्या पाण्याची सोय असली पाहिजे, स्वच्छतागृहाची सोय असली पाहिजे असे निकष लावावेत. जर शाळेचा दर्जा चांगला असेल तर निश्चितपणे मराठी भाषिक मुले त्या शाळेमध्ये शिकावयास जातील. या प्रस्तावावर बोलताना मी एवढेच सांगतो की, 8 हजार शाळा असो किंवा कितीही शाळा असो त्यांना निकष लावून मान्यता देणे गरजेचे आहे. त्यामुळे मराठी भाषिक मुलांची चांगल्या प्रकारच्या शिक्षणाची सोय होईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे .....

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा प्रश्न कायम विनाअनुदानित तत्वाबाबतचा आहे. सन 2000 मध्ये शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर शाळा दिल्या ही चांगली गोष्ट केली. त्यावेळच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन आपण ते केले असेल परंतु आपल्याला त्यांना फार काळ कायम विनाअनुदान तत्वावर ठेवता येणार नाही. आम्ही असा आग्रह धरला की, कायम विनाअनुदानित मधील कायम हा शब्द काढून ढाकावा. तो शब्द काढला परंतु त्यामध्ये सुध्दा भेदभाव केला. आपण प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा यांच्या बाबतीत कायम विनाअनुदानित मधील कायम हा शबद काढला पण त्यामध्ये सुध्दा अन्याय झालेला आहे. ते करताना आपण 14 जुलै 2000 च्या शासन निर्णयाचा विचार केला नाही. माध्यमिक शाळा असो किंवा प्राथमिक शाळा असो त्या शाळेच्या मान्यतेपासून पहिली चार वर्षे काहीही अनुदान नाही, पाचव्या वर्षी 20 टक्के अनुदान, सहाव्या वर्षी 40 टक्के अनुदान याप्रमाणे काहीच केले नाही. कोणी तरी सांगितले की, आम्ही 2010 पासून देऊ. कायम विनाअनुदानितचा जो प्रश्न आहे त्यामुळे काही शिक्षकांना 10 ते 15 वर्षे झाली तरी वेतन मिळत नाही. काही शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांनी त्या शाळेत शिकवून काही उपयोग नाही. 14 जुलै, 2000 चा जो शासन निर्णय आहे त्यानुसार कायम विनाअनुदान तत्वावरील शिक्षकांना वेतन दिले पाहिजे. शिक्षकांना वेतन मिळत नसेल तर चांगले शिक्षण मिळणार नाही. पाहिजे तर आपण त्या शाळांना निकष लावून मान्यता द्यावी. त्या ठिकाणी संच मान्यता मिळाली पाहिजे तसेच त्यांना नियुक्ती मिळाली पाहिजे., सर्व सोयी असल्या पाहिजेत, निकाल चांगला असला पाहिजे, रोस्टर असले पाहिजे असे निकष लावा परंतु त्यांना अनुदान द्यावे. शासनाने कायम विनाअनुदानितमधील कायम शब्द काढला त्याबद्दल आम्ही अभिनंदन केले. परंतु कनिष्ठ महाविद्यालयातील ज्या तुकड्या आहेत त्यांच्यासंदर्भात कायम शब्द का काढला नाही ? एकाच संस्थेच्या, एकाच शाळेच्या त्याच तुकड्या आहेत. याच्यामुळे किती फायदा केलेला आहे ?

यानंतर श्री. अजित शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे..

खेड्यापाड्यामध्ये 11-12 वी पर्यंत शाळा निघाल्या त्यामुळे मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. तेव्हा कनिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भातील "कायम" शब्द काढल्यास त्यांना न्याय मिळेल. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, यापुढे कायम अनुदान तत्वावर शाळा देताना त्याचे फेर मूल्यांकन करुन त्यांना अनुदान द्यावे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भातील कायम शब्द काढून टाकून भेदभाव नष्ट करावा. शाळेच्या प्रस्तांवाबाबत पुनर्मूल्यांकन ताबडतोब सुरु करावे. दिनांक 14 जुलै 2000 च्या शासन निर्णयानुसार पुनर्विचार करुन शाळा मान्यते पासून सुरुवातीची चार वर्षे काहीही अनुदान नाही. पाचव्या वर्षी 20 टक्के अनुदान सहाव्या वर्षी 40 टक्के अनुदान सातव्या वर्षी 80 टक्के अनुदान आणि नंतर 100 टक्के अनुदान देण्यात यावे अशातऱ्हेचा प्रस्ताव करुन न्याय द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे सकाळपासून सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना खालच्या सभागृहात सुध्दा जायचे आहे. तेव्हा आपण ही चर्चा उद्या सकाळी ठेवावी अशी विनंती आहे.

श्री.सय्यद ज़मा : सभापति महोदय, मेरी कल दिल्ली में एक महत्वपूर्ण बैठक है. इसलिए मेरा अनुरोध है कि मुझे इस प्रस्ताव में बोलेने के लिए 2 मिनट का समय आज ही दिया जाए.

तालिका सभापति (श्री.रमेश शेंडगे): लेकिन आपका नाम मेरे पास आया नहीं है.

श्री सय्यद ज़मा : मैंने अपना नाम सुबह ही दिया है.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शिक्षणावर अल्पकालीन चर्चा हा मोठा विरोधाभास आहे. के.जी.पासून पी.जी.पर्यंत विषय आहे आणि त्यासाठी फक्त दीड तासाची चर्चा ठेवलेली आहे. या दीड तासात सविस्तर चर्चा होणे खूप कठीण आहे. महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव आणि सुर्दैव देखील आहे. काही जणांची मुले सिलिकॉन व्हॅलीमध्ये शिक्षण घेत आहेत ही सुर्दैवाची बाब आहे आणि काही जणांची मुले दुर्गम व्हॅलीमध्ये पाखर मारत आहेत ही दुर्दैवी बाब आहे. दुर्गम भागातील आदिवासींच्या मुलांना शिक्षण मिळत नाही. राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. दुर्दैवाने त्या शेवटच्या घटकापर्यंत त्या पोहोचत नाहीत. शासनाने सर्व शिक्षा अभियान योजना घेतली. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास दरवर्षी 447 कोटी रुपये मिळतात. त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा 16 टक्के आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी मिळत असूनही राज्यामध्ये मराठी शाळा बंद होत आहेत आणि त्यावर चर्चा करावी लागते यापेक्षा मराठी माणसांचे दुर्दैव ते कोणते ?

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळा बंद का पडत चालल्या आहेत याचा कधी शासनाने विचार केला आहे काय ? या शाळा बंद पडण्यासाठी जसे राज्य शासन जबाबदार आहे तशी पालकांची मानसिकताही काही अंशी जबाबदार आहे. प्रत्येक पालकाला असे वाटते की, इंग्रजी भाषा म्हणजे सर्वश्रेष्ठ, माझा मुलगा वाघिणीचे दूध प्यायला म्हणजे त्याने सर्व प्राप्त केले. प्रत्येक घरामध्ये काम करणा-या बाईला असे वाटते की, माझा मुलगा इंग्रजी शाळेमध्ये जायला पाहिजे. हे दुर्दैवी आहे. आपण हा धोका पूर्वीच ओळखला नाही. इयत्ता पहिलीपासून इंग्रजी केले असते तर हा धोका आपल्यासमोर आला नसता आणि मराठी माध्यमाच्या शाळा जीवंत राहिल्या असत्या. मी यापूर्वीही हा प्रश्न मांडला होता. पहिलीपासून इंग्रजी शिकविले जाणार काय, या माझ या प्रश्नाला तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके यांनी होय असे उत्तर दिले होते. परंतु तशी व्यवस्था कधीच अस्तित्वात आली नाही. हा धोका 10-15 वर्षापूर्वीच ओळखला पाहिजे होता. तत्कालीन शिक्षण मंत्री स्व.रामकृष्ण मोरे यांनी त्याची सुरुवात केली होती, परंतु तशी सर्वंकष सुरुवात झाली नाही. परंतु श्री.पुरके यांनी त्याच्या उलट कृती केली.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, आज मुंबईत जेवढया मराठी माध्यमाच्या शाळा आहेत त्यामध्ये प्रसिध्द शाळाही समाविष्ट आहेत. मी ज्या शाळेत शिक्षण घेतले ती पार्ले टिळक विद्यालयाची मराठी माध्यमाची शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. पुण्यामध्ये तीच अवस्था आहे. पार्ले टिळक विद्यालयाची मराठी शाळा बंद पडू नये म्हणून त्या शाळेचा माजी विद्यार्थी या नात्याने माझ्यासह अनेकांनी निदर्शने केली होती. शिवसेना पक्षाच्यावतीने निदर्शने केली नव्हती. परंतु मराठी संस्कृतीचा ठेवा जपावा यासाठी ती निदर्शने होती. परंतु त्या शाळेच्या सचिवांनी मराठी माध्यमात प्रवेश घेण्यासाठी आमच्याकडे विद्यार्थी येत नाहीत असे आम्हाला सांगितले. ही चुकीची गोष्ट आहे. त्या शाळेने तेथील कर्मचारी वर्गच कमी करुन टाकला आहे. मराठी माध्यमामध्ये शिकणा-या लोकांना घरी जाण्यास सांगितले. तुमची शाळेला गरज नाही, व्हीआरएस घेऊन जावे आम्हाला आयसीएसई, सीबीएसईची शाळा सुरु करावयाची आहे असे त्यांना सांगितले आहे. ज्या मराठी माध्यमाच्या शाळा मागील 40-50 वर्षांपासून चालू होत्या त्यामध्ये

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

डॉ.दीपक सावंत....

बालमोहन विद्यामंदिर, पार्ले टिळक विद्यालय यासारख्या शाळांनी मराठीपण जपले पाहिजे होते. आयसीएसई, सीबीएसईच्या शाळा सुरु करावयाच्या आहेत, त्या दौडमध्ये तुम्ही जा, परंतु असणा-या मराठी शाळांनी त्यांची मूळ संस्कृती विसरता कामा नये. जे आयसीएसई आणि सीबीएसईची परवानगी मागतील त्यांना एनओसी देताना सांगितले पाहिजे की, मराठी माध्यमाची शाळा चालू राहिलीच पाहिजे. त्या शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी शिक्षण मिळाल्याशिवाय मराठी माध्यमाच्या शाळा जीवंत राहणार नाहीत.

सभापती महोदय, दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, बाल शिक्षणासाठी शासन कायदा करणार आहे. के.जी.मध्ये काय आहे, नर्सरीमध्ये काय आहे हे सांगण्यासाठी कायदा करण्याची गरज काय हे माननीय मंत्री महोदयांच्या भाषणातून येणे आवश्यक आहे. हा कायदा कशासाठी केला जात आहे ? जे कोवळे मन असते त्याच्यावर संस्कार घडविण्यासाठी कायदा करावा लागतो. मराठी शाळेमध्ये कोणी का जावे असा प्रश्न उपस्थित केला तर तो चुकीचा होऊ नये. मराठी शाळांचे दुर्दैव असे आहे की, तेथे शिक्षक आहेत, पण स्वच्छतागृहे या शाळांना मिळत नाही म्हणून मराठी शाळांचा श्वास कोंडला जात आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

(डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी मराठी, गुजराथी शाळा बंद पडत चालल्या असल्याचे सांगितले. आता मुले अंबानीच्या शाळेमध्ये, वातानुकूलित शाळेमध्ये जात आहेत. राज्यातील मराठीच्या शाळा बंद पडण्यास हे सरकार कारणीभूत आहे. राज्यामध्ये 100 कोटी रुपये खर्च होतात त्यावेळी शिक्षणावर फक्त 2.5 कोटी रुपये खर्च होतात, ही राज्याची शोकांतिका आहे. प्राथमिक शिक्षणावर 50 टक्के देखील खर्च होत नाही. मग शाळा टिकणार कशा ? शासनाचाच हा रिपोर्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी सांगितले की, सरासरी 50 मराठी शाळा वर्षाला बंद पडत आहेत. कोल्हापूरातील 251 शाळा आज अंधारात आहेत. या शाळा कशा चालवायच्या हा प्रश्न आहे. खेडयापर्यन्त इंग्रजी माध्यमाच्या शाळा पोहोचल्या आहेत. त्यांनी एक कविता देखील म्हणून दाखविली. सभापती महोदय, विरोधाभास असा आहे की, हिंदी माध्यमाच्या शाळा, उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये वाढ होत आहे, ही बाब देखील आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. या परिस्थितीला आपली शिक्षण पध्दती कारणीभूत आहे. आज मुलांना सीबीएसई आयसीएसईकडे का जावे लागत आहे ? कारण पालकांना आणि विद्यार्थ्यांना हे माहीत आहे की, एस.एस.सी. बोर्डामध्ये मार्क्स कमी मिळतात. जो पर्यन्त आयएसीएसई, सीबीएसई, एस.एस.सी. बोर्ड यांच्या अभ्यासक्रमात समानीकरण होणार नाही तो पर्यन्त सीबीएसई आणि आयएसीएसई शाळांकडे विद्यार्थी जात राहातील. त्या शाळांमध्ये 26 विषय शिकविले जातात, वैकल्पिक विषय 6 आहेत. म्युझिक, आर्किटेक्चर, फोटोग्राफी इत्यादी विषय ते घेऊ शकतात. शासनाचे बेस्ट ऑफ फाईव्हच्या बाबतीत तेच होणार आहे. त्या विषयाची आपण वेगळी चर्चा करु. पुन्हा एस.एस.सी. बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे तुम्ही खच्चीकरण करणार आहात. अशी परिस्थिती असेल तर पालक आपल्या मुलांना एस.एस.सी. बोर्डाच्या शाळेत कशासाठी पाठवील ? परिणामी सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळा मोठया होतील. सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्या बद्दल मला आदर आहे. परंतु दुर्दैव हे आहे की, या राज्याला पूर्ण वेळ शिक्षण मंत्री नाही. त्यांच्याकडे ॲडिशनल चार्ज आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : माझ्याकडे हा ज्यादा विभाग आहे. माझ्याकडे जे जे विषय आलेले आहेत त्यांना मी पूर्ण न्याय दिलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपले सर्व शिक्षा अभियान हे संपूर्णपणे फेल गेलेले आहे. केन्द्रीय मंत्री श्री. कपिल सिब्बल यांनी राईट टू एज्युकेशन, शिक्षणाचा हक्क प्रत्येकाला प्राप्त करुन दिला. राईट टू एज्युकेशन आणि सर्व शिक्षा अभियान यांचे उद्दिष्ट एकच असल्याचे आपल्याला दिसून येईल. सर्व शिक्षा अभियानाची एक बाजू राईट टू एज्युकेशन हीच होती. पण या सर्व शिक्षा अभियानामध्ये आपण काय केले ? या सर्व शिक्षा अभियानांतर्गत आलेले करोडो रुपये आपण खर्च करु शकला नाहीत. आपण असे म्हणतो की. ओल्ड वाईन इन न्यू बॉटल..

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, माननीय मंत्रीमहोदय, मराठी माध्यमाच्या शाळा का बंद पडतात या विषयावर खरोखर सखोल विचारमंथन होणे आवश्यक आहे. ज्या काही मराठी शाळा मुंबईमध्ये व महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत त्यांचे पुनरुज्जीवन करणे, त्यांना आधार देणे आवश्यक आहे. सीबीएसई, आयसीएससी आणि आयबी शाळांचे स्तोम वाढत आहे. परंतु मराठी शाळा बंद पडता कामा नयेत. मराठी माणसाची मान खाली जाता कामा नये. त्यासाठी एसएससी बोर्डाची पुनर्रचना करणे, अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र

(नंतर हिंदी भाषण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, नियम 97 के अन्तर्गत सम्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते एवम् अन्य सम्माननीय सदस्यों ने यहां जो प्रस्ताव रखा है, उस पर मैं अपने विचार रखने के लिए खड़ा हूं. जैसा कि प्रस्ताव में कहा गया है कि वर्ष 2008 में महाराष्ट्र में 8 हजार मराठी माध्यम के स्कुलों को मान्यता देने के लिए प्रस्ताव भेजे गए हैं लेकिन अभी तक मान्यता नहीं मिली है. यह बहुत खेद की बात है. इन सभी स्कुलों को मान्यता मिलनी चाहिए. महाराष्ट्र में मराठी स्कुलों को मान्यता न मिलना खेद की बात है. कारण मुझे मालूम है. मान्यता न मिलने के पीछे यह कारण हो सकता है कि सरकार के पास पैसे की कमी हो, मान्यता देंगे तो कायम बिना अनुदान पर देने का विचार हो, बजट पर बोझा पड़ने की बात हो सकती है, इसलिए सरकार मराठी स्कुलों को मान्यता नहीं दे रही है. मान्यता देने में विलंब हो रहा है. 'कायम' शब्द को हटा देंगे. जो स्कूल चल रहे हैं, उनके लिए 'कायम' शब्द हटाने के बाद आपकी जो योजना है उसको आगे ले जाना होगा. दूसरी बात यह है कि 1 एप्रिल, 2010 को एक क्रांतिकारी फैसला हुआ है. सम्माननीय सदस्य श्री दीपक सावंत ने कहा कि "ओल्ड वाईन इन न्यू बॉटल". कुछ भी कह लीजिए. "न्यू वाईन इन ओल्ड बॉटल कह लीजिए ".

लेकिन यह सही है कि संविधान के अन्तर्गत शिक्षा का अधिकार मिला है. इस पृष्ठ भूमि में प्राथमिक, माध्यमिक और उच्च माध्यमिक शिक्षा के बारे में और पूरी शिक्षा नीति के संबंध में महाराष्ट्र में गंभीर रुप से विचार होना चाहिए. 6 से 14 साल की आयु के सभी बच्चों को मुफ्त शिक्षा पाने का अधिकार मिला है. इस शिक्षा नीति के अन्तर्गत 25 प्रतिशत आरक्षण भी रखा गया है. यह आरक्षण किसी जाति,धर्म,संप्रदाय के लिए नहीं है बल्कि आर्थिक दृष्टि से जो कमजोर तबका है, उनके लिए है. संविधान द्वारा कानूनन शिक्षा का अधिकार मिलने के बाद मुझे लगता है कि महाराष्ट्र की शिक्षा नीति पुनर्गठित होनी चाहिए. मेरा यह सुझाव है कि इस नई शिक्षा नीति के संबंध में चर्चा करने के लिए दो या तीन दिन की वर्कशॉप रखी जाए और " शिक्षा का अधिकार " यह जो कानून आया है, उसकी एक कॉपी हम सभी विधान सभा एवम् विधान परिषद के सदस्यों को दी जाए. इस वर्कशॉप में शिक्षा विशेषज्ञों को आमंत्रित किया जाए. यह वर्कशॉप सभी के लिए खुली रखी जाए. ताकि महाराष्ट्र में इस शिक्षा नीति पर व्यापक चर्चा हो सके. संवैधानिक रुप से शिक्षा का अधिकार मिलने के बाद तो यह चर्चा होनी ही चाहिए. मेरा यह सुझाव है कि महाराष्ट्र

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा.....

में मराठी माध्यम के स्कुलों को खोलने के संबंध में, अनुदान के संबंध में, उसके पक्ष में लॉजिकली सपोर्ट के संबंध में टॉप मोस्ट प्राऑरिटी मिलनी चाहिए. क्योंकि महाराष्ट्र में मराठी माध्यम के स्कुलों को प्राऑरिटी नहीं मिलेगी तो महाराष्ट्र के लोगों के साथ अन्याय होगा. हमारे महाराष्ट्र राज्य में मराठी माध्यम के स्कुलों को प्राऑरिटी न मिलना खेद की बात है. यह नहीं होना चाहिए. मेरा यह भी मत है कि दूसरे प्रांतों की भाषा, दूसरी भाषा के स्कुलों को भी सपोर्ट मिलना चाहिए. अल्पसंख्याक मुस्लिम बच्चों के लिए उर्दू माध्यम के स्कुलों को सपोर्ट मिलना चाहिए. मैं आपको चंद्रपुर जिले का उदाहरण देता हूं. चंद्रपुर जिले में कारखानों में तेलगू भाषा बोलने वाले हजारों मजदूर काम करते हैं, हमने वहां पर उनके बच्चों को पढ़ने के लिए तेलगू माध्यम का स्कूल खुलवाया है. हिंगणा में एमआयडीसी में उड़िया भाषा बोलने वाले हजारों मजदूर काम करते हैं, वहां पर उनके बच्चों के लिए उड़िया माध्यम का स्कूल खुलवाया है. इसलिए मेरा यह सुझाव है कि वर्ष 2008 में महाराष्ट्र में जिन 8 हजार मराठी स्कुलों ने मान्यता के लिए आवेदन किया है और 2008 के बाद भी आवेदन आए होंगे, उन सब को बिना विलंब मान्यता दी जाए. एक नई शिक्षा नीति बनाई जाए. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं. आपने मुझे बोलने के लिए वक़्त दिया, उसके लिए धन्यवाद.

.....

यानंतर श्री कपिल पाटील यांचे भाषण.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, यामध्ये दोन मुद्दे महत्वाचे आहेत. त्यात एक म्हणजे मराठीबाबत सन्माननीय सदस्यांचा जो आग्रह असतो त्या मताशी मी स्वत: आणि संपूर्ण सभागृह सुध्दा सहमत आहे, यात दुमत नाही. पण याच प्रस्तावातील दुसरा जो मुद्दा आहे तो म्हणजे 8 हजार मराठी शाळांना परवानगी नाकारण्यात आली, ती दिली गेली पाहिजे. यामध्ये केवळ भावनेच्या आहारी जाऊन काही मत मी प्रकट करणे शक्य होणार नाही. या राज्यात एकूण 40 हजार खेडी व 70 हजार मराठी शाळा आहेत. त्यात अजून 8 हजार मराठी शाळांना परवानगी दिली तर आहेत त्यातील 10 हजार शाळा बंद पडतील अशी स्थिती निर्माण होईल आणि त्यामध्ये जे शिक्षक नोकरीवर आहेत त्यांना घरीच जावे लागेल. दुसरे म्हणजे मोफत शिक्षणाची व्यवस्था आपण केली पण शाळेत शिकविण्यासाठी कपडे देणे अगदी कानातील बाळी तसेच पालकांना आणखी काय काय द्यावयाचे इतके आता सुरु झाले आहे. शिक्षकांनी उदार होऊन अथवा संस्था चालकांनी उदार होऊन पदरमोड करुन न मिळालेल्या पगारातून पैसा खर्च करुन जो बाजार सुरु आहे तो मात्र थांबला पाहिजे म्हणून केवळ भावनेच्या आहारी जाऊन मराठी शाळांना मान्यता मिळाली पाहिजे याबाबत गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ ST/ MMP/ KGS/ KGS/ SBT/ MMP/ 18:00

श्री. कपिल पाटील .....

ज्या शाळा आहेत त्या अनुदानावर आणून त्यांना अधिक ताकदवान बनवण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे. या ठिकाणी परवा माननीय पंतप्रधांनानी या देशाला शिक्षणाच्या मुलभूत हक्कासंबंधीचा कायदा समर्पित केला तो क्रांतिकारी निर्णय आहे, असे वारंवार या ठिकाणी सांगितले जाते परंतु हा क्रांतिकारी निर्णय नाही. कारण हंटर कमिशनपुढे महात्मा फुले यांनी निवेदन दिले होते, त्या घटनेला 160 वर्षाच्या पुढे काळ लोटला आहे. सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे अशी मागणी त्यांनी त्यावेळी केली होती. तब्बल 160 वर्षानंतर या देशाच्या संसदेने आठवी पर्यंतच्या शिक्षणाचा अधिकार देण्याचा कायदा केला ही काही क्रांतीकारी गोष्ट नाही. आज आपल्या महाराष्ट्र राज्याचे स्थूल उत्पन्न 6 लक्ष 92 हजार कोटी रुपयांचे असून त्यापैकी 3.1 टक्के तरतूद शिक्षणासाठी केलेली आहे आणि येथेच खरी मेख आहे. ही व्यवस्था आपण बदलणार नाही आणि वरुन शाळांची संख्या वाढवतो आहे असे सांगणार याचा अर्थ आपण आपलीच फसवणूक करुन घेत आहोत असा निघतो. महाराष्ट्रात 8000एक शिक्षकी शाळा आहेत म्हणजे चौथी पर्यंत त्या ठिकाणी शाळा असेल तर त्या प्रत्येक वर्गाला प्रत्येकी एक शिक्षक मिळण्याची गरज आहे. आपण 7000 पेक्षा जास्त नीम शिक्षक नेमलेले आहेत त्यांना आपण पूर्ण वेळ दर्जा देण्याची गरज आहे, प्रत्येक विषयाला शिक्षक देण्याची गरज आहे. शाळेला चार भिंती मिळाल्या नाहीत तरी चालेल परंतु चांगला शिक्षक मिळाला पाहिजे याचीही व्यवस्था करण्याची गरज आहे. कित्येक हजार शाळांमध्ये मुलींसाठी बाथरुमची व्यवस्था नाही, त्यामुळे कमीतकमी मुलींसाठी स्वच्छतागृहे बांधण्याची करण्याची गरज आहे. आपण यातील काही करणार नाही आणि मराठी शाळा वाढल्या पाहिजेत असे बोलणार आणि परवानगी दिली नाही तर जणू काही मराठी अस्मितेवर संकट कोसळले असे बोलणार असू तर ती फसवणूक आहे. इंग्रजी शाळांमध्ये जाणारा वर्ग कोण आहे याची आपल्याला माहिती आहे. बाहेरुन आलेला वर्ग इंग्रजी शाळेकडे जात नाही. आपण स्वत:चीच फसवणूक करीत असतो, आपलीच मुले इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण घेत असतात, गरीबातल्या गरीब माणसाला असे वाटते की, माझा पोरगा इंग्रजी शाळेत गेला पाहिजे. ब्रिटीश काळात विलायतेत गेले पाहिजे, बॅरिस्टर झाले पाहिजे असे स्वप्न पाहिले जायचे परंतु आता मोलकरीण स्वत:च्या पोटाला चिमटा काढते आणि आपल्या पोराला इंग्रजी शाळेत घालण्याचा प्रयत्न

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

करते कारण तिला असे वाटते की, माझ्यावर आज जी वेळ आलेली आहे ती वेळ माझ्या मुलाला येऊ नये म्हणून ती आपल्या मुलाला इंग्रजी शाळेत शिकवण्याचा प्रयत्न करते. तिचा मराठी शाळेवरील विश्वास संपला असे नाही पण या बाजारी व्यवस्थेमध्ये माझी मराठीची शाळा, माझ्या मुलांना स्वत:च्या पायावर उभे करु शकेल की, नाही याबाबत तिच्या मनात शंका आहे. त्यामुळे ती स्वत:च्या पोटाला चिमटा काढते आणि आपल्या मुलाला इंग्रजी शाळेत घालते त्यामुळे याचा आपण विचार करणार आहात की, नाही ?

या ठिकाणी श्री. पी.जी.खेरांचा उल्लेख झाला त्यांनी सातवी पर्यंत मराठी शाळेचा आग्रह धरला होता. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून दिले गेले तर ते अधिक फायद्याचे असते याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण हे करीत असतांना अन्य भाषेचा दुस्वास करण्याची गरज नव्हती. मी सर्व आदर राखून विनम्रपणे सांगतो की, त्यावेळच्या मुंबई राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी इंग्रजीला दूर लोटल्यामुळे बहुजन समाजाचे प्रचंड नुकसान झाले. 1937 पासून ते काल परवा पर्यंत माननीय मोरे साहेबांनी निर्णय घेईपर्यंत संबंध बहुजन वर्ग इंग्रजी शिक्षणाला पारखा झाला. मुंबई-पुणे या सारख्या ज्या चांगल्या शाळा होत्या त्यांना इंग्रजीचे चांगले शिक्षण मिळाले. वरचा जो सधन वर्ग होता त्यांनी आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालून नंतर त्यांना परदेशी पाठवून दिले. सर्वसामान्य मुलांना इंग्रजी शिक्षण मिळाले नाही. आता सरकारी नोक-या दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. झिरो बेस बजेट आल्यापासून ख-या अर्थाने नोक-यावर कु-हाड आलेली आहे. झिरो बेस बजेटपासून ते आतापर्यंत जी पदे रिक्त झाली ती पदे पुन्हा न भरण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे आता सरकारी नोक-या शिल्लक राहिलेल्या नाहीत. खाजगी क्षेत्रात निर्माण होणा-या नोकरीमध्ये इंग्रजीशिवाय पर्याय राहिलेला नाही. कारण तुम्हाला बाजार व्यवस्थेमध्ये बाहेर जायचे आहे, लोकांशी संवाद करावयाचा आहे त्यामुळे तुम्हाला भाषेचा दुस्वास करुन चालणार नाही.

यानंतर श्री. सरफरे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. कपिल पाटील...

इंग्रजीचे वर्चस्व असू नये ही आपली भूमिका बरोबर आहे. परंतु इंग्रजीच असू नये ही भूमिका मात्र मराठी माणसाला मारक आहे, महाराष्ट्राला मारक आहे, आणि महाराष्ट्रातील गरीब समाजाला मारक आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे जर आपण लक्षात घेतले तर आपल्या लक्षात येईल की, इंग्रजीचा आग्रह रामकृष्ण मोरे यांना अनेक वर्षानंतर संधी मिळताच त्यांनी धरला. तो किती बरोबर होता.? पूर्वी 7 वी फायनलनंतर इंग्रजी पहिलीला मुले जायची, त्यावेळी त्यांचे इंग्रजी किती पक्के होते? आज 10+2 च्या अभ्यासक्रमातील मुलांचे इंग्रजी चांगले नाही आणि मराठी सुध्दा चांगले नाही. ही दुरवस्था आपण कशामुळे निर्माण केली? यामध्ये शाळेचा किंवा शिक्षकांचा दोष नाही. ही व्यवस्था शासनाच्या धोरणामधून निर्माण झाली, आपणच निर्माण केली. आपल्याला वाटते की, मंत्री आणि मंत्रिमंडळ निर्णय घेते. परंतु आपण निर्णय घेत नसतो. ज्या वर्गाच्या हातामध्ये या देशाच्या ज्ञानाची सूत्रे आहेत, ज्या वर्गाच्या हातामध्ये या देशाची सारी संपत्ती आहे, त्या वर्गाने निर्णय घेतले, आणि बहुजन वर्गाला मात्र कर्दमामध्ये लोटले आणि अभिजन वर्गाला अटकेपार नेऊन ठेवले. आपण सर्वच क्षेत्रामध्ये बाहेर आहोत. मॉलमध्ये नोकरी करण्यासाठी एखादा बाहेरचा माणूस येतो त्यावेळी तो कां आला? म्हणून आपल्याला राग येतो. माझी मुले इंग्रजी चार वाक्ये चांगल्याप्रकारे बोलू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती बदलायची असेल तर आपल्याला वेगळी भूमिका घ्यावी लागेल. इंग्रजी ही जगाची भाषा आहे, व्यापाराची भाषा आहे. काही शे वर्षापूर्वी इंग्रजांचीसुध्दा इंग्रजी भाषा राजभाषा नव्हती. परंतु तेथील लोकभाषेला त्यांनी हिंमतीने व्यापाराची भाषा बनविली. राजभाषा बनविली आणि आज जगाची भाषा बनविली. आज आपल्याला पटो अगर न पटो, इंग्रजी ही जगाची भाषा आहे. आणि जर ती भाषा असेलतर आपली मुले त्या नावेमध्ये बसून अटकेपार गेली पाहिजेत. जगाशी व्यवहार करण्यासाठी सक्षम बनली पाहिजेत. यासाठी इंग्रजीचा आग्रह आपल्याला धरावा लागेल. याचा अर्थ मराठी शाळा आपण बंद कराव्यात काय? बिल्कुल बंद करु नका. मराठी शाळा चालू राहिल्याच पाहिजेत. परंतु त्या सेमी इंग्रजी कराव्या लागतील. आपल्याला चांगले इंग्रजी यावे लागेल. केवळ पहिलीपासून इंग्रजीचा झालेला निर्णय पुरेसा नाही. ती इंग्रजी अधिकाधिक ताकदवान झाली पाहिजे. तरच मराठी शाळा वाचतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. कपिल पाटील....

माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचा मुद्दा मला मान्य आहे की, इंग्रजीच्या ज्या शाळा आहेत. त्यामध्ये आय.सी.एस.इ.च्या, सी.बी.एस.इ. च्या किंवा एस.एस.सी. बोर्डाच्या असतील, त्याठिकाणी मात्र मराठीचा विषय लोअर लेव्हलला नाही तर तो अप्पर लेव्हलला आला पाहिजे. म्हणजे मराठी शाळा या सेमी इंग्रजी बनल्या पाहिजेत,आणि इंग्रजी शाळा या सेमी मराठी बनल्या पाहिजेत. हा दुहेरी निर्णय आपल्याला करावा लागेल. त्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी हा विषय इंट्रोडयूस करा. त्यामध्ये कुणालाही अपवाद करु नका. परदेशी बोर्ड असो, आय.सी.एस.इ. असो, सी.बी.एस.इ. असो कोणतेही बोर्ड त्याला अपवाद राहणार नाही. जर तुम्हाला महाराष्ट्रामध्ये शाळा उघडावयाची असेल तर तुम्हाला मराठी शिकावेच लागेल. आपण एकदा हे सुरु केल्यावर आपोआप या शाळा टिकतील.

आज शाळा बंद पडण्याची कारणे अनेक आहेत. एका बाजूला मोठया संख्येने आपण शाळा निर्माण केल्या, एकाच दिवशी आठ ते दहा हजार नवीन शाळा उघडल्या तर दुसऱ्या दिवशी मराठी शाळा बंद पडणार आहेत. म्हणजे 8 हजार मराठी शाळा सुरु केल्या तर 10 हजार मराठी शाळा बंद पडणार आहेत, आणि 4 हजार इंग्रजी शाळा सुरु केल्या तरी 8 हजार मराठी शाळा बंद पडणार आहेत. म्हणून या दोन्हींचा परिणाम लक्षात घेऊन आराखडा आखल्याशिवाय एकाही इंग्रजी शाळेला किंवा एकाही मराठी शाळेला परवानगी देऊ नका. ज्याठिकाणी गरज आहे त्याठिकाणी जरुर शाळा निर्माण करा. परंतु ज्याठिकाणी गरज नसेल त्याठिकाणी उगाच नवीन शाळा सुरु करण्याचा अट्टाहास धरु नका. भाषेच्या बाबतीत आपण फार भावनिक होत असतो याची मला जाणीव आहे. मी मराठी शाळेत शिकलो असून मराठी भाषेचा पक्का अभिमानी आहे. माननीय सदस्य श्री. रावते साहेबांइतके सुध्दा मला इंग्रजी येत नाही. इंग्रजीतील घटना समजून घेण्यासाठी मला मराठी घटनेचा आधार घ्यावा लागतो. परंतु आज ज्या भाषा ज्या वयामध्ये शिकण्याची गरज आहे, त्याच वयामध्ये शिकविल्या पाहिजेत. जगभर हे मान्य झाले असून विज्ञानाने सुध्दा ते सिध्द केले आहे. वयाच्या 11 व्या वर्षापासून 13 व्या वर्षापर्यंत मुलगा किंवा मुलगी विविध भाषा शिकू शकतात. त्यामुळे आपल्याला वाटते की,आपण ओझे टाकायचे नाही. त्याच्यावर ओझे टाकल्यामुळे काहीही बिघडणार नाही. 11 वर्षानंतर त्याच्या एकेक झडपा, एकेक खिडकी बंद व्हावयास लागते. नंतर मात्र तुम्ही त्याला कितीही भाषा शिकवा, तो शिकू शकत नाही. म्हणजे वयाच्या 11 व्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. कपिल पाटील....

श्री.कपिल पाटील...वर्षापर्यंत, वयाच्या 13 व्या वर्षापर्यंत म्हणजे इयत्ता 7 वी पर्यंत कितीही भाषा त्याला शिकविल्या तरी तो पचवायला तयार होतो. फक्त त्याला चांगले शिकविण्याची व्यवस्था आपल्याकडे पाहिजे. आपल्याकडे चांगल्या शिक्षणाची आणि पर्यावरणाची व्यवस्था नसल्यामुळे ही मुले शिकू शकत नाहीत. मला आपण जर संधी दिली तर मी कां शिकू शकणार नाही? आदिवासी मुले सुध्दा उत्तम इंग्रजी बोलू शकतात. कारण त्यांना मराठी सुध्दा तितकीच परकी आहे. ठाणे जिल्हा आणि कोकणातील आदिवासी पट्टा सोडला तर गोंडी ही मराठी भाषा नाही, कोरकू ही मराठी भाषा नाही. त्यांना इंग्रजी इतकीच मराठी सुध्दा परकी आहे. त्यांच्यावर आपण मराठी भाषा लादली. कारण या राजभाषा व्यवहारामध्ये या राज्याचा एक नागरीक असल्यामुळे त्यांना मराठी शिकणे क्रमप्राप्त आहे. परंतु त्याचबरोबर त्यांनी अन्य भाषा कां शिकू नये? मुंबईतल्या मराठी मुलाला आणि गोंडवनातल्या कोरकू किंवा गोंडी मुलाला सुध्दा इंग्रजी, हिंदी व मराठी भाषा शिकण्याचा समान अधिकार मिळाला पाहिजे. त्याला समान संधी मिळाली पाहिजे. ही संधी जर आपण नाकारली तर नंतर शिकविता येत नाही.

माननीय सदस्य डॉ. वसंत पवार साहेबांनी बाल शिक्षणाचा उल्लेख केला. डॉक्टर साहेबांच्या सर्व मुद्यांशी मी सहमत आहे,परंतु बाल शिक्षणाच्या संदर्भातील कायदा आपल्याकडे अजूनही झालेला नाही.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, संविधानातील कलम 45 नुसार 6 वर्षे वयापर्यंतच्या मुलांसाठी बाल शिक्षणाची सोय केली पाहिजे अशी तरतूद केलेली आहे. प्रत्यक्षात त्यासंबंधीची कोणतीही कायदेशीर तरतूद नसल्यामुळे त्याची अंमलबजावणी होत नाही कारण ते फक्त मार्गदर्शक तत्व आहे. आज श्रीमंताची मुले प्ले ग्रुपमध्ये जातात. नर्सरित जातात. ज्युनियर के.जी.मध्ये जातात, सिनियर के.जी.मध्ये जातात. इयत्ता पहिलीत येण्याच्या आधी ती चार इयत्ता शिकलेली असताते आणि रेडी प्रॉडक्ट बनतात पण तुमची आमची गरीब वर्गाची मुले थेट पहिलीत जातात त्यांचे कोणतेही पूर्वप्राथमिक शिक्षण झालेले नसते, हीच खरी अडचण आहे.पूर्वप्राथमिक शिक्षणाचा जो पाया मजबूत व्हावयास पाहिजे होता तो न झाल्यामुळे सगळी अडचण आहे. एन.डी.ए.च्या पूर्वप्राथमिक शिक्षण काळात संपुष्टात आणले गेले. या राज्यातील बालवाडी ही महाराष्ट्राची सगळयात मोठी देणगी आहे. महात्मा गांधींनी सांगितले की, तुम्ही मॉन्टेसरीला चांगला पर्याय तयार करा म्हणून श्रीमती ताराबाई मोडक आणि श्रीमती अनुताई वाघ यांनी बालवाडीचा शोध लावला. बालवाडी हा मराठी शब्द तामिळनाडूपासून काश्मिरपर्यंत सर्वत्र जाऊन पोहचला. मधल्या काळात घटनेमध्ये 6 ते 14 वयोगटाचा आकडा आला त्यामुळे हे बालवाडीचे शिक्षण संपूर्णत: संपुष्टात आले आज अंगणवाडीमध्ये ही बालवाडी मर्ज करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अन्य भाषिकांच्या संदर्भातील मुद्दा आपल्याकडे वांरवार चर्चेला जातो. मराठी सर्वांनी शिकलीच पाहिजे, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मी त्याबद्दल अत्यंत आग्रही आहे. पण त्याचबरोबर अल्पभाषिकांना त्यांचे अधिकार देणे हेही तितकेच क्रमप्राप्त आहे. कारण संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होण्याच्या आधी यातील अर्धा-अधिक भाग मराठवाडा हा निजाम प्रांताचा, हैदराबाद प्रांताचा भाग होता. डहाणूवाडीकडचा संबंध गुजराथी परिसर महाराष्ट्रात होता. त्यामुळे तेलगु, गुजराथी आणि कन्नड या तीन भाषेची अनेक गावे महाराष्ट्रात राहिलेली आहेत त्यामुळे त्यांना त्यांच्या भाषेत शिकण्याचा जो अधिकार आहे ती व्यवस्था आपल्याला करावीच लागेल. सन्माननीय सदस्यांनी ओरिसाच्या मजुरांचा उल्लेख केला. आज तारापूरच्या अणुऊर्जा केंद्रामध्ये काम करायला महाराष्ट्रातील कोणीही माणूस तयार होत नाही कारण ते अत्यंत धोकादायक काम आहे. आपली माणसे तेथे काम करायला जाऊ शकत नाहीत. त्यामुळे ओरिसातील बिचाऱ्या भोळया-भाबडया आदिवासी मजुरांना आणण्यात येते. आणि त्यांना त्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

आगीमध्ये म्हणजे जेथे रेडिएशन आहे अशा ठिकाणी काम करायला लावतात. ओरिसामध्ये आदिवासींची मोठी वस्ती आहे. त्यांना त्यांची संस्कृती टिकवण्याचा अधिकार आहे कारण घटनेनेच अल्प भाषिकांना, अल्प संख्यांकाना कलम 27,28,29,30 अन्वये पूर्ण अधिकार दिलेला आहे त्यामुळे त्याची व्यवस्था आपल्याला करावील लागेल पण ते या राज्यात राहणार असतील तर त्यांना मराठी सुध्दा तितक्याच ताकदीने शिकता आले पाहिजे आणि ती शिकविण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यांच्या मातृभाषेबरोबरच मराठीसुध्दा सक्तीची केली पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी याठिकाणी उल्लेख केला की, उच्च शिक्षणापर्यंत मराठीभाष असली पाहिजे. ती असायला बिलकुल हरकत नाही पण त्याचा आग्रह धरीत असताना आपण आपल्या मराठी मुलांना इंग्रजी भाषेचे दरवाजे बंद केले तर त्यामुळे नुकसान होईल एवढेच मला याठिकाणी नम्रपणे सांगावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : मराठी भाषेत उच्च शिक्षण घेतल्यानंतर कुठेही अडत नाही असा माझा मुद्दा होता.

श्री. कपिल पाटील : श्री. नारळीकराचा उल्लेख करण्यात आला म्हणून मी म्हटले की, श्री. नारळीकरांचे प्राथमिक शिक्षण हिंदीमध्ये झाले पण उच्च शिक्षण त्यांनी इंग्रजीत घेतले म्हणून ते जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ होऊ शकले. त्यांचे उच्च शिक्षण इंग्रजीतून झाले नसते तर ते शास्त्रज्ञ झाले नसते. प्रत्येक माणूस काही नारळीकर होऊ शकत नाही ही खरी अडचण आहे. श्री. माशेलकर महापालिकेच्या शाळेत शिकले. प्रत्येकजण माशेलकर होऊ शकत नाही. सर्वसामान्य मुलाला विविध भाषेमध्ये संपर्क साधण्याची जी व्यवस्था आहे ती व्यवस्था आपण निर्माण करुन दिली नाही तर त्यातून वेगळे प्रश्न निर्माण होतील म्हणून आपल्याला आग्रह धरत असताना याचा समतोल साधावा लागेल, एका बाजूला मराठी शिक्षण वाढवणे, त्याचा दर्जा वाढवणे, मराठी सर्वांना सक्तीची करणे म्हणजे सर्व प्रकारच्या बोर्डाच्या शाळांना सक्तीची करणे, दुसऱ्या बाजूला मराठी शाळांमध्ये इंग्रजी अधिक ताकदवान बनविणे आणि इंग्रजी शाळेत जाण्याची गरज निर्माण होऊ नये, अशा पध्दतीने सेमी इंग्लिश केली पाहिजे. सेमी इंग्लिशचे केवळ स्वातंत्र्य देऊन चालणार नाही त्याला अधिक प्रोत्साहन द्यावे लागेल.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

जर त्यांना प्रोत्साहन दिले आणि अनुदानित शाळा जर इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या बरोबरीचे शिक्षण देऊ लागल्या, त्या दर्जाचे शिक्षण देऊ लागल्या तर कोणीही इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाणार नाही आणि त्याची गरज उरणार नाही. कारण विनाअनुदानित शाळेपेक्षा अनुदानित शाळेमध्ये चांगले शिक्षण मिळत असेल तर कोणीही ते नाकारणार नाही.

सभापती महोदय, शिक्षणामध्ये सगळ्यात महत्वाचा मुद्दा हा आहे की, आपले कोठे अडते ? प्रश्न भाषेचा नाही. प्रश्न दर्जेदार शिक्षणाचा आहे. ते दर्जेदार शिक्षण या घडीला महाराष्ट्रामध्ये मराठी शाळांमध्ये देण्याची व्यवस्था राज्य सरकारने केलेली नाही. आपण आपल्या अधिकारांचे आणि व्यवस्थेचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आणि त्याचे कौतुक करण्याच्या दृष्टीने म्हणत असतो की] निरंतर बदलाची प्रक्रिया सुरु आहे. पण माननीय शिक्षण मंत्र्यांना मी नम्रपणे सांगेन की, की आपण संवेदनशील आहात पण कालपर्यंत आपल्याकडे जी व्यवस्था आहे त्यामध्ये एस.एस.सी. बोर्डाची मुले प्रचंड मागे आहेत, हे आपल्याला नाकबूल करुन चालणार नाही. आपण यु.पी.एस.सी. परीक्षेचे आकडे पाहिले तर पास होणाऱ्यांमध्ये दिल्ली आणि बिहारमधील मुलांची संख्या जास्त असते. याचे कारण एस.एस.सी. बोर्डाचे गणित आणि सायन्स हे विषय पुढे नाहीत. त्याबाबतीत काल आपण निर्णय घेतला. केंद्रीय मंत्री श्री. कपिल सिब्बल यांनी जेव्हा सांगितले की, सर्व राज्यामध्ये किमान 10 प्लस 2 चा अभ्यासक्रम सारखा असला पाहिजे, त्यांनी ही भूमिका घेतल्यानंतर आपण त्याला होय म्हटले पण आपण तयारी केली नाही. ही तयारी खूप आधी व्हावयास पाहिजे होती. आपण ते विनम्रपणे नाकारले. आपण ते कबूल करावयास काय हरकत होती की, आमची व्यवस्था होत नाही. कारण आपण या घडीला सुध्दा 2 ग्रेडने मागे आहोत. म्हणजे आपली मुले आज इयत्ता अकरावीमध्ये जे शिकतात ते आयसीएसईची आणि सीबीएसईची मुले इयत्ता नववीमध्ये शिकून तयार झालेली असतात. म्हणून या ठिकाणी सन्माननीय सदस्य बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात जो आग्रह धरत होते त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, ती मुले ॲडमिशनमध्ये पुढे का असतात ? बारावीनंतर ती मुले पुढे का जातात ? ते दहावीनंतर पुढे का जातात ? याचे मुख्य कारण असे आहे की, त्यांचे गणित आणि सायन्स पक्के झालेले असते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

त्यांची भाषाही पक्की झालेली असते. आपल्याकडे ना मराठी पक्की होत ना गणित पक्के होत ना विज्ञान पक्के होत. जशी मराठी भाषा आहे, जशी इंग्रजी भाषा आहे, जशी हिंदी भाषा आहे तशी गणिताची एक भाषा आहे, सायन्सची एक भाषा आहे. ती जर मजबूत नसेल तर सायन्स असेल, कॉमर्स असेल, जगण्याच्या कोठल्याही क्षेत्रामध्ये जर आपले गणित पक्के नसेल तर आपण कधीही पुढे जाऊ शकत नाही. ही सगळ्यात महत्वाची अडचण आहे. म्हणून आपल्याला गणित आणि विज्ञानासाठी खूप आग्रह धरावा लागेल. गणित आणि सायन्स अगोदरच सेमी इंग्रजीमध्ये आलेले आहे. आपण त्याच्यातील परिभाषा इंग्रजीतच वापरत आहोत. ती जर अधिक चांगल्या इंग्रजीत आणली, सोप्या इंग्रजीत आणली तर त्याच्या बरोबर गणित आणि सायन्स हे अधिक चांगले होईल आणि आपली मुले बरोबरीच्या दर्जावर येतील. एकावेळेला आयसीएसई, सीबीएसई आणि एसएससी हे तिन्ही हातात हात घेऊन चालले तर मग हा जो संघर्ष आहे, ही जी अडचण आहे ती राहणार नाही. म्हणून जितकी ऑप्शन्स आयसीएसई आणि सीबीएसईने दिले असतील ते ऑप्शन्स आपल्या सगळ्या मुलांना आपण खुले केले पाहिजेत. यासाठी जर आपण आग्रही राहिलो नाही तर या पुढच्या काळामध्ये मात्र आपले प्रचंड नुकसान होत राहणार आहे. म्हणून माझा आग्रह आहे की, सीबीएसई, आयसीएसई प्रमाणे आपण या दोन विषयांचा अधिक पुनर्विचार करावा, त्याला अधिक ताकद द्यावी. त्याचबरोबर मी मघाशी ज्याचा उल्लेख केला त्यासंदर्भात असा आग्रह धरीन की, इंग्रजी माध्यमामध्ये जे लोअर लेव्हल मराठी असते ते कामचलाऊ मराठी असते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचा नेहमी जो आग्रह असतो की, मराठी अधिक पोहोचली पाहिजे, सगळ्यांनी स्वीकारली पाहिजे त्याप्रमाणे ती कधी पोहोचेल आणि कधी स्वीकारली जाईल ? ज्यावेळेला मराठी व्यापाराची भाषा बनेल, ज्यावेळेला मराठी लवचिक बनेल, ज्यावेळेला मराठी अधिक समृध्द बनेल त्यावेळी ती स्वीकारली जाईल. आज मराठी माणसाला भाषण करता करता इंग्रजी वाक्ये वापरावी लागतात. मघाशी मी सन्माननीय सदस्य श्री. साळुंखे यांचे भाषण ऐकत होतो. त्यांना सुध्दा काही इंग्रजी वाक्ये वापरावी लागली. ते स्वाभाविक आहे. कारण काही गोष्टी मराठीतून व्यक्त होत नाहीत. याचा अर्थ मराठी अजून तितकी समृध्द झालेली नाही आणि आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

केली नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी बरोबर उल्लेख केला की, जपान मध्ये, चीनमध्ये, रशियामध्ये ते लोक का पुढे आहेत ? कारण त्यांनी आपली भाषा समृध्द केली.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषा अजूनही समृध्द झालेली नाही असे जे विधान केलेले आहे ते चुकीचे आहे. मराठी भाषा समृध्द आहे. भाषा समृध्द कधी होईल ? जेव्हा त्या भाषेमध्ये अनेक शब्द, अनेक गोष्टी येतील आणि मराठी म्हणून त्याचा उपयोग होईल त्यावेळी त्या भाषेला आणखी चालना मिळेल. पण मराठी भाषा समृध्द नाही असे म्हणणे ही गोष्ट चुकीची आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे मान्य केले. मराठी भाषा प्राचीन आहे. मराठी भाषा फार मोठी आहे आणि तिचा मला अभिमान आहे पण ती ज्ञानाचे भांडार बनली पाहिजे आणि ती या घडीला नाही हे कबूल करण्यामध्ये काही अडचण नाही. ती समृध्द करण्याचे आव्हान आहे आणि ते आव्हान आपण पेलले पाहिजे. ही भाषा समृध्द केली पाहिजे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मराठी भाषा ही ज्ञानाचे भांडार नाही असे सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे ते चुकीचे आहे.

यानंतर श्री. अजित शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केलेले आहे. तेव्हा हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.उल्हास पवार : मराठी भाषा समृध्द आहे ती अधिक समृध्द करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

तालिका सभापती : मराठी भाषेची गळचेपी होऊ नये अशी अपेक्षा आहे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.दिवाकर रावते : आम्ही मराठी भाषेसाठी आग्रही आहोत आणि त्यासाठी आम्ही दादागिरी करणार... तेव्हा सन्माननीय सदस्यांनी केलेली व्यक्तव्ये सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावीत आणि त्याऐवजी मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे अशी सुधारणा करावी.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचे विधान आक्षेपार्ह असल्यास ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : मी माझे शब्द मागे घेतो,

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी त्यांचे शब्द मागे घेतले आहे.

(काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, हा मुद्दा संपलेला आहे. आपण कृपया खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : मराठीसाठी आम्ही दादागिरी करणार...

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपआपसात बोलू नये.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मला काय बोलायचे होते ते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या लक्षात आलेले आहे. त्यांच्या भूमिकेशी मी सहमत आहे. प्रबोधनकारांच्या शब्दात आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा आदर करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सांगतो की, मी मराठी रक्ताचा आहे, मी मराठी रेताचा आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. माझ्याबद्दल ते बोलले नाहीत. माझे मत त्यांच्या लक्षात आलेले आहे. परंतु त्यांचा थोडा गैरसमज झालेला आहे. मराठी अधिक विज्ञान-समृध्द झाली पाहिजे. अधिक व्यापार-समृध्द झाली पाहिजे त्यासाठी आपल्याला प्रयत्न करावा लागेल. या घडीला ते भांडार आपल्याकडे नाही. ज्ञानेश्वरांनी जी प्रक्रिया केली ती प्रक्रिया आपण वेगाने सुरु केली नाही तर अधिकाधिक विज्ञानेश्वर निर्माण करावे लागतील की जे मराठीमध्ये नवा प्राण फुंकतील आणि मराठी वैभव संपन्न करतील. मराठी भाषा जेव्हा वैभव संपन्न बनेल त्यावेळी आपली दादागिरी सर्वांवर चालू शकेल.

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

ती चालवावयाची असेल तर त्यासाठी प्रचंड ताकदीने मराठीला सशक्त बनविणे, ताकदवान बनविणे मराठी भाषा विकास समितीसाठी परंतु त्यासाठी 1-2 कोटीच्यावर निधी नाही. ही आपली अडचण आहे. संचालक सुध्दा नाही. आपण आपल्याच मराठीला मंत्रालयाच्या दारामध्ये भिक्षेची करवंटी घेऊन उभे केलेले आहे. मराठीची ही अवस्था आम्ही आणून ठेवलेली आहे. याचे दु:ख मानायचे, वैषम्य मानायचे की तिला पुन्हा आईचे वैभव द्यावयाचे याचा आपण विचार करावयाचा आहे. हा समजण्याचा भाग आहे, भावनिक मुद्दा नाही. पुन्हा एकदा मराठी सशक्त करावी, इंग्रजी सशक्त करावी अशी मागणी करुन येथेच थांबतो, धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये अतिशय चांगला विषय चर्चेसाठी आणला आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. याठिकाणी शासनाचा निर्णय झाल्यानंतर प्रस्ताव आले. त्या प्रस्तावाच्या संदर्भात इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी मिळाली आणि मराठी माध्यमाच्या शाळांना नाकारण्यात आली किंवा थांबविण्यात आली. त्यामुळे ख-या अर्थाने हा प्रश्न आला. जर मराठी माध्यमाच्या शाळांना जर मान्यता दिल्या गेल्या असत्या आणि त्या देण्यापूर्वी शासनाने बृहत आराखडा तयार करुन प्रस्ताव मागविले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता असे मला वाटते. कोणीही प्रस्ताव टाकावे आणि किती टाकावे हा प्रश्न निर्माण झाला आहे. इंग्रजी शिकण्याचा आणि शिकविण्याचा शासनाचा निर्णय योग्यच आहे. काळानुसार निर्णय घेणे अनिवार्य असते. म्हणून मराठी शिकत असताना मराठी शाळांमध्ये पहिलीच्या वर्गापासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय योग्य आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी भाषा अवगत होण्याची व शिकण्याची संधी मिळाली. त्याचा परिणाम वा फायदा निश्चितपणे अनुभवयास मिळत आहे. इंग्रजी भाषेकडे कल वाढत असताना त्याची सुरुवात मोठया शहरापासून झाली. परंतु आता जिल्हयातील, तालुक्यातील आणि खेडयापाडयातील पालकांना असे वाटते की, माझ्या मुलाने शिकावे, पुढे जावे, इंग्रजीचे ज्ञान घ्यावे. त्याच माध्यमातून शिकावे पालकाला व पाल्याला देखील वाटते. त्याचा परिणाम म्हणून आज इंग्रजी माध्यमाच्या शाळा उघडाव्यात ही पालकांची अपेक्षा आहे. ती अपेक्षा पूर्ण होण्यासाठी पाल्याने पुढे यावे, स्पर्धेत टिकावे, इतरांच्या मागे राहू नये, काळाबरोबर त्याने प्रगती केली पाहिजे आणि म्हणून अशाप्रकारच्या शाळा आल्या. मराठी ही आमची मातृभाषा आहे. मराठी भाषा अनिवार्य असलीच पाहिजे. त्यामुळे निश्चितपणे स्मरणशक्ती वाढते, आकलन क्षमता वाढते. भाषेची प्रगती होत असते. ही वस्तुस्थिती आहे. मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजी अनिवार्य असले पाहिजे असे मला वाटते. स्पर्धेच्या काळात इंग्रजी येत नाही. शहरी व ग्रामीण, शहरी व आदिवासी याचा विचार केला तर स्पर्धेच्या काळात मुले टिकत नाहीत, ती मागे पडत आहेत. शहरी भागातील विद्यार्थी पुढे जात आहेत, ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडत आहेत. त्यादृष्टीने इंग्रजी देखील आवश्यक आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी देखील आवश्यक आहे. तेथे मराठी भाषेची

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिलीपराव सोनावणे.....

सक्ती केली पाहिजे. म्हणून शासनाला विनंती आहे की, बृहत आराखडा तयार करुन शाळांना परवानगी दिली पाहिजे. इंग्रजी शाळा देखील अनुदानित झाल्या पाहिजेत, येथपर्यंत पाऊल टाकण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. मराठी शाळांना परवानगी दिली पाहिजे. कारण आज तेथील विद्यार्थ्यांच्या संख्येचा विचार केला तर पटसंख्या कमी दिसत आहे. त्यामुळे पटसंख्या कमी केली आणि वर्ग संख्या वाढवून परवानगी दिली तर त्याचा निश्चित फायदा होईल. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये सेमी इंग्रजीतून वा इंग्रजीतून गणित आणि विज्ञान या विषयाला सुरुवात केली तर त्याचा फायदा ग्रामीण भागातील मुलांना सुध्दा होईल. शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनावणे...

ख-या अर्थाने सर्वंकष चर्चा होऊन शिक्षण क्षेत्रामध्ये बदल अपेक्षित आहे. शिक्षक हा शिक्षक न राहता तो संशोधक सुध्दा बनला पाहिजे. त्याने संशोधन केले पाहिजे. खरे म्हणजे प्रशिक्षण घेत असताना आणि शिकवित असताना, ज्ञान वाढवित असताना संशोधनाची भूमिका देखील त्याने पार पाडली पाहिजे. आणखी एक महत्वाची बाब मी सांगू इच्छितो, ती म्हणजे या शिक्षण प्रशासनातील अधिका-यांना आचारसंहिता असली पाहिजे जेणेकरुन त्यांच्यावर अंकुश राहू शकेल. तसेच संस्था चालकांना जे अमर्याद अधिकार दिलेले आहेत त्याचा देखील विचार होणे आवश्यक आहे. या अमर्याद अधिकारांवर कोठे तरी बंधन असले पाहिजे जेणेकरुन शिक्षणाचे बाजारीकरण संपेल. या शिक्षणासाठी बजेटमध्ये करण्यात येणा-या तरतूदीमध्ये वाढ झाली पाहिजे. शिक्षणासाठी केवळ 3 टक्क्यापर्यन्तच तरतूद करण्यात येते. या शिक्षणासाठी 6 ते 7 टक्के निधी उपलब्ध करुन दिला तर बरेचसे प्रश्न सुटतील आणि इंग्रजी बरोबर मराठी आणि मराठी बरोबर इंग्रजी अशी प्रगती करीत असताना जगामध्ये आपण मागे राहाणार नाही याची काळजी घेता येईल एवढे बोलून मला या विषयावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. दिवाकर रावते यांनी जो मराठी शाळांच्या संदर्भात प्रस्ताव आणलेला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी आणि त्याच बरोबर या प्रस्तावाला जी लक्षवेधी सूचना जोडलेली आहे त्या लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 9 एप्रिल 2010 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.30 ते 11.45 पर्यन्त सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा व माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 33 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 9.4.2010रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही